म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

REFBK-0001447

# ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य.

नामदार व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्री

ह्यांच्या

**Self-Government for India Under the British Flag.**

या पुस्तकाचें मराठी भाषांतर.

REFBK-0001447

सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटी, पुणें.

मार्च १९१७.

किंमत सहा आणे.

# ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य.

नामदार व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्री

ह्यांच्या

**Self-Government for India Under the British Flag.**

या पुस्तकाचें मराठी भाषांतर.

REFBK-0001447

सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटी, पुणें.

मार्च १९१७.

किंमत सहा आणे.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन**
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# अनुक्रमणिका.

२९।३।२४

१. हिंदुस्थानचे हक्क. पृष्ठें.

प्रस्तुतचा समय ... ... ... ... १

साम्राज्य-परिषद् ... ... ... ... ६

पुढील धोका ... ... ... ... ७

वसाहतींना उपदेश ... ... ... १०

मागणी ... ... ... ... १२

२. कांहीं तुलनात्मक विचार.

वसाहती ... ... ... ... १४

इंग्लंड ... ... ... ... २४

३. पात्रता.

सामान्य विवेचन ... ... ... ... ३०

उच्च अधिकाराचीं कामें ... ... ... ३१

कायदेकौन्सिलें ... ... ... ... ३६

स्थानिक स्वराज्य ... ... ... ... ३७

पण बहुजनसमाजाचें काय?... ... ... ३८

जाती व पंथ ... ... ... ... ३९

इतर देशांतील एतद्विषयक स्थिति ... ... ४१

मानववंशभिन्नता ... ... ... ... ४४

अजून वेळ आली नाहीं ... .. ... ५१

४. योजना.

रूपरेखा ... ... .. ... ५६

वसाहतींतील स्वराज्याच्या बरोबरीचें नव्हे ... ५८

स्वराज्य कीं ‘ होमरूल ’? ... ... ... ६२
वाढीची शक्यता .. ... ... ... ६५
५. आक्षेप.
देशी संस्थानांचें काय ? .. ... ... ६८
‘ हाउस ऑफ लॉर्डस् ’ चा अभाव ... ... ६९
पुनर्घटित साम्राज्यांत स्थान ... ... ... ७४
विसंगतपणा ... ... ... ... ७९
लोकनियुक्त कार्यकारी सभासद ... ... ८०
सुशिक्षितवर्गाचें वर्चस्व ... ... ... ८२
लढाऊ जाती बिथरतील ... ... ... ८८
६. इंग्रज लोक सत्तात्याग करितील काय ?
त्यांचें हिंदुस्थानांतील कार्य ... ... ... ९१
सजातीयत्व आवश्यक नाहीं... ... ... ९५
७. समारोप.
आमचें कर्तव्य ... ... ... ... १००
आलेली पर्वणी साधली पाहिजे ... ... १०२
परिशिष्ट.
सुधारणांची योजना ... ... १०५

अप्रौढ व न्यूनतापूर्ण असें हें अल्पसें पुस्तक भारतमातेच्या चरणीं प्रेमादरपूर्वक अर्पण करितों. हिंददेशाच्या हक्कांचें ज्ञान होण्यास व भारतवासीयांनीं त्यांचें आस्थापूर्वक मनन करण्यास हें पुस्तक थोडें-बहुत साह्यभूत होवो, अशी आशा आहे.

यांतील अवतरणें प्रबुद्ध वाचकांना कंटाळवाणीं वाटण्याजोगीं आहेत; किंबहुना क्वचित् स्थलीं ते त्यायोगें गोंधळूनहि जाण्याचा संभव आहे. परंतु नवीन व अपरिचित अशा गोष्टींचें आकलन करतांना प्रमाणभूत ग्रंथकारांच्या वचनांचा आधार सामान्य वाचकांना अवश्य वाटत असल्याकारणानें तीं येथें दिलीं आहेत.

सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटी, पुणें,
ता. २० दिसेंबर १९१६

व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्री.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटीनें राजकीय विषयांवर जी लघुपुस्तकमाला प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला आहे, तींतील पहिलें पुस्तक सोसायटीचे अध्यक्ष, ना० व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्री, यांनीं ‘ ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य ’ ह्या विषयावर १९१६ च्या डिसेंबरांत लिहिलें. त्याचें हें मराठी भाषांतर महाराष्ट्रीय वाचकांस सादर करीत आहों. मूळ इंग्रजी पुस्तक ज्यांना वाचतां येत नसेल, त्यांना त्यांतील विचारांचा परिचय या भाषांतराच्या द्वारां व्हावा अशी इच्छा आहे.

मूळ पुस्तकास वरिष्ठ कायदेकौन्सिलांतील एकोणीस हिंदी लोकनियुक्त सभासदांनीं व्हाइसरॉय साहेबांना सादर केलेला सुधारणांचा मसुदा आणि हिंदुस्थाननें महायुद्धांत केलेल्या साह्याबद्दल ब्रिटिश मुत्सद्यांनीं केलेलीं भाषणें हीं परिशिष्टें जोडलीं होतीं त्यांपैकीं पहिल्या परिशिष्टाच्या ऐवजीं राष्ट्रीय सभेनें व मुस्लिम संघानें लखनौ येथें पसंत केलेल्या सुधारणांची संयुक्त योजना या पुस्तकांत दिली आहे व दुसरें परिशिष्ट यांतून वगळलें आहे. याहून म्हणण्यासारखा दुसरा कोणताहि फेरफार केलेला नाहीं.

पुणें, ता. १० मार्च १९१७.

**प्रकाशक.**

# ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य.

## हिंदुस्थानचे हक्क.

### प्रस्तुतचा समय.

इटलीचा जगद्विख्यात मुत्सद्दी काव्हूर यानें सन १८५५ च्या एप्रिल महिन्यांत, त्याच्या स्वतःच्या मनाची फारशी खात्री नसतां आणि त्याच्या देशबांधवांकडून अशुभ भविष्यें वर्तविण्यांत येत असतां, क्रिमियाच्या लढाईमध्यें फ्रान्स व इंग्लंड यांना मदत करण्याकरितां पंधरा हजार लोकांची फौज रवाना केली. खरें म्हटलें असतां पीडमॉंटच्या छोटेखानी राज्याला ही मोठी जोखमाची बाब होती; परंतु उलटपक्षीं, ही मोहीम यशस्वी झाल्यानें युरोपांतील मोठ्या राष्ट्रांच्या मालिकेंत त्या राष्ट्राला स्थान मिळण्याचाहि संभव होता. सुदैवानें, मोहिमेवर गेलेल्या या सेनेनें शौर्य व सुव्यवस्थितपणा दाखवून रणभूमीवर आपलें नांव गाजविलें. पुढील वर्षी पारिसमध्यें काव्हूर गेला असतां, " इटलीसाठीं आम्हांला काय करतां येण्यासारखें आहे ? " असा त्या देशाच्या भवितव्यतेंत परिवर्तन करण्यास साधन होणारा प्रश्न लुई नेपोलियन यानें विचारला; आणि, ऑस्ट्रियानें विरोध केला असतांहि, पारिसच्या परिषदेमध्यें इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें इटलीला सामील करण्यांत आलें. त्यामुळें आपलीं गाऱ्हाणीं त्या राष्ट्रांच्या कानांवर घालण्याची संधि इटलीला मिळाली. इटलीच्या बाबतींत काव्हूरनें जसा लोकोत्तर मुत्सद्दीपणा दाखविला तसाच अलौकिक दूरदर्शीपणा लॉर्ड हार्डिंग यांनीं सांप्रतचें जगद्व्यापी महायुद्ध सुरू होऊन कांहीं आठवडे लोटले नाहींत तोंच फ्लँडर्समधील मोहिमेवर हिंदी

फौज रवाना करून दाखविला. शूर हिंदी फौजेनें स्वतःसाठीं कीर्ति मिळविली, इतकेंच नाहीं तर मुत्सद्दीगिरी व चळवळ यांच्यायोगें कैक वर्षांच्या प्रयत्नांनीं ब्रिटिश साम्राज्यामध्यें हिंदुस्थानाला जें स्थान प्राप्त होऊं शकलें नसतें तें स्थान मिळवून दिलें. साम्राज्याला हिंदुस्थानानें स्वयंप्रेरणेनें जें उत्कृष्ट साहाय्य केलें त्याची प्रशंसा करण्यांत इंग्लिश मुत्सद्यांमध्यें अहमहमिका सुरू झाली. गेल्या मे महिन्यांत गिल्ड हॉलमध्यें भरलेल्या एका मोठ्या सभेंत मुख्य मंत्री मि. ॲस्किथ यांनीं, हिंदुस्थानांतल्या राजेरजवाड्यांनीं व दुसऱ्या बड्या लोकांनीं ज्या देणग्या दिल्या व देऊं केल्या त्यांचा उल्लेख करून हिंदी फौजेच्या पराक्रमासंबंधानें असे उद्गार काढले कीं, " इतक्या स्वयंस्फूर्तीनें पाठविण्यांत आलेल्या, इतक्या सढळ हातानें अन्नादिकांची सामग्री बरोबर दिलेल्या व इतक्या उत्कृष्ट रीतीनें शस्त्रास्त्रसंपन्न असलेल्या हिंदी फौजेनें जीं प्रत्यक्ष पराक्रमाचीं कृत्यें केलीं व जी निष्ठा दाखविली त्यांच्या कीर्तीची चिरकालिक साक्ष फ्रान्स व फ्लँडर्स येथील रणांगणें देत आहेत असें दिसून येईल." मि.ॲस्किथ यांच्या मागून मि.बोनर लॉ यांचें भाषण झालें. त्यांत ते म्हणाले कीं, हिंदुस्थान हस्तगत केल्याबद्दल गर्व वहाण्याला ब्रिटिश राष्ट्राला जें कारण आहे, त्यापेक्षां हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व लोक यांनीं सम्राट् व साम्राज्य यांच्याविषयीं स्वयंस्फूर्तियुक्त व उत्साहयुक्त अशी जी निष्ठा दर्शविली तिच्यासंबंधानें अभिमान बाळगण्यास ब्रिटिश लोकांना राष्ट्र या नात्यानें अधिक मोठें कारण आहे, अशी आपली समजूत आहे. याच वेळीं मार्क्विस ऑफ क्र्यू यांनीं भाषण करून यापेक्षांहि विशेष महत्त्वाचे विचार व्यक्त केले. ते म्हणाले, "अशा प्रसंगीं हिंदुस्थान व वसाहती यांचा एकत्र संबंध येणें हें तत्त्वतः ऐक्याची ओळख पटविणाऱ्या विस्तृत दृष्टीचें एक महत्त्वाचें लक्षण आहे, असें मला वाटतें. या विस्तृत दृष्टीमुळें कालेंकरून भौतिक अंतर, धर्म किंवा जात यांसंबंधाच्या साम्राज्यसंहतीच्या आड येत असणाऱ्या अडचणी साफ नाहींशा होतील, अशी माझी पूर्ण खात्री आहे. निरनिराळ्या साम्राज्यघटकांचें एकीकरण झालें पाहिजे, तें असें कीं, प्रत्येक घटकाला स्वतःचे व्यवहार

स्वतंत्रपणें चालवितां यावेत, मात्र अखिल साम्राज्याची प्रगति हें सर्व घटकांचें सारखेंच ध्येय असलें पाहिजे." मि. चार्लस रॉबर्टस् यांच्या तोंडचे "बदललेला दृष्टिकोन" ( The changed angle of vision ) हे शब्द तर हिंदुस्थानांतील प्रचलित राजकीय परिभाषेंत रूढ होऊन बसले आहेत. हिंदुस्थानच्या भवितव्यतेसंबंधानें बोलतांना खुद्द लॉर्ड हार्डिंग यांची एक उक्तिहि सर्वतोमुखीं झाली आहे. ती ही कीं, " हिंदुस्थान हा साम्राज्याचा खरा दोस्त होईल, केवळ विश्वासू सेवक होऊन राहणार नाहीं ( A friend of the Empire, not a trusty dependant )." इटलीसंबंधानें काव्हूरला प्रश्न विचारण्यांत आला तसा, लॉर्ड हार्डिंग विलायतेस परत गेले तेव्हां त्यांना " हिंदुस्थानच्या बाबतींत काय करतां येण्यासारखें आहे ? " असा प्रश्न पुष्कळ मुत्सद्यांनीं विचारिला असेल. इंग्लंडांतील पुढाऱ्यांनीं विस्मयाच्या व कृतज्ञतेच्या भरांत, अँग्लो-इंडियनांच्या मतांची पर्वा न करितां, हिंदुस्थानाला साम्राज्यांतील इतर राष्ट्रांशीं, थोड्याबहुत फरकानें, बरोबरीचें राजकीय स्थान देण्याची इच्छा स्पष्टपणें दर्शविली.

हिंदी लोकांची अपेक्षा अर्थात्च अतिशय वृद्धिंगत झाली. युद्ध चालू असल्या मुदतींत कोणत्याहि प्रकारचा वादग्रस्त प्रश्न उपस्थित करावयाचा नाहीं, असें सरकार व लोक या दोघांच्याहि मतानें निश्चित झालें होतें. या देशांतील लोकांमध्यें किती उत्कट साम्राज्यनिष्ठा वसत आहे याबद्दल शत्रूची खात्री करण्याकरितांच असें ठरविण्यांत आलें होतें असें नव्हे, तर साम्राज्यामध्यें उत्पन्न झालेल्या नवीन ऐक्यभावनेचें व कार्यैकप्रवणतेचें तें द्योतक होतें. साम्राज्यांत युद्धामुळें उत्पन्न झालेल्या सार्वत्रिक ऐक्यभावनेचा भंग न करण्याची प्रवृत्ति जर कोठें विशेष रीतीनें दृग्गोचर झाली असेल तर हिंदी लोकांच्या पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या राज्यघटनेंत थोड्या कालावधीनें प्रगतिपर सुधारणा करण्यासंबंधानें मागण्या करण्याच्या बाबतींत जें आत्मसंयमनाचें धोरण दाखविलें, त्यामध्येंच होय. अशा स्थितींत, नवीन कल्पनांचे व चळवळींचे उत्पादक अशा ब्रिटिश मुत्सद्यांमध्यें हल्

एक हूल निघाली व ती चोहोंकडे पसरली. अशी कुजबूज प्रथम कोठें सुरू होते हें केव्हांच कळत नाहीं, परंतु तिचा उगम अज्ञात असला तरी लोकांचा तिजवर विश्वास बसत नाहीं असें नाहीं. ती कुजबूज ही कीं, सुधारणेच्या एका महत्त्वाच्या योजनेचा मंत्रिमंडळ विचार करीत आहे व राजनिष्ठ हिंदी लोकांना, कृतज्ञ अशा साम्राज्यसरकाराकडून, स्वयंस्फूर्तीनें व उदारबुद्धीनें देणगीच्या नात्यानें ती जाहीर करण्यांत येणार आहे, व याचसाठीं हिंदी लोकांनीं या प्रसंगीं कोणतीहि चळवळ करूं नये; कारण अशा चळवळीनें या भावी देणगीच्या स्वयंस्फूर्तीच्या व मोठेपणाच्या स्वरूपास कमीपणा येईल. परंतु हिंदुस्थानासंबंधानें आलेला हा प्रेमाचा उमाळा फार वेळ टिकला नाहीं. इंग्लंडांतील लोकमतनिदर्शक संस्था व नियतकालिकें यांच्याकडून साम्राज्याच्या पुनर्घटनेसंबंधानें ज्या निरनिराळ्या योजना एकामागून एक सुचविण्यांत येऊं लागल्या त्यांमध्यें हिंदुस्थानाचें नांव हळुहळू निघेनासें झालें, आणि या देशासंबंधानें बोलतांना मंत्रिमंडळाचे सभासद, त्यांच पूर्वींचे उत्साहपूर्ण उद्गार लक्ष्यांत घेतां, अधिकाधिक सावधगिरीची भाषा योजूं लागले किंवा मुग्ध व्रत स्वीकारूं लागले. जणूं काय प्रतिगामी राजनीतीच्या वाढत्या बळानें त्यांनीं अघळपघळ बोलून दाखविलेल्या विचारांच्या अदूरदर्शित्वाबद्दल त्यांची चांगली कानउघाडणीच केली !

शांतता व युद्ध यांसंबंधाच्या प्रश्नांचा निर्णय करण्याच्या कामीं आपलें मत घेण्यांत यावें अशी मागणी स्वराज्यसंपन्न वसाहतींनीं केलेली असून अर्थातच साम्राज्यसंरक्षणासंबंधाच्या खर्चाचा वांटा उचलण्याची त्यांनीं तयारी दाखविलेली आहे. वसाहतींची ही मागणी ग्रेटब्रिटनमधील जबाबदार अधिकाऱ्यांनीं सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतली आहे. सध्यां युद्धाची गडबड असल्याकारणानें अशा प्रश्नांचा आतांच निकाल लागणें शक्य नाहीं; तथापि, साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांमध्यें ऐक्यभाव दृढतर व्हावा अशी भावना उत्पन्न झाल्यामुळें एका नवीन इंपीरियल पार्लमेंटची ( साम्राज्यमहासभेची ) स्थापना होईल व त्याच्या हाताखालीं त्याच्या हुकु

मांची अंमलबजावणी करणारें अधिकारिमंडळ निर्माण होईल, आणि ह्या इंपीरियल पार्लमेंटमध्यें ( साम्राज्यमहासभेमध्यें ) संयुक्त राज्य ( ग्रेटब्रिटन व आयर्लंड ) आणि वसाहती यांचे प्रतिनिधी असतील, असा संभव दिसतो. या महत्त्वाच्या योजनेमध्यें हिंदुस्थानाला कोणतें स्थान द्यावयाचें हा प्रश्न जे कोणी मुत्सद्दी या गोष्टीचा जबाबदारीनें विचार करितील त्यांच्या मनांत उपस्थित झाल्याखेरीज राहावयाचा नाहीं. परंतु या प्रश्नाचें महत्त्व विचारांत घेतां, त्याच्याकडे फारच कमी लक्ष देण्यांत येत आहे. अर्थात् यामुळें हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत अस्वस्थता उत्पन्न झाली तर त्यांत आश्चर्य कोणतें ? याउप्परही हिंदी लोकांचे पुढारी जर गप्प बसले तर बाहेर देशीं असा समज होण्याचा संभव आहे कीं, ब्रिटिश मुत्सद्दी उदार बुद्धीनें जें कांहीं अल्पस्वल्प देतील व राज्यघटनेंत जी कांहीं थोडी प्रगतिपर सुधारणा करितील, तेवढ्यानें हिंदुस्थानांतील प्रजाजन संतुष्ट होतील.

गेल्या थोड्या महिन्यांत लोकमत व्यक्त होऊं लागलें आहे. साम्राज्याच्या पुनर्घटनेची जी नवी योजना होईल तिच्यामध्यें हिंदुस्थानास बहुमानाचें स्थान मिळालें पाहिजे अशी आपली आकांक्षा असल्याचें हिंदी लोक जाहीर करीत आहेत. राष्ट्रीय सभा व मॉस्लेम संघ यांनीं मान्य केलेल्या स्वराज्याच्या योजनेमध्यें ही आकांक्षा प्रतिबिंबित झालेली आहे. कॉंग्रेस व लीग या दोन्ही संस्थांकडून निरनिराळ्या प्रांतांतून प्रतिनिधी निवडण्यांत येऊन इंग्लंडमध्यें एक डेप्युटेशन पाठविण्यांत येईल आणि त्या डेप्युटेशनकडून तेथील मंत्रिमंडळ व इतर पुढारी-मुत्सद्दी यांचें स्वराज्याविषयक योजनेकडे लक्ष वेधण्यांत येईल अशीहि अटकळ आहे. वसाहतींचे मुख्य मंत्री व इंग्लंडांतलि मंत्रिमंडळ यांच्यामध्यें नेहमीं दळणवळण चालू आहे आणि खाजगी व निमसरकारी दळणवळणाच्या ज्या अगणित सवलती वसाहतींच्या मुख्य मंत्र्यांना मिळत असतात त्यांचा उपयोग करून ते आपले हेतू तडीस नेण्याच्या खटपटींत आहेत यांत संशय नाहीं. यामुळें वसाहतवाल्यांना, अनुकूल परिस्थिति

एक हूल निघाली व ती चोहोंकडे पसरली. अशी कुजबूज प्रथम कोठें सुरू होते हें केव्हांच कळत नाहीं, परंतु तिचा उगम अज्ञात असला तरी लोकांचा तिजवर विश्वास बसत नाहीं असें नाहीं. ती कुजबूज ही कीं, सुधारणेच्या एका महत्त्वाच्या योजनेचा मंत्रिमंडळ विचार करीत आहे व राजनिष्ठ हिंदी लोकांना, कृतज्ञ अशा साम्राज्यसरकाराकडून, स्वयंस्फूर्तीनें व उदारबुद्धीनें देणगीच्या नात्यानें ती जाहीर करण्यांत येणार आहे, व याचसाठीं हिंदी लोकांनीं या प्रसंगीं कोणतीहि चळवळ करूं नये; कारण अशा चळवळीनें या भावी देणगीच्या स्वयंस्फूर्तीच्या व मोठे-पणाच्या स्वरूपास कमीपणा येईल. परंतु हिंदुस्थानासंबंधानें आलेला हा प्रेमाचा उमाळा फार वेळ टिकला नाहीं. इंग्लंडांतील लोक-मतनिदर्शक संस्था व नियतकालिकें यांच्याकडून साम्राज्याच्या पुनर्घटनेसंबंधानें ज्या निरनिराळ्या योजना एकामागून एक सुच-विण्यांत येऊं लागल्या त्यांमध्यें हिंदुस्थानाचें नांव हळुहळू निघेनासें झालें, आणि या देशासंबंधानें बोलतांना मंत्रिमंडळाचे सभासद, त्यांच पूर्वींचे उत्साहपूर्ण उद्गार लक्ष्यांत घेतां, अधिकाधिक सावधगिरीची भाषा योजूं लागले किंवा मुग्ध व्रत स्वीकारूं लागले. जणूं काय प्रतिगामी राज-नीतीच्या वाढत्या बळानें त्यांनीं अघळपघळ बोलून दाखविलेल्या विचारां-च्या अदूरदर्शित्वाबद्दल त्यांची चांगली कानउघाडणीच केली !

शांतता व युद्ध यांसंबंधाच्या प्रश्नांचा निर्णय करण्याच्या कामीं आपलें मत घेण्यांत यावें अशी मागणी स्वराज्यसंपन्न वसाहतींनीं केलेली असून अर्थातूच साम्राज्यसंरक्षणासंबंधाच्या खर्चाचा वांटा उचलण्याची त्यांनीं तयारी दाखविलेली आहे. वसाहतींची ही मागणी ग्रेटब्रिटनमधील जबा-बदार अधिकाऱ्यांनीं सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतली आहे. सध्यां युद्धाची गड-बड असल्याकारणानें अशा प्रश्नांचा आतांच निकाल लागणें शक्य नाहीं; तथापि, साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांमध्यें ऐक्यभाव दृढतर व्हावा अशी भावना उत्पन्न झाल्यामुळें एका नवीन इंपीरियल पार्लमेंटची ( सा-म्राज्यमहासभेची ) स्थापना होईल व त्याच्या हाताखालीं त्याच्या हुकु

मांची अंमलबजावणी करणारें अधिकारिमंडळ निर्माण होईल, आणि या इंपीरियल पार्लमेंटमध्यें ( साम्राज्यमहासभेमध्यें ) संयुक्त राज्य ( ग्रेटब्रिटन व आयर्लंड ) आणि वसाहती यांचे प्रतिनिधी असतील, असा संभव दिसतो. या महत्त्वाच्या योजनेमध्यें हिंदुस्थानाला कोणतें स्थान द्यावयाचें हा प्रश्न जे कोणी मुत्सद्दी या गोष्टीचा जबाबदारीनें विचार करितील त्यांच्या मनांत उपस्थित झाल्याखेरीज राहावयाचा नाहीं. परंतु या प्रश्नाचें महत्त्व विचारांत घेतां, त्याच्याकडे फारच कमी लक्ष देण्यांत येत आहे. अर्थात् यामुळें हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत अस्वस्थता उत्पन्न झाली तर त्यांत आश्चर्य कोणतें? याउप्परही हिंदी लोकांचे पुढारी जर गप्प बसले तर बाहेर देशीं असा समज होण्याचा संभव आहे कीं, ब्रिटिश मुत्सद्दी उदार बुद्धीनें जें कांहीं अल्पस्वल्प देतील व राज्यवटनेंत जी कांहीं थोडी प्रगतिपर सुधारणा करितील, तेवढ्यानें हिंदुस्थानांतील प्रजाजन संतुष्ट होतील.

गेल्या थोड्या महिन्यांत लोकमत व्यक्त होऊं लागलें आहे. साम्राज्याच्या पुनर्घटनेची जी नवी योजना होईल तिच्यामध्यें हिंदुस्थानास बहुमानाचें स्थान मिळालें पाहिजे अशी आपली आकांक्षा असल्याचें हिंदी लोक जाहीर करीत आहेत. राष्ट्रीय सभा व मॉस्लेम संघ यांनीं मान्य केलेल्या स्वराज्याच्या योजनेमध्यें ही आकांक्षा प्रतिबिंबित झालेली आहे. कॉंग्रेस व लीग या दोन्ही संस्थांकडून निरनिराळ्या प्रांतांतून प्रतिनिधी निवडण्यांत येऊन इंग्लंडमध्यें एक डेप्युटेशन पाठविण्यांत येईल आणि त्या डेप्युटेशनकडून तेथील मंत्रिमंडळ व इतर पुढारी मुत्सद्दी यांचें स्वराज्याविषयक योजनेकडे लक्ष वेधण्यांत येईल अशीहि अटकळ आहे. वसाहतींचे मुख्य मंत्री व इंग्लंडांतील मंत्रिमंडळ यांच्यामध्यें नेहमीं दळणवळण चालू आहे आणि खाजगी व निमसरकारी दळणवळणाच्या ज्या अगणित सवलती वसाहतींच्या मुख्य मंत्र्यांना मिळत असतात त्यांचा उपयोग करून ते आपले हेतू तडीस नेण्याच्या खटपटींत आहेत यांत संशय नाहीं. यामुळें वसाहतवाल्यांना, अनुकूल परिस्थिति

प्राप्त होतांच, आपलें घोडें पुढें दामटतां येईल. हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांना मात्र तशा सवलती नाहींत. या कारणास्तव इंग्लिश लोकमताच्या न्यायासनापुढें आम्हीं आपली बाजू मांडण्याच्या कामीं विलंब केल्यास, ज्या आमच्या आकांक्षा इतक्या वृद्धिंगत व उत्तेजित झाल्या आहेत त्या विफल होतील अशी मोठी धास्ती वाटत आहे.

## साम्राज्य-परिषद्.

युद्धसमाप्तीनंतर होणाऱ्या साम्राज्याच्या पुनर्घटनेसंबंधानें निश्चित सूचना करण्याकरितां संयुक्त राज्य व वसाहती यांच्या प्रतिनिधींची एकत्र सभा भरविण्याचा उपक्रम १९१७ सालच्या आरंभीं भरणाऱ्या साम्राज्य-परिषदेनें करावा असें सुचविण्यांत आलें आहे. साम्राज्यपरिषदेमध्यें आपला प्रवेश व्हावा अशी हिंदुस्थानची मागणी आहे. व्हाइसरॉयसाहेबांच्या कायदेकौन्सिलामध्यें आलेला या विषयावरील ठराव मान्य करितांना लॉर्ड हार्डिंग यांनीं साम्राज्यपरिषदेमध्यें हिंदुस्थानाचा समावेश करतां येईल किंवा काय याविषयीं शंका दर्शविली. या प्रश्नाचा निकाल खुद्द त्या परिषदेनेंच लाविला पाहिजे असें त्यांचें मत होतें; परंतु हें मत चुकीचें आहे. या प्रश्नाची चर्चा करितांना प्रो. कीथ हे आपल्या Imperial Unity and the Dominions या पुस्तकांत म्हणतातः " खुद्द परिषदेनें ठराव केल्याशिवाय परिषदेची घटना बदलतां येणार नाहीं असा जो कोटिक्रम १९०६ सालीं लॉर्ड एल्जिन यांनीं आणला होता त्याची सयुक्तिकता मान्य करणें अगदीं अशक्य आहे. साम्राज्यसरकार व वसाहतींचीं सरकारें यांच्या दरम्यान एकमत होऊन परिषदेची घटना बदलतां येणें शक्य आहे, व साम्राज्यसरकार आणि वसाहतींचीं सरकारें यांचें तसें एकमत त्वरित करून घेण्यांत आलें पाहिजे. " ही परिषद् सरकारासरकारांच्या दरम्यानची आहे असें म्हणण्यांत येतें, त्याअर्थीं परिषद् भरल्यानंतर बोलावणें येण्याची हिंदुस्थानच्या प्रतिनिधींना वाट पाहिली पाहिजे

असा याचा अर्थ होतो; असें झाल्यास ती शोचनीय गोष्ट होय.* सेक्रेटरी ऑफ स्टेट व हिंदुस्थानसरकारचा एकादा अधिकारी यांनीं हिंदुस्थानची बाजू मांडण्यास परिषदेमध्यें हजर असावें, असें लॉर्ड हार्डिंग यांचें मत होतें. यापेक्षां विशेष उदारपणाची सूचना, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या The Empire on the Anvil नांवाच्या पुस्तकांत मि. बेसिल वर्सफोल्ड यांनीं केलेली आहे. ही सूचना अशी आहे कीं, "सेक्रेटरी ऑफ स्टेटखेरीज हिंदुस्थान-सरकारनें दोन प्रतिनिधी पाठवावे, आणि त्यांतील एक प्रतिनिधि कायदे-कौन्सिलच्या सरकारी सभासदांनीं निवडलेला व दुसरा बिनसरकारी सभासदांनीं निवडलेला असावा." साम्राज्यपरिषदेमध्यें हिंदुस्थानाचा प्रवेश झाल्यानें अपूर्व लाभ होईल अशी कोणाची समजूत असल्यास ती भ्रामक आहे. कारण, हिंदुस्थानाचें भवितव्य बहुतकरून निराळ्याच संस्थांकडून निश्चित करण्यांत येईल. कांहीं झालें तरी, आमची स्वतःची बाजू पुढें मांडल्याखेरीज या प्रश्नाचा निकाल होऊं देणें आमच्या हिताचें नाहीं.

## पुढील धोका.

वसाहतींच्या प्रतिनिधींचा कोटिक्रम असा आहे कीं, एकाच इंपीरियल पार्लमेंटमध्यें एकत्र बसणाऱ्या, संयुक्त राज्याच्या व वसाहतींच्या प्रतिनिधींकडून जर साम्राज्याचे परराष्ट्रांबरोबरचे संबंध निश्चित करण्यांत यावयाचे आहेत, तर हिंदुस्थान, क्राउन कॉलनीज व दुसरे ब्रिटनच्या ताब्यांतील मुलूख यांच्या राज्यव्यवस्थेवरहि इंपीरियल पार्लमेंटाचें नियंत्रण असलें पाहिजे, हें ओघानेंच प्राप्त होतें. या लोकांच्या मतें इंपीरियल पार्लमेंटमध्यें

* हा उल्लेख डिसेंबर १९१६ मधील आहे. त्यानंतर, लॉर्ड हार्डिंग ह्यांनीं आश्वासन दिल्याप्रमाणें, साम्राज्याच्या युद्धपरिषदेंत हिंदुस्थानच्या वतीनें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचा समावेश करण्यांत आला आहे. त्यांना सल्लामसलतीचें साह्य करण्यास ब्रिटिश हिंदुस्थानच्या तर्फे एक युरोपियन व एक हिंदी अधिकारी आणि राजेरजवाड्यांच्या तर्फे एक हिंदी संस्थानिक यांची नेमणूक करण्यांत आली आहे. सदर परिषदेंत, सेक्रेटरी ऑफ स्टेटप्रमाणें, या त्यांच्या मदतनिसांनाहि आपलें म्हणणें मांडण्याची मोकळीक मिळणार आहे.

हिंदुस्थानांतील लोकांना वसाहतींतील लोकांच्या बरोबरीचें स्थान मिळणें शक्य नाहीं. ही कल्पना जर अमलांत आली तर हिंदुस्थानाला ग्रेटब्रिटन-चाच नव्हे तर ग्रेटब्रिटनबरोबर वसाहतींचाहि सासुरवास पत्करावा लागेल. या प्रकारच्या व्यवस्थेस हिंदुस्थानांतील व इंजिप्तमधील लोक अर्थात्च जोरानें विरोध करतील हें उघड आहे. या विरोधाच्या कारणांसंबंधानें कोणीं अवाक्षरहि काढलें नाहीं व तो नाहींसा करण्याचा विचारहि या मंडळीच्या मनाला शिवला नाहीं. "ज्या मनुष्यजाती अद्यापि स्वराज्यास पात्र नाहींत त्यांना स्वातंत्र्य उपभोगण्यास लायक करण्या"चें पवित्र कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे व त्या दृष्टीनेंच हिंदुस्थानावर राज्य चालविण्याची जबाबदारी पत्करली जाईल, असें मि. लायोनेल कर्टिस* हे आम्हांस मोठ्या दिमाखानें आश्वासन देत आहेत. The Britannic Question या पुस्तकाचे कर्ते मि. रिचर्ड जेब हे म्हणतात कीं, "ग्रेटब्रिटन-च्या अंकित असलेल्या देशांच्या राज्यकारभारांत सर्व ब्रिटानिक लोकांनीं (वसाहतींतील व संयुक्त राज्यांतील लोकांनीं) लक्षपूर्वक मन घालावें आणि ते देश आपल्या सत्तेखालीं असल्याबद्दल ग्रेटब्रिटनच्या लोकांप्रमाणेंच अभिमान बाळगावा; कारण त्यामुळें उच्च राजकीय जबाबदारीची जाणीव त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होऊन तिचें संवर्धन होईल आणि तेणेंकरून वसा-हतींतील नागरिकत्वाची कल्पना उदात्ततर होईल." ही एक नवीन मानखंडना आमच्या पुढें दत्त म्हणून उभी आहे. साम्राज्याच्या इतर भागांच्या राज्य-व्यवस्थेमध्यें आमचा हात असल्यावांचून हिंदुस्थानांतील राज्यकारभारांत

*हे मि. कर्टिस म्हणजे इंग्लंडांतील 'राउंड टेबल' कंपूचे प्रमुख सभासद व प्रतिनिधि होत. साम्राज्यघटनेसंबंधानें हा कंपू चर्चा करीत असतो, व त्या चर्चेंत स्थापित झालेलीं अनुमानें मि. कर्टिस ह्यांनीं The Problem of the Commonwealth व The Commonwealth of Nations ह्या दोन ग्रंथांत समाविष्ट केलेलीं आहेत. हीं अनुमानें हिंदुस्थांतील परिस्थितीस कितपत लागू पडतात हें पाहण्याच्या विचारानें ते सध्यां या देशांत आले आहेत; आणि यांचेंच आपल्या कंपूच्या सेक्रेटरीला लिहिलेलें 'खासगी' पत्र प्रसिद्ध झालें असून त्याबद्दल सर्वत्र गवगवा झाला आहे.

त्यांची ढवळाढवळ आम्ही चालूं देणार नाहीं, ही गोष्ट आम्ही वेळींच स्पष्ट केली पाहिजे. सर्व जगभर चालू असलेल्या महायुद्धामध्यें हिंदी सैनिकांच्या रक्ताचे प्रवाह वसाहतींतील सैनिकांच्या रक्तप्रवाहांशीं एकजीव होऊन जात असतां, होतां होईल तों अशा प्रकारचे वाद उपस्थित करूं नये हें चांगलें. परंतु जेव्हां दुसरे लोक आम्हांला कनिष्ठ प्रतीच्या मनुष्यजातींमध्यें लोटूं पहातात, आमच्या कपाळावर निकृष्टपणाचा शिक्का मारूं इच्छितात, आम्हांला त्यांच्या मुलुखांत पायहि न ठेवूं देण्याइतका निष्ठुरपणा दाखवितात, आमच्याविषयीं कोणत्याहि प्रकारची सहानुभूति दाखवीत नाहींत आणि इतकें करूनहि आमच्या राज्यकारभारांत ढवळाढवळ करावयाला व आमच्या देशांतील साधनसंपत्तीवर हात मारावयाला पुढें येतात; आणि ‘ तुम्हांला स्वराज्य कसें चालवावें हें शिकविण्यासाठींच हें सारें आम्ही करीत आहों ’ असेंहि साळसूदपणाचा आव घालून सांगावयास चुकत नाहींत, तेव्हां मात्र सहनशीलता दाखविणें फार कठीण होतें. हिंदुस्थानला पांगुळगाड्यावांचून केव्हांच पाऊल टाकतां यावयाचें नाहीं, त्यानें नेहमीं दुसऱ्यांच्या ओंजळीनेंच पाणी प्यालें पाहिजे, असें म्हणण्यापर्यंत सुद्धां वसाहतींतील कित्येक लेखकांची मजल गेलेली आहे. असल्या अनुदार कल्पनांच्या उत्पादकांपैकीं मि. जेब हे एक आहेत. ते म्हणतात: “ब्रिटानिक संघामध्यें प्रवेश करण्याची पात्रता हिंदुस्थानाला केव्हांहि यावयाची नाहीं. हिंदी लोकांची प्राचीन काळापासूनची संस्कृति, त्यांची परंपरा व त्यांची ध्येयें हीं सर्व कांहीं युरोपियनांहून अगदीं पृथक् आहेत, व त्यांची राहणी अगदीं भिन्न आहे. ब्रिटानिक लोकांपासून हिंदी लोक अगदीं निराळे आहेत व त्यामुळें या दोन जनसमूहांपैकीं इकडचा जनसमूह तिकडे व तिकडचा इकडे स्थायिक होऊन दोन्ही एकरूप होणें शक्यच नाहीं. उत्तर अमेरिका, ऑस्ट्रेलेशिया व दक्षिण आफ्रिका या देशांत आशियाटिक लोकांना येऊं न देण्याचें जें धोरण अमलांत आलें आहे तें उगाच काल्पनिक कारणांनीं आलेलें नाहीं. ब्रिटानिक राज्यांना आज दृष्टीचा पल्ला जितका दूर पोंचवितां येईल तितक्या भविष्यकालापर्यंत आपल्या स्वःच्या लष्करी सामर्थ्या-

च्या जोरावर हिंदुस्थानच्या परराष्ट्रविषयक संबंधांचें नियंत्रण केलें पाहिजे. ” हिंदुस्थानानें ‘जशास तसें’ अशा धोरणाचा अंगीकार केला तर ही राजनीति कितपत अमलांत आणतां येईल, याचा विचार करूनच या लेखकानें आपल्या तर्कपद्धतीला अनुसरून मनसोक्त अनुमानें काढलीं आहेत. त्यानें प्रदर्शित केलेल्या पुढील विचारांत जी घमेंड दिसून येते, तिची बरोबरी त्यांतील विधानांचा खोडसाळपणाच करूं शकेल. केवळ ‘जशास तसें’ या न्यायानें हिंदुस्थानकडून धोरण स्वीकारलें जाईल, हेंच मुळीं संभवनीय नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आशिया खंडांतील देशांमध्यें युरोपियन लोकांनीं प्रवासाला यावें, इतकेंच नव्हे, तर तेथें स्थायिक होऊन राहावें असें तेथील लोकांना आर्थिक दृष्ट्या इष्ट वाटतें. युरोपियन लोक आपल्याबरोबर जो पैसा आणतात व व्यापारवृद्धीच्या बाबतींत जो पुढाकार घेतात, त्यामुळेंच हा ग्रह उत्पन्न झाला आहे. उलटपक्षीं, आशियाटिक रहिवाशी ( हे प्राय: आपल्या देशांतल्या कनिष्ठ वर्गातल्या लोकांपैकीं असतात ) युरोपियन समाजाला नकोसे वाटतात, याचें कारण ते वसाहतींतून पैसा घेऊन बाहेर जातात; त्यांना स्वल्प मजुरी द्यावी लागल्यामुळें युरोपियनांच्या औद्योगिक व सामाजिक प्रगतीला अडथळा येतो. हे लोक पाश्चात्य जनसमाजांत एकजीव होऊन जाणें अशक्य आहे, ही गोष्ट तर वेगळीच. ”

## वसाहतींना उपदेश.

आह्मी मौन स्वीकारून व निःशंकपणें विश्वास टाकून बसलों, तर आमच्या दास्यशृंखला दृढतर होण्याचा आणि सध्यांपेक्षां संख्येनें अधिक व अनिष्टतर वृत्तीच्या धन्यांचें स्वामित्व आमच्यावर स्थापन होण्याचा प्रसंग येण्याची कशी भीति आहे हें वाचकांना समजावें एवढ्याचसाठीं वरील संतापजनक उतारे दिले आहेत. वसाहतवाले आपला उन्माद क्षणभर बाजूस ठेवून पुढील शहाणपणाचा उपदेश ऐकतील काय ? “सद्धेतूनें परंतु अनियंत्रितपणें देशाचा राज्यकारभार चालविण्याचा जो अधिकार संयुक्त राज्याला पूर्वी होता तशा प्रकारचा अधिकार अंशतः सुद्धां मिळविण्याची अपेक्षा वसाहतींनीं करतां कामा नये. हिंदुस्थानांतील लोकांमध्यें आतां स्व-

त्याची जाणीव उत्पन्न झाली असून, इंग्रजांच्या राजकीय संस्थासंबंधा-च्या आकांक्षा सुशिक्षितांमध्यें उत्पन्न झाल्या आहेत." वसाहतींच्या प्रतिनिधींच्या हातीं हिंदी राजनीतीला वळण देण्याचा अधिकार असावा ही गोष्ट हिंदी लोक कालत्रयींहि कबूल करणार नाहींत; व ती हिंदी लोकांनीं कबूल केली नाहीं तर त्यांनीं न्याय्य तेंच केल्यासारखें होईल. कारण हिंदी लोकांना वसाहतींनीं मज्जाव केला आहे व ते निकृष्ट मानववंशांतील आहेत अशा भावनेनें वसाहती त्यांना वागवितात." "अर्थातच हिंदी साम्राज्याच्या कारभारांत ढवळाढवळ करण्यास मोकळीक मिळण्याची वसाहतवाल्यांनीं अपेक्षाच करितां कामा नये. साम्राज्यसरकारच्या दृष्टीनें पाहिलें तर सामान्यत: परराष्ट्रविषयक धोरणाच्या बाबतींत त्यांनीं स्वराज्यसंपन्न वसाहतींची जशी सल्ला घेतली पाहिजे तशीच यापुढें हिंदुस्थानचीहि सल्ला घेतली पाहिजे, हें स्पष्ट आहे. हिंदुस्थान व वसाहती या दोघांच्या बाबतींत साम्राज्यसरकारचें सारखेंच कर्तव्य आहे आणि त्यांनीं तें दोघांपैकीं कोणाचाहि पक्षपात न करितां बजाविलें पाहिजे. स्वराज्यसंपन्न वसाहतींच्या बरोबरीनें हिंदुस्थानाला साम्राज्यपरिषदेमध्यें आपली बाजू मांडूं दिली पाहिजे हेंहि ओघानेंच प्राप्त होतें. हिंदुस्थानापेक्षां न्यूझीलँड, दक्षिण आफ्रिका व न्यू फाउंडलँड या वसाहती विशेष योग्यतेच्या आहेत असें म्हणणें खरोखरच हास्यास्पद होईल. हिंदुस्थानचें मत हिंदुस्थानच्या प्रतिनिधींच्या तोंडूनच बाहेर पडलें पाहिजे. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनाच हिंदुस्थानचा प्रतिनिधि समजण्यांत येतां कामा नये. तो प्रतिनिधि हिंदीच असला पाहिजे. या गोष्टी वसाहतींच्या सरकारांना प्रांजलपणें कबूल झाल्या तर साम्राज्याच्या भिन्न भिन्न घटकांमध्यें ऐक्यवृद्धि करण्याच्या बाबतींत एक महत्त्वाचें कार्य झाल्यासारखें होईल. साम्राज्याचें एकीकरण यापेक्षां दुसऱ्या मार्गानें अधिक सुलभतेनें व खात्रीनें होईल असेंहि संभवत नाहीं, आणि तसें घडून येण्याला कांहीं भानगड किंवा अडचणहि नाहीं. हिंदुस्थानच्या हक्कांना अशा प्रकारें मान्यता मिळण्यास, युद्धामध्यें हिंदुस्थाननें जी कामगिरी बजाविली आहे तिच्यामुळें अश्रुतपूर्व संधि प्राप्त झालेली

आहे." हे उतारे डॉ० कीथ यांच्या Imperial Unity and the Dominions या पुस्तकांतून घेतलेले आहेत. आत्मप्रौढी व अनिवार्य राज्यतृष्णा यांच्या विरुद्ध वसाहतींना इषारा देऊनच कीथसाहेब स्वस्थ राहिलेले नाहींत. वसाहतींच्या आजपर्यंतच्या धोरणांतील चूक दाखवून, यापुढें न्यायानें व बंधुभावानें वागण्याचा उपदेशहि कीथसाहेबांनीं त्यांना केलेला आहे. वसाहतींतील गोऱ्या लोकांनीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील सुशिक्षित प्रजाजनांना वसाहतींमध्यें येण्यास कोणतीच आडकाठी ठेवतां कामा नये; आणि वर्णभेदाच्या व जातिभेदाच्या तत्त्वावर, स्वराज्यसंपन्न वसाहतींमधील कायदेशीर रहिवाशी असलेल्या हिंदी लोकांच्या बाबतींत जे निर्बंध सध्यां घालण्यांत आले आहेत ते दूर केले पाहिजेत; तसें झालें तरच साम्राज्याचें खरें एकीकरण होऊं शकेल, असें डॉ० कीथ यांनीं स्पष्ट मत दिलें आहे.

## मागणी.

ब्रिटिश साम्राज्याच्या घटकांचें एकीकरण करण्याची कल्पना व्यवहार्य आहे कीं काय आणि जर ती व्यवहार्य असेल तर तिचें स्वरूप स्थूल मानानें कसें असलें पाहिजे, हे प्रश्न उच्च साम्राज्यनीतीच्या टापूंतील असल्यामुळें त्यांचा येथें ऊहापोह करण्याचें कारण नाहीं. प्रस्तुत तो आमचा विषय नाहीं. जेणेंकरून राजकीय दृष्टीच्या सध्यांपेक्षां आमची स्थिति निकृष्ट होईल, आम्हांला साम्राज्याच्या कुटुंबांत बटीकपणाच पतकरावा लागेल आणि ग्रेट ब्रिटनच नव्हे, तर न्यूझीलँड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, कानडा व न्यू फाउंडलँड यांचेंहि दास्य स्वीकारण्याची पाळी येईल, अशी कोणती व्यवस्था अमलांत येऊं नये, हच या वेळीं आम्हांला निक्षून सांगावयाचें आहे. आमच्या हितसंबंधाचें व आमच्या अब्रूचें ग्रेट ब्रिटनच्या मुत्सद्यांनीं रक्षण करावें, अशी आमची अपेक्षा आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य संपादण्यावरच आमची सर्व मदार आहे. हिंदुस्थानाला एकदां स्वराज्य मिळूं द्या, म्हणजे ब्रिटिश राजछत्राखालील दुसऱ्या राष्ट्रांच्या बरोबरीचे हक्क कसे मिळवावयाचे याची

काळजी नको. स्वसत्ताक वसाहतींना जो दर्जा आहे व जे विशेष अधिकार आहेत, ते हिंदुस्थानाला प्राप्त झाल्याखेरीज हिंदुस्थानांतील लोकांचें समाधान होणार नाहीं. हिंदुस्थान हा इंग्लंडच्या वर्चस्वाखालील सर्वांत मोठा व महत्त्वाचा देश आहे आणि म्हणूनच त्याला ब्रिटिश मुकुटांतील देदीप्यमान रत्नाची उपमा देण्यांत येते. साम्राज्याची पुनर्घटना निश्चित करण्यापूर्वीं हिंदुस्थानाला तसा दर्जा मिळाला पाहिजे, निदान त्या बाबतींत आज निश्चित आश्वासन तरी मिळालें पाहिजे. साम्राज्याच्या पुनर्घटनेसंबंधानें होणाऱ्या वाटाघाटींमध्यें हिंदी लोकांच्या प्रतिनिधींचें—त्यांच्या स्वतःच्या पुढाऱ्यांचें—मत घेण्यांत आलें पाहिजे. परंतु स्वराज्यसंपन्न जनतेचें पुढाऱ्यांना पाठबळ असल्याखेरीज त्यांचें वसाहतींच्या प्रतिनिधींप्रमाणें वजन पडणार नाहीं, त्यांची छाप बसणार नाहीं किंवा त्यांना आपली बाजू तितक्या जोरानें पुढें मांडतां येणार नाहीं, हें उघड आहे.

# कांहीं तुलनात्मक विचार.

## वसाहती.

हिंदी लोकांच्या स्वराज्याच्या मागणीला असा जबाब देण्यांत येतो कीं, इतक्या महत्त्वाच्या हक्काला ते पात्र नाहींत. सध्यां आमची जितकी पात्रता आहे तिच्यापेक्षां अधिक पात्रता, इंग्लिश वसाहतींना स्वराज्याचे हक्क देण्यांत आले तेव्हां त्यांच्या अंगीं होती, असेंहि सांगण्यांत येतें. परंतु ऐतिहासिक दृष्टच्या हें विधान सत्य नाहीं. गेल्या शतकाच्या मध्यांत म्हणजे १८४० ते १८६० पर्यंत वसाहतींची स्थिति काय होती याचें चित्र दृष्टीसमोर आणावयाचें असल्यास वसाहतींचा सध्यांचा उत्कर्ष व प्रगति हीं दृष्टीआड केलीं पाहिजेत. राजकीय व आर्थिक बाबतींत स्वातंत्र्य मिळालें असतां एकाद्या देशांतील लोकांच्या स्थितीमध्यें आश्चर्यकारक फेरबदल घडून येतात, हें जपानच्या उदाहरणावरून सर्वांना दिसून आलेलेंच आहे. आधुनिक काळांतील पन्नास वर्षें व मागील कोणत्याहि शतकांतील पन्नास वर्षें यांच्यामध्यें मोठा फरक आहे, हेंहि लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. ब्रिटिश वसाहतींपैकीं कानडाला प्रथम स्वराज्य मिळालें आणि या वसाहतींतच ब्रिटिश राजकीय संस्थांचे सुपरिणाम सर्वांत जास्त दिसून आले आहेत अशी समजूत आहे. कानडाला जेव्हां स्वराज्याचे अधिकार देण्यांत आले तेव्हां त्या वसाहतीची व तेथील लोकांची स्थिति कशा प्रकारची होती, याविषयीं सुदैवेंकरून हुबेहूब वर्णनात्मक व वस्तुस्थितीला धरून असणारी अशी माहिती लॉर्ड डर्हाम यांच्या रिपोर्टामध्यें आपल्याला आढळते. त्या वेळीं कानडाचे, लोअर व अपर असे दोन विभाग होते. लोअर कानडामध्यें ६,००,००० लोकवस्ती असून त्यांपैकीं ४,५०,००० फ्रेंच व १,५०,००० इंग्लिश लोक होते. अपर

कानडाची वस्ती ४,००,००० असून त्यांपैकीं बहुतेक लोक इंग्लिश होते. दोन्ही प्रांतांत प्रातिनिधिक स्वरूपाच्या राजकीय संस्था होत्या. या संस्थांचे सर्व प्रतिनिधी लोकांनींच निवडलेले असत आणि त्यांना राज्यकारभाराचा खर्च मंजूर करण्याचा व कर बसविण्याचा अधिकार असे. परंतु सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुका मात्र साम्राज्यसरकाराकडून होत असत. या अधिकाऱ्यांचा कित्येक उत्पन्नाच्या बाबींवर व दुसऱ्या कांहीं गोष्टींवर ताबा असल्याकारणानें ते कायदे करणाऱ्या मंडळाला जुमानीत नसत. अधिकाराच्या जागा ठरींव कुटुंबांतील माणसांनाच देण्यांत येत असत. सरकारच्या मालकीच्या जमिनीची वांटणी अन्यायानें होत असल्यामुळें व मिशनरी लोकांसाठीं जमिनी राखून ठेवण्यांत येत असल्यामुळें अतिशय कडाक्याचे वाद माजले होते. लोअर कानडामधील अल्पसंख्याक इंग्रज लोकांनींच राजकीय सत्ता व अधिकाराच्या जागा बळकावल्या होत्या. बहुतेक व्यापारहि त्यांच्याच हातांत होता. कायदे करणारें प्रतिनिधिमंडळ व अधिकारिवर्ग यांच्यामध्यें सारखें भांडण जुंपलेलें असे. या वादाला पुष्कळ वेळां भयंकर हमरीतुमरीचें स्वरूप येत असे. लोअर कानडामधील राजकीय मतभेद म्हणजे इंग्लिश व फ्रेंच या लोकांमधील जातिविषयक तंटाच होता. फ्रेंच लोकांनीं आपल्या La Canadienne या वर्तमानपत्राच्या द्वारें सवता सुभा स्थापण्याचे व स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालविले होते. दोन्ही प्रांतांत राजकीय असंतोषाचें पर्यवसान बंडाळीचा घाट घालणें, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांना मिळण्याची धमकी देणें, राज्यकारभारच्या खर्चासाठीं पैसा मंजूर करण्याचें नाकारणें आणि ब्रिटनमधील अधिकाऱ्यांकडे स्वराज्य मागण्यासाठीं जोराचे प्रयत्न करणें, यांमध्यें झालें. हा वाद इतक्या थराला पोंचला कीं, लोअर कानडामध्यें पापिनो व अपर कानडामध्यें मॅकेनूझी यांनीं बंडाचे झेंडे उभारले. मात्र या दोन्ही बंडवाल्यांचें एकमत नव्हतें. बंडें लगेच मोडून टाकण्यांत आलीं, दडपशाहीचें

धोरण बंद ठेवण्यांत आलें आणि १८३८ मध्यें लॉर्ड डर्हाम यांना कुलअखत्यार देऊन गव्हर्नर-जनरल म्हणून तेथें पाठविण्यांत आलें.

लॉर्ड डर्हाम यांनीं कानडामधील तत्कालीन स्थितीच्या हकीकतीचा रिपोर्ट साम्राज्यसरकारकडे पाठविला त्यांत त्या देशाच्या सुधारणेसंबंधानें सूचनाहि केल्या. पार्लमेंटपुढें आजपर्यंत आलेल्या कागदपत्रांमध्यें या रिपोर्टाची सर्वोत्कृष्ट म्हणून गणना करण्यांत येते. प्रातिनिधिक राज्यघटनेसंबंधानें योग्य कल्पना व विचार सुचावे म्हणून मुत्सद्दी लोकांना या रिपोर्टाचें मनन करण्याची आवश्यकता वाटते. संस्थांच्या अंगीं असंतोषाचें शमन करण्याची व जनतेला उदात्त चारित्र्याचें वळण लावण्याची जी प्रचंड शक्ति आहे तिच्यावर ज्या लोकांचा दृढ विश्वास नसेल त्यांनाहि या रिपोर्टाच्या वाचनानें त्या शक्तीविषयीं भरंवसा वाटूं लागेल. सरकार व लोक यांच्या दरम्यान परस्परांच्या कर्तव्यांविषयीं योग्य समज न पडल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या अनिष्टांचा प्रतिकार करण्यास लोकनियंत्रित राज्यपद्धति हाच–हाच फक्त–खात्रीचा एक उपाय आहे, हा धडा आम्हां हिंदुस्थानांतील लोकांना सदरील रिपोर्टापासून मिळतो. हिंदुस्थानच्या हितशत्रूंकडून येथील लोकांस स्वराज्याचा मोठा हप्ता देण्यास मुख्य अडचण म्हणजे येथील परिस्थितींतील दोष असें सांगण्यांत येतें. परतु लॉर्ड डर्हामसारखा कोणी मुत्सद्दी हिंदुस्थानच्या स्थितीसंबंधानें अभिप्राय कळविण्यास इकडे आला तर या देशाच्या प्रस्तुतच्या राजकीय स्थितींतील दोषांचा परिहार करण्यास तत्काळ प्रजासत्तात्मक राज्यव्यवस्था अमलांत आणणें हाच एक उपाय आहे असें तो खात्रीनें प्रतिपादन करील.

लॉर्ड डर्हाम यांनीं धैर्य दाखवून लोकांना आश्चर्यचकित करणारी सुधारणा सुचविली तेव्हां कानडा देशाची तत्कालीन स्थिति कशी होती हें शक्य तितकें लॉर्ड डर्हाम यांच्याच शब्दांमध्यें सांगणें विशेष चांगलें होईल. प्रथमतः शिक्षणासंबंधानें ते म्हणतातः–" ब्रिटिश सरकारनें एकसारखें औदासीन्य दाखविल्याकारणानें बहुजनसमाजामध्यें स्वातं

त्यांची जाणीव उत्पन्न करणाऱ्या व त्यांची उन्नति करणाऱ्या कोणत्याहि संस्था येथें अस्तित्वांत आलेल्या नाहींत. शिक्षणसंस्था व स्थानिक स्वराज्याच्या संस्था—ज्यांच्या योगानें लोकांचें शील व आचार यांची सुधारणा होऊन ते साम्राज्याशीं एकजीव होऊन जातील—यांचा येथें मागमूसहि नाहीं. लोकांमध्यें शिक्षणाचा किती अभाव आहे याबद्दल अतिशयोक्तियुक्त वर्णन करतां येणेंच शक्य नाहीं. लोकांना शिक्षणाचीं कांहींहि साधनें पुरविण्यांत आलेलीं नाहींत. लिहिण्यावाचण्यापुरतीहि विद्या फारशी कोठें दिसत नाहीं. " " बऱ्याच शिक्षकांना लिहितां येत नाहीं व वाचतांहि येत नाहीं. ... असल्या निरक्षर शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना विद्यालाभ काय होणार तें उघडच दिसतें. आपआपल्या राजकीय पक्षांतील लोकांना या जागा अधिकारारूढ वर्गाकडून दिल्या जातात. शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च होणाऱ्या पैशाची व्यवस्थाहि प्रामाणिकपणें होत नाहीं. " कानडांत राज्यकारभाराची दुर्दशा झालेली होती: " सरकारच्या राजधानींत अशी व्यवस्था असल्यावर बाहेर किती अव्यवस्था असेल याची सहज कल्पना येण्यासारखी आहे. क्वेबेकच्या वेशीबाहेर बेबंदशाहीस सुरुवात होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. मॉन्ट्रील व थ्री रिव्हर्स या प्रांतांखेरीज इतरत्र, ज्याला कांहीं हुकूम देतां येईल असा सरकारच्या मुलकी खात्यांतला एकहि अमलदार नाहीं. " या बाबतींत आणखी एक उतारा दिला म्हणजे बस्स होईल. गास्पे नांवाच्या जिल्ह्याचें ह्यांत वर्णन आहे: " या ठिकाणीं न्यायव्यवस्था कशी आहे याविषयीं कांहींच माहिती मला मिळेना. एकदां कांहीं कामानिमित्त त्याविषयीं शोध करण्याचा प्रसंग आला, तेव्हां गास्पे येथें कोणी कॉरोनर आहे किंवा नाहीं याची क्वेबेक येथील सर्व सरकारी कचेऱ्यांमध्यें चौकशी केली. पुष्कळ दिवसांनीं या बाबतींत माहिती मिळाली आणि अशा अंमलदाराला द्यावयाच्या पगाराचा अंदाज अकाउंटंट-जनरल यांनीं दाखल केल्याचें शोधून काढल्यावर असा अंमलदार तेथें असतो असा अखेरीस कांहीं उलगडा झाला. गास्पे येथें सध्यां

न्यायव्यवस्था कशी चालते यासंबंधानें मला जी काय निश्चित माहिती देतां येईल ती एवढीच कीं, ती न्यायव्यवस्था ज्या कायद्याला अनुसरून चालत आहे तो कायदा पुनः नव्यानें चालू ठेवूं नये, अशा अर्थाचा अर्ज तेथील रहिवाशांकडून माझ्याकडे आला आहे." न्यायपद्धति अत्यंत असमाधानकारक होती. ज्यूरीवरील लोकांचा विश्वास उडालेला होता. व्यापार मागसलेला होता. बँका व व्यापाराच्या सोयीचीं दुसरीं साधनें यांची व्यवस्था नीट नव्हती. दूरच्या भागांत दळणवळणाचीं साधनें नव्हतीं. म्युनिसिपल संस्था म्हणजे लोकांच्या राजकीय शिक्षणाच्या शाळा होत असें म्हणण्यांत येतें; परंतु कानडामध्यें त्या काळीं या संस्थांचा जवळ जवळ अभावच होता. "स्थानिक स्वराज्याच्या म्युनिसिपल संस्था म्हणजे अँग्लो-सॅक्सन लोकांच्या स्वातंत्र्याचा व संस्कृतीचा मूळ पायाच होय. परंतु लोअर कानडामध्यें या संस्था नाहींत." "लोअर कानडामधील लोकांना स्वराज्याचे अधिकार 'आधीं कळस मग पाया' अशा उलट क्रमानें देण्यांत आलेले आहेत. ज्या लोकांवर आपल्या तालुक्याची व्यवस्था ठेवण्याच्या बाबतींत विश्वास ठेवण्यांत आलेला नाहीं, त्यांना सबंध राज्याच्या कारभारामध्यें मत देण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे." "खेड्यापाड्यांत स्वराज्याच्या हक्काला अनुरूप असे आचार-विचार माहीतहि नाहींत. स्थानिक व्यवस्थेवर लोकमताचें नियंत्रण असण्यास जी कार्यक्षमता पाहिजे ती कार्यक्षमता असलेले भरपूर लोक मिळणें शिक्षणप्रसाराच्या अभावीं कठिण झालें आहे."

हिंदुस्थानांतील लोकांना ज्या मापानें मोजलें जातें, त्याच मापानें क्वेबेक-मधील फ्रेंच लोकांना मोजल्यास, ते स्वराज्यास तर दूरच, पण प्रातिनिधिक संस्थांनाहि सर्वथैव अपात्र होते, असें म्हणावें लागेल. परंतु त्याच लोकांची आतां ब्रिटिश साम्राज्यांतील अत्यंत प्रगमनशाली व समाजाहितदक्ष लोकांमध्यें गणना होते. सर विल्फ्रिड लॉरियरसारखे मुत्सद्दी कानडामध्यें झाले आहेत. लॉर्ड डर्हाम यांच्या वेळीं कानडामधील लोक किती मागसलेले होते, हें पुढील दोन उताऱ्यांवरून दिसून येईल. "लोअर कानडा-

मधील फ्रेंच लोकांमध्यें अशा ( म्युनिसिपल ) संस्थाहि नाहींत आणि सुधारणेमध्यें आपण होऊन पुढाकार घेण्याचा गुणहि नाहीं. हरएक बाबतींत सरकारावर अवलंबून राहण्याची संवय जडल्याकारणानें स्वतः-करितां कांहीं करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नाहीं, मग सरकारला मदत करण्याची गोष्ट तर दूरच राहिली!" "कानडामध्यें वसाहत झाली, त्या वेळीं फ्रान्समध्यें ज्या संस्था होत्या त्यांचें धोरण, यूरोपांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांतील संस्थांपेक्षां, बहुजनसमाजाची बुद्धि व स्वातंत्र्य यांचा कोंडमारा करण्याचें होतें. कानडामधील वसाहतवाले अटलांटिक महासागर ओलांडून आले, ते या संस्था, अर्थात् त्या कल्पना, आपल्याबरोबर घेऊन आले. त्यांच्यावर तशाच प्रकारचा एकसूत्री, अव्यवस्थित व सुधारणेला विन्मुख असा अम्मल चालू होता. त्यांना आपल्या प्रांताच्या राज्यव्यवस्थे-मध्यें मत देण्याचा किंवा आपल्या राज्यकर्त्यांना सल्ला देण्याचा अधि-कार नव्हता; इतकेंच नव्हे, तर म्युनिसिपल बाबतींतहि सर्वांनीं मिळून अधिकार चालविण्याची त्यांना मोकळीक नव्हती. मध्यवर्ती सरकारच म्युनिसिपल कारभाराहि पाहत असे, व व्यवस्थेच्या नांवाखालीं त्याकडे दुर्लक्ष्य करीत असे." "या लोकांवर धर्माधिकारी आपलें प्राचीन काळचें वर्चस्व चालवीत असत. शिक्षणाची कांहींहि तरतूद केलेली नव्हती आणि लोकांना शिक्षणाची आवश्यकता वाटत नसल्यामुळें त्या बाबतींत सरकारची कानउघाडणी करण्याचा प्रयत्नहि लोकांकडून होत नसे." "जमीन सुपीक असल्यामुळें स्वतःच्या सुखसोयी वाढविण्याची जी पहिली बाब, तींतच काय ती त्यांची प्रगति झाली होती. त्याच्या-पलीकडे कसलीच सुधारणा नव्हती. पूर्वींच्याच संस्था कायम ठेवून हे लोक तसेच अशिक्षित, कर्तृत्वशून्य व अप्रागतिक राहिले."

यांपेक्षांहि विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे फ्रेंच व इंग्लिश लोक यांचें एकमेकांशीं असलेलें शत्रुत्व ही होय. दोन जातीं-मधील अशा शत्रुत्वाचें उदाहरण हिंदुस्थानामध्यें क्वचित्च सांपडेल. सर जेम्स क्रेग यांनीं लिहिलें आहे: "आमच्यामधील भेदरेषा अगदीं पूर्ण-

पणें उमटलेली आहे. मैत्री, प्रेमभाव यांचें कोठें नांवहि आढळावयाचें नाहीं. एकमेकांशीं दळणवळणसुद्धां नाहीं म्हटलें तरी चालेल." लॉर्ड डर्हाम म्हणतात: "एकाच राज्यांत दोन जाती एकमेकांच्या उरावर बसण्याचा प्रयत्न करीत असलेल्या मला दिसल्या. त्यांमध्यें तत्त्वांवरून नव्हे, तर जातीवरून झगडा चालत असल्याचें मला आढळून आलें." "कोणत्याहि मोठ्या युरोपियन राष्ट्रांतील लोक एकमेकांपासून स्वभावानें व प्रकृतीनें इतके भिन्न, भाषा, कायदे व राहणीची पद्धत यांच्या बाबतींत परस्परांपासून इतक्या वेगळ्या स्वरूपाचे, अथवा स्वाभाविक गैरसमज, मत्सर व द्वेष उत्पन्न करण्यास यापेक्षां विशेष अनुकूल परिस्थितींत असलेले, आढळून येणें जवळ जवळ अशक्य आहे." लोकनियंत्रित राज्यव्यवस्था अमलांत आल्यावरहि पुष्कळ वर्षेपर्यंत राजकीय द्वेष किती तीव्रतेनें चालू होता याची कल्पना येण्यास पुढील उदाहरण पुरें आहे. सन १८४९ मध्यें तत्पूर्वीच्या बंडांत स्वतःचा कांहीं अपराध नसतां ज्या लोकांना नुकसान सोसावें लागलें होतें त्यांना त्या नुकसानीबद्दल भरपाई देण्यासंबंधाचें बिल पास झालें. त्या वेळचे गव्हर्नर-जनरल लॉर्ड एल्जिन यांनीं त्याला संमति दिली. परंतु इंग्लिश लोकांचाच बहुतेक भरणा असलेल्या टोरी पक्षानें, 'बंडखोरांना पैसे द्यावयाचे नाहींत' असा जोरानें आक्षेप घेतला आणि त्यांच्या या विरोधाची मजल येथवर गेली कीं, कानडा देश खालसा करण्यांत यावा अशा अर्थाचा एक जाहीरनामाहि त्यांनीं प्रसिद्ध केला! मॉंट्रील पार्लमेंटची इमारत जाळून टाकण्यांत आली आणि पुष्कळ पुस्तकांचा व दफ्तरांचा नाश करण्यांत आला. लॉर्ड एल्जिन यांनीं बिलाला संमति दिली म्हणून त्यांचाहि अत्यंत वाईट प्रकारें उपमर्द करण्यांत आला.

मोठी धडपड करून कानडाला जें मिळालें तें ऑस्ट्रेलियाला अल्पायासानें प्राप्त झालें. कारण त्या वेळीं वसाहतींसंबंधाच्या ग्रेटब्रिटनच्या धोरणाला उदारपणाचें वळण लागलें होतें आणि वसाहतींच्या कारभाराचा प्रश्न सोडविण्यास तेथें लोकनियंत्रित राज्यव्यवस्था स्थापन करणें, हाच काय तो योग्य उपाय होय अशी समजूत झाली होती. त्या

वेळच्या पुष्कळ मुत्सद्यांची अशी समजूत होती कीं, कलोनियल ऑफिसच्या ( वसाहतखात्याच्या ०) बंधनांतून वसाहती एकदां मुक्त झाल्या म्हणजे त्या इंग्लंडचा अंमल झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य जाहीर करितील. तसें झालें म्हणजे एकपरी बरेंच होईल, असेंहि त्या मुत्सद्यांना वाटत असे. परंतु तो त्यांचा समज सपशेल चुकला. जेथें जेथें लोकांना स्वराज्य देण्यांत आलें आहे तेथें तेथें साम्राज्यसत्ता आणि तिच्या छत्राखालीं असलेलीं, परंतु अंतर्गत राज्यव्यवस्थेमध्यें स्वतंत्र असलेलीं, मांडलीक राज्यें यांच्या दरम्यानचा संबंध सलोख्याचाच राहिलेला आहे. हिंदुस्थानांत इंग्लंडनें राजकीय औदार्य दाखविलें तर हिंदी लोक कृतघ्नपणानें वागून त्या औदार्याची फेड करतील अशीं अशुभ भविष्यें वर्तविणाऱ्या लोकांनीं वरील गोष्टीपासून धडा घेण्यासारखा आहे.

सन १८५३ व १८५९ यांच्या दरम्यान ऑस्ट्रेलियामधील संस्थानांना लोकनियंत्रित राज्यव्यवस्थेचे हक्क देण्यांत आले. फक्त पश्चिम ऑस्ट्रेलियाला मात्र ते हक्क सन १८९० सालीं मिळाले. १८५० सालीं ऑस्ट्रेलियामधील एकंदर लोकसंख्या २,६६,००० इतकी होती. सन १८६० सालीं ती ३,४९,००० झाली. ऑस्ट्रेलियाच्या वसाहतीची सुरवात इंग्लंडांतील गुन्हेगार लोकांना शिक्षा भोगण्यासाठीं तेथें पाठविण्यांत येऊं लागल्यापासून झाली हें प्रसिद्धच आहे. एक इतिहासकार म्हणतो: " आरंभीं कांहीं वर्षेपर्यंतचा या वसाहतींचा इतिहास म्हणजे एका मोठ्या तुरुंगाचाच इतिहास होय. " याउपर ऑस्ट्रेलियामध्यें गुन्हेगार लोकांना काळ्या पाण्यावर पाठविण्यांत येऊं नये, असें १८४० सालीं वसाहतखात्याच्या सेक्रेटरींनीं जाहीर केलें. १८५१ सालीं सोन्याची पहिली खाण येथें सांपडली व तेव्हांपासून या वसाहतीच्या आर्थिक उत्कर्षाला आरंभ झाला. लोकसंख्या झपाट्यानें वाढूं लागली. या वसाहतींत येणारे लोक–अर्थात्च वरच्या दर्ज्याचे–संस्कृतिसंपन्न व अभिरुचिसंपन्न नव्हते. बहुतेक लोक नशीब काढण्यासाठीं साहसास प्रवृत्त झालेले सट्टेबाज व पोटार्थी कामकरी होते. यास्तव अशा देशांतील राजकारणाचें

स्वरूप इतर देशांतल्या राजकारणापेक्षां वेगळ्या प्रकारचें असावयाचें. इंग्लंडांतील राजकीय पक्षांची पद्धति व मंत्रिमंडळाकरवीं राज्य चालविण्याची पद्धति यांचें बीं येथें रुजावयास पुष्कळ काळ लागला. १८५४ व १८९० यांच्या दरम्यान, अधिकारारूढ झालेल्या कोणत्याच मंत्रिमंडळाला फार दिवस अधिकारावर राहण्याची खात्री नसे. "दक्षिण ऑस्ट्रेलियामध्यें सदतीस वर्षांच्या मुदतींत मंत्रिमंडळामध्यें चाळीस वेळां फेरबदल झाला. न्यू झीलँडमध्यें पहिल्या चार मंडळांचा, तीं स्थापन होऊन थोडे दिवस लोटले नाहींत तोंच, अंत झाला. १८८४ सालीं वेलिंग्टनमध्यें तीन आठवडे भयंकर खळबळ उडून गेली होती. या तीन आठवड्यांच्या मुदतींत लागोपाठ तीन मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. सन १८९४ सालीं सर जॉर्ज टर्नर हे अधिकारारूढ होईतोंपर्यंत व्हिक्टोरियामधील कोणत्याच प्रधानमंडळाच्या हातांत सतत पांच वर्षें राज्यसूत्रें राहिलीं नव्हतीं. तीन वर्षें फक्त दोन मंत्रिमंडळांनीं टिकाव धरला होता. न्यू साउथ वेल्समध्यें तर अधिकाराची आयुर्मर्यादा त्याहूनही थोडी होती. १८९४ सालीं रीड हे जागेवर रुजू होण्याच्या पूर्वी पार्क्स याच एका प्रधान मंत्र्याला आपला अधिकार चार वर्षेपर्यंत कसाबसा संभाळतां आला. सर हेन्‍री यांनीं एकदां हरतऱ्हा करून तसा टिकाव धरला; बाकी कोणाचीहि कारकीर्द दोन वर्षें नऊ महिन्यांपेक्षां अधिक झाली नाहीं." मंत्रिमंडळांच्या अस्थिरपणाचें मूळ राजकीय पक्षांच्या अस्थिरपणामध्यें होतें. राजकीय पक्ष आस्तित्वांत येऊन त्यांना व्यवस्थित स्वरूप येण्यास बराच काळ लागला. दरम्यान, राजकीय व्यवस्थेंत गमतीचे प्रकार घडून येत असत. त्यांचें मि. रीव्हज़ यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे: "जाहीर सभांमध्यें उमेदवार लोक कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधानें विशिष्ट धोरण स्वीकारण्याला वचनबद्ध होत असत, आणि त्यांची कोणत्या ना कोणत्या तरी पुढाऱ्यांच्या अनुयायांमध्यें गणना होत असे. परंतु त्या पुढाऱ्यांना धाब्यावर बसविण्याचे प्रसंग वरचेवर येत आणि त्यांचा भरपूर फायदाहि घेतला जाई. सभांमध्यें दिलेलीं वचनें शब्दार्थानें पाळण्यांत

येत, परंतु भावार्थदृष्ट्या त्यांचा भंग करण्यांत येत असे. इतकेंच नव्हे, तर मतदारांचें अज्ञान व औदासीन्य यांच्यामुळें, तीं वचनें अजिबात विसरून जाणेंहि शक्य असे. प्रत्यक्ष लांचलुचपत फारशी नसे, परंतु आपआपल्या जिल्ह्यांना सरकारांतून पैसे मिळविण्याकरितां कांहीं लोक आज या तर उद्यां त्या मंत्रिमंडळाला पाठबळ देत असत. त्यांच्यापेक्षांहि स्वार्थपरायण लोक सत्याची चाड सोडून केवळ सरकारी नोकरी मिळविण्याकरितां पाहिजे त्या पक्षाला जाऊन मिळत असत, आणि आपल्या पूर्वीच्या पक्षाला निःशंकपणें सोडीत असत. कांहीं सभासद स्वतंत्र बाण्याचे होते. हे लोक प्रसंगविशेषीं अतिशय प्रामाणिकपणानें वागत हें खरें, परंतु पुष्कळ वेळां त्यांचें वर्तन अगदीं उलट प्रकारचें होई. एकंदरींत, येथील पार्लमेंटमध्यें पक्षभेद स्पष्ट स्वरूपाचे व विशिष्ट तत्त्वांना अनुसरून असे नव्हते, त्यामुळें कायमपणा असा कोठेंच नव्हता. आज जो आपला शत्रु आहे तो कदाचित् उद्यां आपला मित्र होईल आणि आज जो मित्र आहे तो कदाचित् उद्यां आपला शत्रु होईल, असें मानून चालणें हेंच अशा स्थितींत शहाणपणाचें समजलें जाई. ”

दक्षिण आफ्रिकेमध्येंहि स्वराज्याचे सुपरिणाम उत्कृष्ट रीतीनें दिसून आले आहेत. सर हेनरी कँपबेल बॅनरमन यांच्या प्रमुखत्वाखालील इंग्लंडांतील मंत्रिमंडळानें नवीन हस्तगत केलेल्या बोअर संस्थानांना स्वायत्त शासनाधिकार देण्याचें वचन अंमलांत आणण्याचें धैर्य दाखविलें, तेव्हां त्याचे अनिष्ट परिणाम होतील असें पुष्कळांनीं भाकित केलें होतें. राजकीय घटनेच्या बाबतींत हा जो महत्त्वाचा प्रयोग करून पाहण्यांत यावयाचा होता तो कितपत यशस्वी होईल याविषयीं पुष्कळ शंका होती. बोअर लोकांचा शेतकीचा धंदा, त्यांच्या असंस्कृत कल्पना, अज्ञान व एकंदरींत सुधारणेचा अभाव, त्याचप्रमाणें थोड्या दिवसांपूर्वीच त्यांचें ब्रिटिश लोकांशीं असलेलें शत्रुत्व यांच्यामुळें अविश्वास वाटणें स्वाभाविक होतें. बोअर व ब्रिटिश यांच्या दरम्यान झालेल्या कांहीं अनिष्ट गोष्टी वगळल्या तर एकंदरींत दक्षिण आफ्रिकेंतील संस्थानांची, यूनियननंतर

प्रगतिच झाली व त्यांची विशेष भरभराट झाली असेंच दिसून येईल. डी वेटनें बंड केलें असतांहि दक्षिण आफ्रिकेंतील लोकांनीं महायुद्धामध्यें जी राजनिष्ठा दाखविली तिच्यावरून त्यांना ग्रेटब्रिटननें दिलेलें राजकीय स्वातंत्र्य किती प्रिय झालें आहे तें स्पष्टपणें दिसून येतें.

## इंग्लंड.

हिंदुस्थानाला स्वराज्यसुखाचा लाभ होऊं नये अशी ज्यांची इच्छा आहे ते लोक हिंदी लोकांच्या स्थितीकडे केवळ दोषैकदृष्टीनेंच पाहत असतात. कोणत्याहि देशाचें असें एकांगी परीक्षण केलें तर त्याचें काळेंकुट्ट चित्र रेखाटणें कठिण नाहीं. जेथें स्वतंत्रता इतक्या दीर्घकाल नांदत आहे त्या खुद्द इंग्लंड देशाचीच गोष्ट घ्या. सन १८३२ पूर्वी इंग्लंडची राजकीय स्थिति अतिशय मागसलेली होती, हें प्रसिद्ध आहे. पार्लमेंट म्हणजे लोकप्रतिनिधींची संस्था असें त्या वेळीं सहसा म्हणतां आलें नसतें. सार्वजनिक बाबतींत खाजगी फायदा करून घेण्याचे व लांच-लुचपतीचे प्रकार सार्वत्रिक होते. बहुजनसमाज अशिक्षित होता, (शिक्षणा-संबंधाचा कायदा १८७० सालीं पास झाला), व त्यामुळें स्वतःचें हिताहित योग्य रीतीनें ओळखून मतें देणें लोकांना शक्य नव्हतें. “ राष्ट्राची स्वराज्यविषयक पात्रता, मंत्रिमंडळें व पार्लमेंटें यांना पुरवठा करण्यापुरते मूठभर सार्वजनिक कार्यकर्ते लोक असण्यावर अवलंबून नाहीं, तर ती मतदारांच्या संघांवर अवलंबून असते; तशी पात्रता असण्यास राज्यकारभारदक्ष असे कर्तृत्ववान् पुरुष निवडण्याची खुद्द जनतेमधील बऱ्याचशा व्यक्तींना पात्रता असावी लागते, ” हें मि. कर्टिस यांचें The Problem of the Commonwealth या पुस्तकामधील मत खरें मानलें तर इंग्लंडला तशी पात्रता येऊन फारशीं वर्षें झालीं नाहींत, असेंच म्हटलें पाहिजे. सन १८३५ मध्यें एका पार्लमेंटरी कमिशननें सादर केलेल्या रिपोर्टांत तत्कालीन म्युनिसिपालिट्या व म्युनिसिपालिटीची व्यवस्था असलेलीं शहरें यांच्या स्थितीचें अत्यंत अप्रशंसापर वर्णन आहे. त्यासंबंधानें नमुन्यादाखल तीनच उतारे बस्स होतील. ते उतारे लांब

आहेत; परंतु हिंदी लोकांच्या चारित्र्यावर दोषारोप करण्याकरितां आणि ते स्वराज्याला अपात्र आहेत असें ठरविण्याकरितां हिंदुस्थानांतील स्थानिक संस्थांच्या दोषांचा जो उपयोग करण्यांत येतो तो लक्ष्यांत घेतां, सर्व मनुष्यजातींमध्यें—स्वातंत्र्याच्या माहेरघरीं वास्तव्य करणाऱ्या लोकांमध्येंहि—तेच दोष भरलेले आहेत, याचें माप भरपूर पुराव्यानिशीं टीकाकारांच्या पदरांत घालणें जरूरीचें आहे. रेडलिक व हर्स्टकृत Local Government in England या सर्वमान्य ग्रंथांतून पुढील उतारे घेतले आहेत.

“ कॉर्पोरेशनें हीं स्वतःला वेगळ्या व विशिष्ट लोकांच्याच संस्था समजतात आणि शहरांतील लोकहि त्यांना तसेंच मानतात. ज्या ज्या शहरांचीं तीं कार्पोरेशनें असतात, त्या त्या शहरांमध्यें त्यांना सत्ता व विशेष सवलती असतात; परंतु बहुतेक ठिकाणीं कॉर्पोरेशन व लोक यांच्या दरम्यानच्या हितसंबंधाचें तादात्म्य नामशेष झालेलें असतें. कांहीं कॉर्पोरेशनांबद्दल असें म्हणण्यांत येतें कीं, या लोकांच्याच संस्था आहेत. पण लोक म्हणजे कोण ? कांहीं विशिष्ट मतदारांच्या या संस्था आहेत व ते मतदार जनतेपैकींच असतात, एवढ्यावरूनच जर या लोकांच्या संस्था असें म्हणावयाचें तर शब्दांचा फार ओढूनताणून अर्थ करावा लागेल. म्युनिसिपल कारभारामध्यें ज्यांचा हितसंबंध आहे आणि तो कारभार चालविण्याची ज्यांना सर्वांशीं पात्रता आहे, परंतु कायद्यानें तो अधिकार ज्यांस दिलेला नाहीं, असे शेंकडों प्रतिष्ठित लोक प्रत्येक शहरीं आहेत. या लोकांच्या मानानें कायद्यानें अधिकार असलेले लोक फारच अल्पसंख्याक आहेत. डेव्हनपोर्टसुद्धां धरून प्लायमथची लोकसंख्या ७५,००० पेक्षां जास्त असून फ्रीमेन—कॉर्पोरेशनच्या कारभारांत अधिकार असलेले लोक—अवघे ४३७ आहेत आणि त्यांतील १४५ लोक तेथें राहणारे नाहींत. नॉरिचमध्यें घरदारवाल्या व कर भरणाऱ्या लोकांपैकीं पुष्कळांना म्युनिसिपल संस्थेमधून वगळलेलें असून निराधार, भाडोत्री व जे कोणतेहि कर अथवा पट्ट्या देत नाहींत, अशांनाच फ्रीमेनचे अधिकार चालविण्यास मोकळीक आहे. अशाच लोकांचा कॉर्पोरेशनमध्यें पुष्कळ भरणा आहे

इप्स्विचमध्यें २०,००० पेक्षां अधिक लोकवस्ती असून त्यांतील एकपंचावन्नांश लोक काय ते फ्रीमेन आहेत. या एकपंचावन्नांश लोकांपैकीं एकतृतीयांश लोकांवर कांहीं कर नाहीं व ज्यांच्यावर कर बसलेला आहे त्यांपैकीं पुष्कळांना कराची माफी आहे, आणि यांपैकीं एकनवमांश लोक निराधार आहेत. या शहरांतील कराच्या आकारणीस पात्र झालेल्या मिळकतीपैकीं अकरा बारांशांपेक्षां अधिक मिळकतीच्या मालकांस कॉर्पोरेशनमधून वगळलें आहे. ज्यांचें भाडें सालीना चार पौंडांपेक्षां अधिक असतें त्यांच्यावर म्युनिसिपालिटीच्या कामाकरितां एका स्थानिक कायद्याच्या अन्वयें कर बसविला जातो. अशा प्रकारें ज्यांच्यावर कर बसविण्यांत आलेला आहे, त्यांच्यापैकीं एक पंधरांशांपेक्षां कमी लोक फ्रीमेन आहेत. सालीना पांच हजार पौंडांपेक्षां शहरांतील करांचें उत्पन्न अधिक असून एकंदर रकमेच्या विसांशापेक्षां कमी रक्कम फ्रीमेनकडून दिली जाते."

"सार्वजनिक कामाकडे आपल्या शिलकेचा विनियोग करण्याची जबाबदारी बहुतेक कोणतेंच कॉर्पोरेशन मान्य करीत नाहीं. अशा प्रकारचा खर्च म्हणजे सार्वजनिक उत्पन्नाचा सदुपयोग असें समजण्याऐवजीं खाजगी औदार्यबुद्धीनें प्रेरित झालेलें हें कृत्य असें मानण्याकडेच प्रवृत्ति आहे. सार्वजनिक कामीं आपला पैसा खर्च केल्यास त्या संस्था लोकांवर उपकार केल्याची मोठी प्रौढी मिळवितात; तें आपलें कर्तव्यच आहे असें त्यांना वाटत नाहीं. रिपोर्टांतील आणखी एक उतारा वाचून पैशाचा कसा विनियोग होत असे हें कळून येईल "साधारणतः कॉर्पोरेशनच्या फंडाचा म्युनिसिपल कामांकडे म्हणजे पोलिसची चांगली व्यवस्था ठेवून शांततेचें संरक्षण करणें, शहरावर पाहरे ठेवणें अगर शहरांत रोषनाई करणें, वगैरे कामांकडे अंशतः उपयोग करण्यांत येतो. या पैशाचा उपयोग पुष्कळ वेळां मेजवान्या झोडण्याकडे आणि निरुपयोगी अमलदारांचे पगार देण्याकडे होत असतो. जेव्हां सार्वजनिक इमारती वगैरे बांधणें किंवा स्थानिक सुधारणेचीं दुसरीं कामें करणें वगैरे सार्वजनिक कामीं पैसा खर्चिला जातो तेव्हां वाजवीपेक्षां किती तरी पट फाजील खर्च केला जातो. जाहीर

रीतीनें मक्ता न दिल्यामुळें आणि योग्य अंदाज केल्याशिवाय कामास सुरुवात केल्यामुळें एक्झीटरमध्यें असा प्रकार घडून आला आहे. स्थानिक संस्थांकडून निष्काळजीपणामुळें अशा गैरवाजवी गोष्टी घडतातच; परंतु त्या संस्थांमधील सभासद किंवा त्यांचे स्नेही व आप्त यांचा व्यक्तिविषयक फायदा करून देण्याची जी संधि असते तिच्यामुळेंहि पुष्कळ वेळां अशा गोष्टी घडत असतात. "

"शेवटीं खावंद सरकारला आम्हांस असें कळवावयाचें आहे कीं, स्थानिक व्यवस्थेच्या संस्था असलेल्या बहुतेक शहरांतील लोकांमध्यें त्या संस्थांविषयीं सर्वसाधारण असमाधान आहे व आमच्या मतें तें योग्य आहे; ज्यांच्या सत्तेला लोकमताचें नियंत्रण नाहीं, ज्यांचीं कृत्यें व वाटाघाटी गुप्त स्वरूपाच्या असल्याकारणानें त्यांच्यावर लोकमताचा दाब पडत नाहीं, अशा स्वयंनियुक्त म्युनिसिपल कौन्सिलांविषयीं लोकांच्या मनांत अविश्वास उत्पन्न झालेला आहे. न्याय व न्यायकर्ते यांविषयीं लोकांच्या मनांत विश्वास नसून न्यायकर्त्यांविषयीं लोकांना तिरस्कारच वाटतो. जो पैसा सार्वजनिक हितासाठीं खर्च झाला पाहिजे तो तसा खर्च न होतां त्याची उधळपट्टी केली जाते आणि व्यक्तींच्या खाजगी फायद्यासाठीं तो खर्च केला जातो; इतकेंच नव्हे, तर लोकांचें शील व नीतिमत्ता यांना विघातक अशा कामींहि त्याचा उपयोग करण्यांत येतो; यामुळें स्थानिक करांच्या बोजानें लोकांमध्यें असंतोष उत्पन्न झालेला आहे. इंग्लंड व वेल्स येथील म्युनिसिपल कॉर्पोरेशनांवर लोकांचा विश्वास नाहीं आणि लोकांच्या विश्वासाला व आदराला तीं पात्रहि नाहींत; त्या संस्था स्थानिक राज्यकारभाराचीं उपयुक्त व कार्यक्षम साधनें झालीं पाहिजेत व त्यांची सर्व बाजूंनीं पूर्ण सुधारणा करणें जरूरीचें आहे, असें कळविणें हें आमचें कर्तव्य आहे असें आम्ही समजतों. "

पुस्तककर्त्यानें पुढीलप्रमाणें टीका केली आहे. " या रिपोर्टांत दिलेल्या गोष्टी पाहिल्या म्हणजे या देशांतील मुत्सद्यांनीं व तत्त्ववेत्त्यांनीं राजकीय न्याय व राजकीय ज्ञान यांची मूर्तिमंत प्रतिमा म्हणून मानलेली

राज्यघटना या देशांत चालू असतां असले अंदाधुंदीचे प्रकार पिढ्यान्-पिढ्या व शेंकडों वर्षें कसे चालू राहिले याचें आश्चर्य वाटूं लागतें. रिपोर्टामध्यें जें चित्र दिलें आहे त्यावरून राज्यकारभाराची सर्वथैव अव्यवस्था आणि स्थानिक स्वराज्याच्या मूलभूत नियमांचा उच्छेद हींच दिसून येतात. हे परिणाम स्वाभाविक नसून सत्ताधारी मूठभर लोकांनीं अस्तित्वांत आणून कायम ठेवलेल्या भ्रष्ट राज्यनीतीचीं तीं कृत्रिम फळें होत. ट्यूडर्स व स्टूअर्टस् यांच्या कारकीर्दींत राजसत्तेनें जें उदाहरण घालून दिलेलें होतें त्याचेंच या सत्ताधारी कंपूनें अनुकरण केलें होतं व वर स्वतःच्या पदरच्या कांहीं क्लृप्त्याहि लादल्या होत्या. राजकीय हेतु साध्य करण्याकरितां स्थानिक राज्यव्यवस्थेचा असा मुद्दाम खेळखंडोबा करण्यांत आलेला होता. ”

स्त्रियांचें बंधविमोचन आणि कॅथोलिक पंथी लोकांवरील निर्बंधांचें निवारण या सुधारणा फार वर्षांपूर्वीं अमलांत आलेल्या नाहींत, हें पाहूनहि दोषैकदृष्टि टीकाकाराला विस्मय वाटेल. इंग्लंडांतील राजकारणांतील कूटमंडळ्या व निरनिराळ्या पक्षांच्या संस्था यांच्याकडून महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधानें मतदार लोकांमध्यें सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं जे गैरसमज पसरविण्यांत येतात आणि मतदाराला वस्तुस्थिति न समजतां तो जो भांबावून व गोंधळून जातो, तें पाहून कोणताहि निःपक्षपाती मनुष्य तीव्र नापसंतीच दाखवील. कोणताहि पक्ष अधिकारारूढ असला तरी पदव्या व मान यांचा जो क्रयविक्रय चालतो, तो पाहून त्याला वीट येईल. त्याच्या दृष्टीनें श्रीमंतांची चैनबाजी व वरिष्ठ दर्ज्याच्या लोकांतील भ्रष्टता हीं कडक टीकेला पात्र होतील. घटस्फोटाच्या कोर्टांत उघडकीस येणारे प्रकार आणि निरनिराळ्या रूपांनीं समाजांत चालू असलेली जुव्वेबाजी पाहून त्याच्या अंतःकरणाला धक्का बसेल व त्याला पराकाष्ठेचा संताप येईल. उद्योगधंद्यांच्या बाबीकडे पाहिल्यावर कारखाने व त्यांतील कामकरी यांची अतोनात गर्दी झाल्यापासून जी अनीति वाढते आणि कारखानदार व मजूर यांचे अनुक्रमें संघ व संप यांच्यामुळें दे-

शाच्या आबादानीचा पायाच कोसळून पडण्याची जी भीति उत्पन्न होते त्यांचा निर्विकारपणानें विचार करतां मन भयानें ग्रस्त झाल्यावांचून राहणार नाहीं. या सर्व गोष्टी पाहून त्याचें मन उद्विग्न झाल्यावर मद्यपानाचें व्यसन व त्याचे पशुवृत्तिवर्धक दुष्परिणाम, गरीब लोकांचें दारिद्र्य, गलिच्छपणा व नीतिभ्रष्टता, यांचा विचार त्याच्या मनांत आला म्हणजे तो पूर्ण निराश होऊन 'इंग्लंडांतील लोकांना स्वतंत्रपणें वावरूं देतां उपयोगी नाहीं' असे उद्गार काढील. इंग्लंडच्या बाबतींत जशी वरील दोषपरंपरा दाखवितां येते तशा प्रकारें हिंदी लोकांच्या खाजगी व सार्वजनिक आयुःक्रमांतील नुसत्या दोषांचाच जर कोणीं पाढा वाचला तर, ऐकणाराच्या मनावर साहजिकपणें असा परिणाम होईल कीं, ज्यांच्या संवर्धनानें व आचरणानें हिंदी लोक स्वराज्याची जबाबदारी वाहण्यास समर्थ होतील असे कोणतेहि सद्गुण त्यांमध्यें नाहींत असा त्यांचा ग्रह होऊन जाईल.

---

# पात्रता.

## सामान्य विवेचन.

आमच्या देशाला अनेक प्रकारच्या अवस्था दैवगतीनें प्राप्त झाल्या, तथापि द्राविड, आर्य व मुसलमानी या तिन्ही संस्कृती अगदीं पूर्वीच्या निर्भेळ स्वरूपांत जरी नाहींत तरी जोरदार स्वरूपांत आज कायम आहेत असें दिसून येतें. या प्रत्येक संस्कृतीमध्यें विशिष्ट प्रकारच्या राज्यव्यवस्थे-च्या पद्धती निर्माण झाल्या असून त्यांपासून लोकांचें हित झालेलें आहे. आधुनिक राज्यपद्धतींशीं तुलना करून पाहिल्यावर त्या पद्धतींमध्यें तितका जोम व तितकी पूर्णता दिसणार नाहीं. तसेंच, आजमितीस ज्या लोकसत्तात्मक व लोकनियंत्रित राज्यपद्धती आपल्याला माहीत झालेल्या आहेत तशा पद्धती पूर्वीं असल्याचेंहि दिसत नाहीं. तथापि, आमच्या-मध्यें पूर्वींपासून आमच्या विशिष्ट पद्धतीची व आमच्याच लोकांच्या द्वारें चालू असणारी राज्यव्यवस्था अस्तित्वांत होती. कित्येक वेळां ती व्यवस्था हतबल झाली असेल, तिचें स्वातंत्र्य मर्यादित झालें असेल, विपत्तीच्या भाराखालीं तिची अवनति झाली असेल, तिच्यामुळें परदेशीय शत्रूंच्या पुढें जनता दुर्बळ, विस्कळित व असहाय झाली असेल; परंतु राज्यव्यवस्था साफ नाहींशी मात्र झाली नव्हती. एतद्देशीय संस्थानां-मध्यें प्राचीन परंपरांना अनुसरून ती व्यवस्था आजमितीसहि चालू आहे; मात्र त्या परंपरांचें थोडेंबहुत रूपांतर झालेलें आहे, ब्रिटिश वळणाला अनुसरून परिस्थितीप्रमाणें त्यांत फेरबदल झालेले आहेत; परंतु एवढें खरें कीं, पूर्व परंपरा एकंदरींत कायम राहिलेली आहे. हल्लींच्या काळीं एतद्दे-शीय संस्थानांत दिवाण व दुसरे अंमलदार यांनीं आपल्या मर्यादित अधिकारक्षेत्रांमध्यें जी कामगिरी बजाविली आहे तिची ब्रिटिश हिंदुस्था-नांतील पाश्चात्य मुत्सद्यांनीं बजाविलेल्या कामगिरीशीं बिनदिक्कत तुलना करतां येईल.

## उच्च अधिकाराचीं कामें.

हिंदी लोकांना जेव्हां जेव्हां संधि देण्यांत आली तेव्हां तेव्हां त्यांनीं आधुनिक संस्था आधुनिक तत्त्वांना अनुसरून चालविण्याची आपली पात्रता निदर्शनास आणून दिलेली आहे. न्यायखात्याप्रमाणें अंमलबजावणी खात्यांतहि, चढाओढीच्या परीक्षेनें प्रॉव्हिन्शल सर्व्हिसमध्यें दाखल झालेल्या लोकांनीं इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील लोकांच्या बरोबरीनें आपली लायकी शाबीद केलेली आहे. हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सिलमध्यें ज्या हिंदी गृहस्थांची पहिल्यानें नेमणूक करण्यांत आली त्यांनीं लॉर्ड मोर्लेसारख्या गुणज्ञ मुत्सद्याकडूनहि वाहवा मिळविली. लॉर्ड मिंटो व लॉर्ड हार्डिंग यांनीं आपल्या हिंदी मंत्र्यांच्या सल्ल्यापासून व सहकारितेपासून जी मदत मिळाली तिच्याबद्दल मनःपूर्वक वाखाणणी केली आहे. परलोकवासी नाम. कृष्णस्वामी अय्यर यांचा जो पुतळा उभारण्यांत आला त्याला हिंदी लोकांप्रमाणें युरोपियन लोकांनींहि वर्गणी दिली आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याबरोबर काम केलेल्या युरोपियन लोकांनीं त्यांच्याविषयीं अत्यंत प्रशंसापर उद्गार काढले. परलोकवासी नाम. गोखले यांच्या अंगीं इंग्लिश लोकांवर छाप बसविणारे पुष्कळ गुण होते आणि त्यांना राष्ट्राराष्ट्रांमधील मोठ्या महत्त्वाच्या अशा बाबींसंबंधानें दक्षिण आफ्रिकेंतील सरकाराशीं, साधारण खाजगी नात्यानें कां होईना, वाटाघाट करण्याचा अश्रुतपूर्व मान मिळाला होता. हें कठिण व नाजूक काम ना. गोखले यांनीं इतक्या चातुर्यानें, समतेनें व मुत्सद्दीगिरीनें बजावलें कीं, ते त्या प्रकरणाशीं संबंध असलेल्या सर्व पक्षांच्या कृतज्ञतेस व आदरास पात्र झाले.

कार्यकारी कौन्सिलांमध्यें हिंदी लोकांची नेमणूक करण्याच्या सूचनेसंबंधानें बोलतांना १९०८ सालीं लॉर्ड मोर्ले म्हणाले: " या बाबतींत आम्हांला मुळींच अनुभव नाहीं असें नाहीं. कारण सुमारें एक वर्षापूर्वीं इंडिया ऑफिसांत कौन्सिलांत दोघां हिंदी गृहस्थांची नेमणूक मला सुदैवानें करतां आली. यांचा परिणाम काय होईल याविषयीं माझ्यापाशीं पुष्कळांनीं भीति व्यक्त केली होती; परंतु ती भीति निरर्थक

होती असें आतां दिसून आलें आहे. सदरील दोघे हिंदी सभासद व यांच्याबरोबर काम करणारे दुसरे गृहस्थ यांचें एकमेकांशीं कधींहि बिनसलें नाहीं. हिंदी सभासदांनीं आपलें काम उत्कृष्ट रीतीनें बजाविलें आणि हिंदी प्रश्नांच्या बाबतींत हिंदी लोकांच्या दृष्टीनें त्यांजकडून सल्ला देण्यांत आल्यामुळें मला अतोनात फायदा झाला. जणूं काय कलकत्त्यांत राहूनच मी हिंदी लोकस्थितीचा विचार करीत आहे, असें अशा वेळीं मला वाटलें." कार्यकारी कौन्सिलमध्यें हिंदी सभासद नेमण्याविषयीं प्रतिपादितांना लॉर्ड मोर्ले म्हणाले: "हिंदी लोक हायकोर्टाचे जज्ज होऊं शकतात. ॲक्टिंग चीफ जस्टिसच्या जागींहि हिंदी गृहस्थांच्या नेमणुका झालेल्या आहेत. हिंदुस्थानांतील देशी संस्थानांचा कारभार चालविण्यांतहि त्यांनीं नांव मिळविलें नाहीं असें त्यांच्या योग्यतेविषयीं कोणी म्हणूं शकणार नाहीं, आणि देशी संस्थानांमध्यें तर त्यांना जास्तच बौद्धिक व नैतिक साधनसंपत्तीचा उपयोग करावा लागतो." सर कृष्णगोविंद गुप्त यांना १९०५ सालीं देण्यांत आलेल्या एका मेजवानीच्या वेळीं मि. चार्लस रॉबर्टस् म्हणाले: "इंडिया कौन्सिलमध्यें सर कृष्णगोविंद यांची प्रथम नेमणूक झाली, त्या वेळीं या कौन्सिलांत सभासद म्हणून हिंदी गृहस्थांना नेमण्याची जी सुधारणा लॉर्ड मोर्ले यांनीं अंमलांत आणली ती प्रयोगवजा होती. परंतु आतां ती प्रयोगावस्था राहिलेली नाहीं. ही सुधारणा निःसंशय यशस्वी झालेली असून तिच्यांत नवीन असें कांहीं वाटेनासें झालें आहे. इंडिया कौन्सिलमध्यें हिंदी सभासद असणें इष्ट होतें, इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानचा राज्यकारभार योग्य रीतीनें चालविण्यास त्या गोष्टीची अगदीं जरूरीच होती, अशी माझी समजूत आहे." १९१० सालीं सिमला येथें युनायटेड सर्व्हिस क्लबमध्यें बोलतांना लॉर्ड मिंटो म्हणाले: "मि. सिंह हे व्हाइसरॉयच्या कार्यकारी कौन्सिलमधील पहिले हिंदी गृहस्थ होत. कलकत्त्याच्या कायदेपंडितांमध्यें त्यांनीं आपल्या अंगच्या अलौकिक गुणांनीं अग्रस्थान मिळविलें आहे, ही गोष्ट मीं येथें सांगितली पाहिजे असें नाहीं. त्यांनीं हिंदुस्थान सरकारला जें महत्त्वाचें

साहाय्य केलें, त्याचा उल्लेख करणें अत्यंत जरूर आहे. मला सल्ला देतांना त्यांनीं सर्वथैव निःपक्षपातीपणानें व उदात्त देशाभिमानानें जी कामगिरी बजावली तिजबद्दल मी त्यांचा आभारी आहें." 'लंडन टाइम्स' मध्यें सर व्हॅलेंटाइन चिरोल यांनीं सर एस. पी. सिंह यांच्या राजीनाम्याबद्दल खेद प्रदर्शित केला व असें म्हटलें कीं, व्हाइसरॉयच्या कार्यकारी कौन्सिलमध्यें हिंदी सभासद नेमणें शहाणपणाचें नाहीं, असें आपणां-प्रमाणें कित्येक लोकांना वाटत होतें, परंतु सर एस. पी. सिंह यांनीं आपलें काम इतक्या चांगल्या रीतीनें केलें कीं, वरील शंका बाळगणाऱ्या लोकांचेंहि त्यायोगें समाधान झालें.

सर सत्येंद्र प्रसन्न सिंह यांनीं व्हाइसरॉयांच्या कौन्सिलामधील आपल्या जागेचा राजीनामा दिला तेव्हां 'पायोनियर' पत्रानें पुढें दिल्याप्रमाणें विचार प्रदर्शित केले: "मि. सिंह यांनीं हिंदुस्थान सरकारचे मंत्री या नात्यानें आपलें कर्तव्य अत्यंत प्रामाणिकपणानें, सदसद्विवेक बुद्धीनें व उत्कृष्टपणें बजावलें; व आपल्या बरोबरीच्या अधिकाऱ्यांस त्यांनीं सरळपणानें व एकनिष्ठेनें आपला सल्ला वेळोवेळीं दिला, याबद्दल सिमला येथील सर्व अधिकारी लोक तत्परतेनें साक्ष देतील; हिंदुस्थान सरकारच्या अंतस्थ कारभारांतून ते आपलें अंग काढून घेणार, याबद्दल त्यांना सर्वांहून अधिक दुःख होत आहे. ही जागा स्वीकारण्यानें हिंदी लोकांच्या राजकीय हक्कांत महत्त्वाची भर पडत आहे, या भावनेनेंच त्यांनीं आपला किफायतशीर धंदा सोडून ही जागा पत्करली ही जाणीवहि सर्वत्रांस आहे. लॉर्ड हार्डिंग यांनीं सर सय्यद अली इमाम यांची प्रशंसा करतांना त्यांची कर्तव्यपरायणता, देशाभिमान व राजनिष्ठा यांचा निर्देश करून त्यांची सल्ला सरळपणाची असे व तिचा आपल्यास अतिशय उपयोग होत असे, असें सांगितलें. सर अली इमाम यांनीं पुष्कळ बिकट व भानगडीचे प्रश्न सोडविण्यास मदत केली, याबद्दल कौन्सिलांतील इतर सभासद साक्ष देतील, असें म्हणून लॉर्ड हार्डिंग यांनीं, "लढाई उपस्थित झाल्याच्या असाधारण स्वरूपाच्या काळीं निरनिराळ्या प्रश्नांच्या बाबतींत आमच्या धोरणाचा हिंदी लोकांच्या

वेगवेगळ्या वर्गाच्या मनावर काय परिणाम होईल हें एका सन्मान्य हिंदी गृहस्थाकडून कळण्याचा फायदा मला मिळाला," असें सांगितलें. लॉर्ड हार्डिंग यांनीं सर अली इमाम यांना आपल्या कौन्सिलचे व्हाइस प्रेसिडेंट नेमलें होतें आणि आपल्या हातीं असलेला अत्युच्च मान अशा प्रकारें सर अली इमाम यांना देतां आला याबद्दल त्यांनीं सदरील भाषणांत अतिशय समाधान प्रदर्शित केलें. सर अली इमाम यांनीं कायदे करण्याच्या बाबतींतच नव्हे तर इतर खात्यांतील दुसऱ्या नानाविध प्रश्नांसंबंधानेंहि कौन्सिलांत साहाय्य केलें, असेंहि लॉर्ड हार्डिंग यांनीं बोलून दाखविलें.

पर. नाम. कृष्णस्वामी अय्यर यांच्या सन्मानार्थ १९१२ सालीं मद्रास येथें भरलेल्या सभेंत सर मरे हॅमिक म्हणाले: " कायदे कौन्सिलांतील कामासंबंधीं मि. कृष्णस्वामी अय्यर यांच्याशीं माझी प्रथम ओळख झाली. त्यांची अचाट बुद्धिमत्ता व निर्दोष निर्णयशक्ति यांची आम्हां सर्वांच्या मनांवर छाप बसली. भानगडीच्या बाबतींत लहानसान तपशिलाच्या गोष्टींचें सुद्धां आकलन करण्याची त्यांची हातोटी पाहून प्रत्येकाला आश्चर्य वाटलें. नंतर ते कार्यकारी कौन्सिलचे सभासद झाल्यावर त्यांना मी माझे एक विश्वासू मित्र असें मानीत असें आणि त्यांत मला भूषण वाटे. एक वर्षपर्यंत त्यांच्याशीं नित्य संभाषण करण्याचा व दळणवळण ठेवण्याचा सुखदायक लाभ मला झाला. त्यांची लोकोत्तर बुद्धिमत्ता, असाधारण ग्राहकशक्ति आणि विशेषेंकरून सर्व लोकांशीं न्यायपूर्वक वागण्याविषयींची व आपल्या देशाच्या कल्याणाकरितां व प्रगतीकरितां आपल्या दृष्टीनें जें जें कांहीं सर्वोत्कृष्ट कार्य असेल तें करण्याची त्यांची उत्कट इच्छा यांच्यासंबंधानें मला अधिकाधिक कौतुक वाटूं लागलें. ते मोकळ्या मनानें दुसऱ्यांची वाखाणणी करीत, आपल्या स्नेह्यांसंबंधानें त्यांना अतिशय सहानुभूति व कळकळ वाटे, असा त्यांचा स्वभाव असल्याकारणानें त्यांचा सहवास म्हणजे माझ्या आयुष्यांतील एक अत्यंत आनंदकारक अशी स्मृति होय. मि. कृष्णस्वामी यांना निंदास्तुतीची पर्वा नसे; ते एकादा प्रश्न हातीं

घेत तेव्हां त्याचा पिच्छा पुरवीत, मित्रमंडळींशीं निष्ठापूर्वक वागत आणि त्यांची सल्ला नेहमीं शहाणपणाची असे. ”

त्याच सभेमध्यें सर जॉन ॲट्किन्सन म्हणाले: “ या पांच वर्षांतच मि. कृष्णस्वामी अय्यर यांच्याशीं माझी ओळख झाली. कायदेकौन्सिलामध्यें सरकारी कामानिमित्तानें त्यांच्याशीं माझी जी प्रथम ओळख झाली तिला पुढें मैत्रीचें स्वरूप प्राप्त झालें. या मैत्रीची स्मृति म्हणजे माझा एक अत्यंत प्रिय असा ठेवा आहे असें मी समजतों. मि. कृष्णस्वामी यांच्याशीं माझ्यापेक्षां पुष्कळ वर्षें आणि विशेष निकट असा ज्यांचा स्नेह होता, असे अनेक गृहस्थ आहेत. परंतु ज्यांच्या योगानें मि. कृष्णस्वामींच्या ठायीं इतकें सामर्थ्य व इतकी आकर्षणशक्ति प्राप्त झाली होती त्या त्यांच्या उज्ज्वल बुद्धिमत्तेची व प्रेमार्द्र हृदयाची ओळख पटण्याचा मलाहि योग आला होता. विशेषेंकरून सरकारी कामकाजांतच आम्हांस एकमेकांचा सहवास घडला व तें स्वाभाविकच होतें. कार्यकारी कौन्सिलांत त्यांची नेमणूक झाली तेव्हां त्यांना प्रथम राज्यकारभार चालविण्याचा अनुभव नव्हता. ‘ मी एक नुसता शिकाऊ माणूस आहें ’ असें नेमणूक झाल्यावर एक दोन दिवसांनीं ते मला म्हणाले होते. पण ते असले तसले शिकाऊ नव्हते ! सेक्रेटरीएटमधील कामकाजाच्या पद्धतींचीच नव्हे, तर त्यांच्यापुढें जे निरनिराळे अनेक भानगडीचे प्रश्न येत त्या सर्वांचा मुख्य मुद्दा व त्यांच्यामधील एकूणएक खांचखळगे यांचीहि ते किती झपाट्यानें माहिती करून घेत तें पाहिलें म्हणजे आश्चर्य वाटे चटकन मनाचा निश्चय करावयाचा, आपल्या मताला चिकटून राहावयाचें व जोरानें त्या मताचें समर्थन करावयाचें, ह्या गोष्टी त्यांच्या स्वभावाला अनुसरूनच होत्या; परंतु ते दुसरी बाजू ऐकून घ्यावयालाहि तयार असत. पुढें आलेल्या प्रश्नांचा सर्व दृष्टींनीं विचार करण्याची त्यांना नेहमीं उत्सुकता असे आणि आकुंचित दृष्टीनें व एकांगीपणानें विचार करणें त्यांना अशक्यच होतें. सारांश, ते स्वतःच्या निर्णयशक्तीप्रमाणें वागत तरी त्यांची दृष्टि सत्यान्वेषणाचीच असे. कार्यकारी कौन्सिलचे सभासद

या नात्यानें त्यांनीं आपलें काम कसें केलें याविषयीं येथें सविस्तर बोलण्याची आवश्यकता नाहीं. तें काम इतक्या उत्कृष्ट प्रतीचें होतें कीं, त्यामुळेंच, त्यांच्या मृत्यूनें आमची इतकी मोठी हानि झाली आहे असें आम्हांस वाटत आहे. त्यांच्या मृत्यूनें रिकामी पडलेली जागा योग्य रीतीनें भरून निघणें फार कठिण आहे. त्यांचें बुद्धिसामर्थ्य मोठें होतेंच, परंतु त्यांच्या चारित्र्यबलाविषयीं विशेष आदर व्यक्त केला पाहिजे असें मला वाटतें. चारित्र्यबलामुळेंच नुसत्या मद्रास इलाख्यांत नव्हे, तर सर्व हिंदुस्थान देशामध्यें, लोककल्याण करण्याचें एवढें सामर्थ्य त्यांना प्राप्त झालें होतें. त्यांचीं ध्येयें उदात्त होतीं आणि त्या ध्येयांना अनुसरून वागण्याची उत्कट इच्छा त्यांच्या ठायीं असे. ‘ बोले तैसा चाले ’ असें त्यांचें आचरण असे. गुळमुळितपणाचा स्वभाव त्यांना मुळींच खपत नसे. जी गोष्ट स्वतःला न्याय्य व योग्य वाटेल तिच्याकरितां अगदीं अंतःकरणापासून झटावयाचें, हा मि. कृष्णस्वामी यांच्या बहुमोल स्वभावांतील एक अत्यंत प्रशंसनीय विशेष होता. ”

## कायदे-कौन्सिलें.

कायदे-कौन्सिलांमध्यें लोकप्रतिनिधि नेमस्तपणानें व आत्मसंयमनपूर्वक वागले आहेत आणि त्यांच्या कर्तृत्वशक्तीला व उपयुक्ततेला घालण्यांत आलेल्या निर्बंधांमुळें त्यांना वैषम्य वाटत असलें तरी कोणत्याहि प्रसंगीं त्यांनीं शिष्टाचाराचा अतिक्रम केलेला नाहीं. इंग्लंड व वसाहती येथील कायदे करणाऱ्या सभांच्या इतिहासांत जे शोचनीय प्रसंग आढळून येतात त्यांप्रमाणें गैरशिस्तपणानें किंवा दांडगाईनें वागून त्यांनीं आपला मनोविकार व्यक्त केलेला नाहीं. त्यांच्या कामगिरीविषयीं आपलें उच्च मत लॉर्ड हार्डिंग यांनीं अनेकदां प्रदर्शित केलें आहे. देशांतील राजनीतिवर व राज्यव्यवस्थेवर त्यांच्या टीकेचा व सल्ल्याचा थोडाबहुत परिणामहि झालेला आहे. परंतु कायदे-कौन्सिलांच्या कामासंबंधानें लोकांच्या अपेक्षा इतक्या वाढल्या आहेत आणि आपल्या प्रतिनिधींच्या अल्प अधि-

कारांविषयीं त्यांच्या ठिकाणीं इतका तीव्र असंतोष उत्पन्न झाला आहे कीं, राजनीतीचें नियंत्रण, जमाबंदीची व्यवस्था व अधिकारिवर्गाचें नियमन करण्याची सत्ता प्राप्त झाल्याखेरीज दुसऱ्या कशानेंहि त्यांचें समाधान व्हावयाचें नाहीं. लॉर्ड हार्डिंग यांनीं म्हटलें आहे: "यंदां कौन्सिलांत झालेल्या वादविवादांमध्यें यापूर्वी कधींहि दिसून आला नाहीं इतका उच्च दर्जाचा मुत्सद्दीपणा व कर्तबगारी हीं आढळून आलीं, असें मला कांहींशा अभिमानानें व समाधानपूर्वक म्हणतां येईल. हे वादविवाद आत्मसंयमनपूर्वक आणि उभयपक्षीं शिष्टाचार व स्नेहभाव ठेवून झाले आणि कायदे करणाऱ्या सर्व संस्थांना तो एक कित्ताच झाला आहे, असें म्हटलें तरी चालेल." "जगाच्या निरनिराळ्या भागांत मला जो अनुभव आला आहे त्यावरून चर्चेमध्यें दिसून येणारा भारदस्तपणा व सभासदांमधील सलोखा यांच्या बाबतींत हें कौन्सिल दुसऱ्या कोणत्याहि कौन्सिलला हार जाणार नाहीं, असें मी म्हणतों."

## स्थानिक स्वराज्य.

म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांच्या बाबतींतहि आमची लायकी स्पष्टपणें दिसून आलेली आहे. सरकारच्या हातीं नियंत्रणसूत्रें असतांना आमच्या स्थानिक स्वराज्याचा आरंभ झाला, ही एकपरी सुदैवाचीच गोष्ट समजली पाहिजे. कारण त्यामुळें ग्रेटब्रिटनमधील तशा प्रकारच्या संस्थांमध्यें अनियंत्रित सत्तेमुळें दिसून आलेल्या अंदाधुंदीपासून व अव्यवस्थेपासून आम्ही बचावलों. परंतु उमेदवारीचा काळ गेल्यावरहि पुष्कळ वर्षेंपर्यंत बारीकसारीक बाबतींत सरकारचें नियंत्रण व देखरेख असणें हें स्थानिक स्वराज्यविषयक संस्थांच्या वाढीस विघातक आहे, आणि त्या संस्थांची वेसण काढून त्यांच्याकडे विशेष अधिकार सोंपविणें व उत्पन्नाच्या विशेष बाबी त्यांच्या स्वाधीन करणें जरूरीचें आहे, ही गोष्ट आतां सरकारच्याहि पूर्णपणें लक्ष्यांत आलेली आहे.

## पण बहुजनसमाजाचें काय ?

राज्यकारभारामधील विश्वासाच्या व जबाबदारीच्या जागांवर कामें करण्याइतकी आणि लोकहिताच्या संस्था चालविण्याइतकी पुरेशी बुद्धि व सार्वजनिक हिताविषयींची कळकळ सुशिक्षित लोकांमध्यें आहे, हें दाखविण्याचा आम्हीं आतांपर्यंत प्रयत्न केला आहे. कांहीं लोक ही गोष्ट कबूल करितील, परंतु लगेच म्हणतील कीं, बहुजनसमाज अज्ञान व असहाय आहे यामुळेंच प्रगतीला अडथळा येत आहे. देशांतील लाखों लोकांना शिक्षणाचा गंधहि नाहीं, ते दरिद्री आहेत आणि राजकीय बाबतींत त्यांना कसलाच अनुभव नाहीं, या गोष्टी खऱ्या आहेत. परंतु मोठ्या लोकवस्तीचा असा एकादा देश तरी जगांत आहे काय कीं, जेथील बहुजनसमाज साक्षर असून तो आपल्या मताधिकाराचा योग्य रीतीनें उपयोग करीत आहे ? सामान्य लोक सार्वजनिक प्रश्नांच्या चर्चेकडे योग्य रीतीनें लक्ष्य देऊन, ते चांगल्या रीतीनें समजून घेऊन, साधकबाधक प्रमाणांचा विचार करून मग निर्णय करितात, अशी वस्तुस्थिति कोठें तरी दिसून येते काय ? एकमेकांशीं चढाओढ करणाऱ्या उमेदवारांची निवड सामान्य जनता केवळ त्यांच्या लायकीवरूनच करिते काय ? पूर्वग्रहांच्या योगानें लोकांचा ओढा विशिष्ट पक्षांकडे किंवा माणसांकडे असत नाहीं काय ? वशिल्याचा परिणाम त्यांचेवर होत नाहीं काय ? आणि कळसूत्रें चाळविणारे लोक जसे नाचवितील तसे ते नाचत नाहींत काय ? लॉर्ड ब्राइस म्हणतात: " श्रोतृसमुदाय म्हणजे केवळ नमुनेदार नागरिकगण आहे, असें गृहीत करून जरी सभांमधील भाषणें होत असतात तरी सर्व ठिकाणच्या समाजामध्यें, केवळ शिकागोमध्येंच नव्हे, तर लिव्हर्पूलमध्यें अथवा लायन्झमध्यें अगर लिपझिग्मध्येंहि, बरेच मतदार इतके बेपर्वा व इतके अडाणी असतात कीं, त्यांना हालवून जागें करणें, पढविणें व मत देण्याकरितां ओढून आणणें जरूरीचें असतें, ही गोष्ट प्रत्येक मनुष्य जाणत असतो. " जे देश आजमितीस स्वयंसत्ताक आहेत त्यांमधील लोकांना सार्वत्रिक शिक्षणाचा लाभ झाल्यावरच मताधिकाराचा लाभ झाला हेंहि खरें नाहीं.

तर्शांत, हिंदुस्थान सरकारचे अधिकारी अथवा अभिमानी अगर कैवारी यांच्या तोंडीं तरी हा आक्षेप शोभण्यासारखा नाहीं. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्यासाठीं अद्यापि त्यांनीं म्हणण्यासारखें कांहींच केलेलें नाहीं आणि त्यांनींच पुनः देशांतले कायदेकानू करण्यासाठीं स्वतःचे प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळण्यास लोक पात्र नाहींत असें दाखविण्याकरितां, निरक्षतेचा मुद्दा पुढें आणावा, हें दुःखावर डागण्या देण्याप्रमाणेंच होय.

## जाती व पंथ.

हिंदुस्थानामध्यें धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे भेद असून पुष्कळ जाती व पंथ आहेत आणि प्रत्येक जात किंवा पंथ स्वतःला बाकीच्यांपासून भिन्न समजून अलगपणानें वागत असतो, असाहि एक मुद्दा पुढें आणण्यांत येतो. हिंदुस्थानामध्यें नानाविध पंथ व जाती आहेत, ही गोष्ट दुर्दैवानें खरी आहे. परंतु या गोष्टीमुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणींचा आमचे टीकाकार जो बाऊ करून दाखवितात तो मात्र खरा नाहीं. आमच्यांतील निरनिराळ्या जातींचे व पंथांचे लोक राजकीय बाबतींत एकमेकांशीं मिळूनमिसळून वागावयाला तयार नसतात, हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. शिक्षणाच्या प्रसारामुळें आणि सर्वांच्या अडचणी सारख्याच आहेत या जाणिवेमुळें निरनिराळ्या जातींमधील व पंथांमधील द्वेषमत्सराला झपाट्यानें आळा पडत आहे. अशा स्थितींत वेगवेगळ्या समाजांतील लोकांनीं सार्वजनिक कामांत एकदिलानें व सहकारितेनें वागण्याचे प्रसंग अधिकाधिक जुळवून आणणें हें राजकीय मुत्सद्यांचें एक कर्तव्यच आहे. परंतु तसें होत नसून, उलट हिंदु व मुसलमान यांच्या दरम्यान वेगळेपणा वाढण्यास कायदेकौन्सिलें कारण झालीं आहेत आणि एका प्रांतांत तर मुसलमानांना विशेष मताधिकार देण्याची मजल स्थानिक संस्थांपर्यंत भिडविण्यांत आली आहे. फूट पाडण्याचें हें तत्त्व इतर प्रांतांमध्यें व इतर जातींच्या बाबतींत तरी यापुढें अमलांत न येवो म्हणजे झालें. सध्यांचा विभक्तपणा तात्पुरता असून विशिष्ट कालमर्यादेनंतर

राजकीय व म्युनिसिपल बाबतींत सर्व प्रकारचे जातिविषयक भेद दृष्टीआड केले पाहिजेत, या गोष्टीची जाणीव हिंदु व मुसलमान या दोन्ही समाजांच्या पुढाऱ्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होत असल्याचीं चिन्हें दृग्गोचर होत आहेत. मद्रासमध्यें व महाराष्ट्राच्या कांहीं भागांत ब्राह्मणवर्गानें स्वतःविषयीं इतरांच्या मनांत असूयेची भावना व अविश्वास हीं उत्पन्न केलीं आहेत. आपली संख्या अतिशय मोठी असतांहि सरकारी नोकऱ्याचाकऱ्यांत व प्रतिष्ठित धंद्यांत त्या मानानें आपले लोक फारच कमी आहेत, असें ब्राह्मणेतरांना वाटत असून त्याला ब्राह्मणांची जातच कारण आहे अशी त्यांची समजूत झालेली आहे. शिक्षण व सामाजिक दर्जा स्वतःसाठींच बळकावून ब्राह्मण लोक आतांहि पूर्वींइतक्याच स्वार्थीपणानें त्या फायद्यांचा उपभोग घेत आहेत आणि इतर जातींच्या लोकांना आधुनिक काळच्या उत्कर्षसाधनांचा उपयोग करून घेण्यास प्रतिबंध करीत आहेत, असें ब्राह्मणेतरांना वाटत आहे. ब्राह्मणांनीं इतरांना मुद्दाम मागें ठेवून स्वजातीचें वर्चस्व मिळविलेलें असो किंवा इतरांपासून अलगपणानें राहण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळें त्यांनीं आपल्याकडे वरिष्ठपणा घेतलेला असो, ब्राह्मणेतरांच्या मनांत वैषम्याचें व दीर्घकाल चालू असलेल्या अन्यायाचें शल्य सलत आहे ही गोष्ट खरी आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, ब्राह्मणांच्या उद्दाम वर्चस्वापासून संरक्षण होण्याकरितां आपणांस आणखी पुष्कळ काळपर्यंत युरोपियन अधिकाऱ्यांच्याच निःपक्षपातीपणावर अवलंबून राहणें भाग आहे, असें म्हणून ब्राह्मणेतर समाजाचे कांहीं पुढारी देशाच्या राजकीय प्रगतीला विरोध करीत आहेत. हा प्रकार खरोखरच शोचनीय व हृदयभेदक होय. पब्लिक सर्व्हिस कमिशन मद्रासमध्यें आलें होतें त्या वेळीं हा बखेडा तिरस्करणीय स्वरूपानें बाहेर आला आणि तेव्हांपासून त्याला अधिकाधिक तीव्रता येऊं लागली आहे. या कलहाची मजल यापुढें तरी न जावो म्हणजे झालें. हा कलह तीव्रतर न होतां तो कमी कमी होत जाईल असें मानण्यास दोन कारणें दिसतात. पुष्कळ ठिकाणीं ब्राह्मणांचें वर्चस्व कमी झालें

असून एका पिढीच्या काळानंतर तें नामशेष होईल हें निश्चित आहे, हें एक कारण; दुसरें कारण असें कीं, आपण दोघांनीं भांडत बसून तिसऱ्याला ती मौज पाहण्याची व स्वतःचा मतलब साधण्याची संधि द्यावयाची, हें शहाणपणाचें नाहीं असें पुष्कळ ब्राह्मणांना व ब्राह्मणेतरांना वाटूं लागलें आहे. अशा समंजस, शांतताप्रिय व देशाभिमानी गृहस्थांच्या प्रयत्नांमुळें एकंदरींत वादाची कटुता कमी होत आहे. सध्यां ब्राह्मणांचा पक्ष वरचढ असल्याकारणानें त्यांच्यावर एका विशेष कर्तव्याची जबाबदारी आहे. सध्यां ब्राह्मणेतरांची जी प्रवृत्ति दिसत आहे, तो भूतकालाचा स्वाभाविक पण अपरिहार्य असा परिणाम आहे, हें ओळखून सामाजिक बाबतींत ब्राह्मणेतरांचें मन न दुखविण्याविषयीं ब्राह्मणांनीं काळजी घेतली पाहिजे व त्यांच्या मनोवृत्तींना मान देण्याची तत्परता दाखविली पाहिजे. राजकीय बाबतींतील आपला श्रेष्ठपणा ते विसरूं शकत नाहींत असा ज्यांच्यावर ब्राह्मणांचा दोषारोप आहे त्या लोकांकडून आपला कधीं कधीं खरा व पुष्कळदां काल्पनिक स्वरूपाचा उपमर्द झाला म्हणजे आपल्यास किती वाईट वाटतें व किती राग येतो तें ब्राह्मणांनीं लक्षांत आणलें पाहिजे. दुखरा पाय असला म्हणजे लहानशी ठेंच लागली तरी मोठ्या वेदना होतात, ही गोष्ट मानापमानाच्या बाबतींतहि लागू आहे. मुसलमान लोक स्नेहभावानें हिंदूंना मिठी मारीत असतां ब्राह्मणेतर लोक आपल्या बंधूंपासून अलग राहणार नाहींत व देशाच्या प्रगतीला बाधक असा आक्रोश करणार नाहींत, असा आम्हांला भरंवसा आहे.

## इतर देशांतील एतद्विषयक स्थिति.

हिंदुस्थानापेक्षां विशेष दैवशाली असलेले देशहि वरील प्रकारच्या कलहांपासून मुक्त नाहींत. इंग्लंडचीच स्थिति पाहिली तरी तेथें कोणताहि शिक्षणविषयक सुधारणेचा प्रश्न निघो, धार्मिक स्वरूपाच्या अडचणी उपस्थित होऊन वाद जुंपतो. परवांच लॉर्ड हाल्डेन यांनीं असे उद्गार काढले कीं, शिक्षणाच्या बाबतींतील पापाचा प्रचंड भार बऱ्याचशा धर्मगुरूंच्या

आणि नॉनकनफॉर्मिस्ट लोकांच्या शिरावर आहे. त्याचप्रमाणें, मोठमोठ्या हुद्यांच्या जागा बहुतकरून बड्या लोकांसाठींच राखून ठेवलेल्या असतात आणि गरीब लोकांचीं मुलें बुद्धिमान् असलीं तरी त्यांच्या वांट्याला सहसा मोठ्या जागा येत नाहींत, अशा प्रकारच्या तक्रारीहि कांहीं नव्या नाहींत. धर्मयुद्धांमुळें युरोपांत कित्येक शतकेंपर्यंत रक्ताचे पूर वाहत होते. परवांपर्यंत खिस्ती लोकांकडून ज्यू लोकांचा अतोनात छळ होत असे आणि तो पाश्चात्य संस्कृतीवरील एक मोठा कलंकच आहे. या बाबतींत इंग्लंडचा इतिहास सुद्धां सर्वथैव निर्दोष नाहीं. पहिल्यानें रोमन कॅथोलिकांनीं व नंतर प्रॉटेस्टंट पंथाच्या अनुयायांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध कायदे पास केले आणि खुनशीपणानें त्यांचा छळ केला. हिंदुस्थानच्या इतिहासांत धार्मिक छळाचीं जीं उदाहरणें आढळतात त्यांच्यापेक्षां इंग्लंडांतील या गोष्टी कोणत्याहि प्रकारें कमी क्रूरपणाच्या नव्हत्या. वस्तुस्थिति अशी आहे कीं, परधर्मसहिष्णुता व पूर्ण स्वातंत्र्य ह्या तत्त्वांची प्राचीन काळच्या लोकांना ह्मणण्यासारखी ओळखच नव्हती. अँग्लो-सॅक्सन लोकांनासुद्धां या तत्त्वांची पुरी ओळख चालू पिढींतच पटली. उलट पक्षीं, हिंदुस्थानाच्या इतिहासाकडे पाहिलें तर अशोक व अकबर ह्यांच्या कारकीर्दीमध्यें हीं तत्त्वें सरकारच्या धोरणांतच दिसत असत असें नाहीं, तर लोकांच्या सामाजिक जीवनामध्येंहि तीं प्रतिबिंबित झालेलीं असत असें दिसून येतें. हीं तत्त्वें अमलांत आणण्याकरितां परकीय सत्ताच पाहिजे असें नाहीं. इंग्लंडमध्यें तसें होण्यास परकीय सत्तेची जरूरी पडली नाहीं. या बाबतींत पुष्कळ हिंदी लोक आपल्याच देशांत काय ती अशी स्थिति आहे असें समजतात, व याचें कारण त्यांच्या कानींकपाळीं तसें भरवून देण्यांत आलें आहे हें होय. हें अविमोचनीय असें पाप आहे असें समजून वरील प्रकारच्या लोकांनीं स्वतःचा धिक्कार करूं नये यासाठीं, थोड्या काळापूर्वी स्वतंत्र व प्रॉटेस्टंट धर्मानुयायी इंग्लंड, कॅथोलिक धर्मानुयायी आयर्लंडशीं कशा रीतीनें वागत होते हें दाखविणारे सर्वमान्य ग्रंथांतून जे अनेक उल्लेख

उपलब्ध आहेत, त्यांतील एक येथें देतों. "Legacy of Past years" या पुस्तकामध्यें लॉर्ड डमूरॅव्हेन लिहितातः " राज्यक्रांतीनंतर लगेच विल्यमच्या कारकीर्दीत पीनल कोड ( दंडनीतिशास्त्र ) अस्तित्वांत आलें, आणि ॲन व पहिले दोन जॉर्ज यांच्या कारकीर्दीत त्याचा विस्तार झाला. जीवितांतील हरएक गोष्टीस हा कायदा लागू असे. कॅथोलिकांना पार्लमेंटमध्यें बसण्याची मनाई होती, व त्यांचा मताधिकार काढून घेतला होता. लष्कर, आरमार, मॅजिस्ट्रेटच्या जागा, वकिली व न्यायाधिकार यांच्या बाबतींत त्यांना मज्जाव असे. त्यांना ग्रॅन्ड ज्यूरीमध्यें घेतलें जात नसे अथवा शेरिफचें अगर सॉलिसिटरचेंहि काम करावयाला मोकळीक नसे; हत्यारें बाळगण्याची त्यांना मनाई होती. कोणत्याहि स्थानिक संस्थेचे त्यांना सभासद होतां येत नसे आणि व्यापार करावयालासुद्धां त्यांना निरनिराळे कर भरल्यावरच परवानगी मिळत असे. त्यांना प्रॉटेस्टंट लोकांकडून जमीन खरेदी करावयाला किंवा बक्षीस म्हणून स्वीकारावयाला मोकळीक नव्हती. त्याचप्रमाणें वर्षासनें, गहाणपत्रें अथव भाडेचिठ्या यांची मुदत कॅथोलिकांच्या बाबतींत एकतीस वर्षांपेक्षां अधिक नसे आणि भाड्याच्या एक-तृतीयांशापेक्षां अधिक नफा झाल्यास भाडेचिठ्ठी रद्द होत असे. मृत्युपत्रानें स्थावर मिळकत देण्याची मोकळीक कॅथोलिकांना नव्हती. त्यांची मिळकत सगळ्या मुलांमध्यें वांटली जाई. सर्वांत वडील मुलानें प्रॉटेस्टंट मताची दीक्षा घेतली तर मात्र सगळी इस्टेट त्याला एकट्यालाच मिळत असे. पांच पौंडांपेक्षां अधिक किंमतीचा घोडा कोणाहि कॅथोलिकाला बाळगण्यास मुभा नव्हती, आणि जास्त किंमतीचा घोडा एखाद्या कॅथोलिकापाशीं असला तर पांच पौंड देऊन तो घोडा कोणीहि प्रॉटेस्टंट घेऊं शकत असे. जमिनीची मालक असलेल्या एखाद्या प्रॉटेस्टंट स्त्रीनें कॅथोलिक पुरुषाशीं लग्न लावल्यास तिची मिळकत तिच्याकडून काढून घेतली जात असे; कॅथोलिक उपाध्यायाच्या मार्फत झालेले मिश्र विवाह बेकायदेशीर ठरविले जात. एखाद्या स्त्रीनें किंवा मुलानें प्रॉटेस्टंट पंथ स्वीकारला तर कॅथोलिक नवऱ्याच्या

किंवा बापाच्या ताब्यांतून त्या स्त्रीला अथवा मुलाला काढून घेण्यांत येत असे, आणि त्यांना चॅन्सेलरकडून उत्पन्नाची नेमणूक करून देण्यांत येई. एखादा कॅथोलिक इसम मरण पावला असतां त्या वेळीं वयांत न आलेलीं त्याचीं जीं मुलें असतील, त्यांच्यावर प्रॉटेस्टंट पालक नेमण्यांत येई. कॅथोलिकांना विद्यापीठांमध्यें मज्जाव असे. त्यांना शाळा चालविण्याची, अध्यापकाचें काम करण्याची किंवा मुलांचे पालक असण्याची सोकळीक नव्हती." एवं च, हिंदुस्थानांतील जाती व पंथ यांच्यामधील द्वेषमत्सरांचा उगाच बाऊ करण्यांत अर्थ नाहीं. इतर देशांत इकडीलपेक्षांहि तीव्रतर असे भेद व द्वेषमत्सर असूनसुद्धां ते जसे नष्ट किंवा सौम्य झाले तसे इकडेहि होतील; मात्र शहाणपणाच्या धोरणानें व योग्य खबरदारी घेऊन लोकांना अधिकार दिले पाहिजेत. जाती व पंथ यांच्यामुळें या देशांत लोकसत्तात्मक संस्था अस्तित्वांत आणणें अशक्य आहे, असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

## मानववंशभिन्नता.

हिंदी लोकांच्या राजकीय प्रगतीला विरोध करणारे लोक, वरील सर्व आक्षेपांचें खंडन झालें म्हणजे, मानववंश ( race ) भिन्नतेसंबंधाचा कोटिक्रम सहजच पुढें आणावयाचे. जणूं काय निरनिराळ्या मानववंशांचे गुण कायम ठरूनच गेले आहेत, आणि एखाद्या मानवजातीमध्यें एखादा दोष असला तर तो वज्रलेपच समजावयाचा ! उदाहरणार्थ, मि. कर्टिस यांनीं याच मुद्यावर असें एक विधान ठोकून दिलें आहे कीं, "आशियाटिक लोकांच्या ठिकाणीं निसर्गतःच स्वराज्य चालविण्याची पात्रता नाहीं, कदाचित् जपानची मात्र या बाबतींत अपवादांमध्यें गणना करावी लागेल." मि. कर्टिस यांनीं 'कदाचित्' ( perhaps ) या शब्दाचा उपयोग करून आपल्या बुद्धीचा सावधपणा व अपवाद कबूल करण्याची नाखुषी दर्शविली आहे. या विधानाचा अर्थ हा कीं, ईश्वरानें सृष्टिरचना करतांनाच पाश्चात्यांच्या वांटणीस राज्यकर्तृत्व देऊन टाकलें व पौर्वात्यांच्या नशिबीं

दास्य ठेविलें. जणूं काय, पाश्चात्य हे मनुष्यसृष्टींतील क्षत्रिय व पौरस्त्य हे शूद्र होत! हें एका प्रकारच्या जातिभेदाचें पुनरुज्जीवनच म्हणावयाचें. फरक इतकाच कीं, आमच्या जातिभेदाचा धर्माशीं संबंध आहे व या जातिभेदाचा धर्माशीं कांहीं संबंध नाहीं. मानववंशभिन्नतेची कल्पना परंपरेनें आलेली असून तिचें पृथक्करण करणें व तिची व्याख्या ठरविणें हें मोठें बिकट आहे. या कल्पनेनें आजपर्यंत निरनिराळया लोकांमध्यें एकमेकां-विषयीं तिरस्कार व द्वेष याच भावना उत्पन्न केल्या आहेत. ज्या जातींनीं अघाडी मारून यश मिळविलेलें असतें त्या जाती, दुसऱ्या जातींनीं पुढें येण्याचा प्रयत्न करूं नये यासाठीं, या भेदाचा ईश्वरदत्त ताम्रपटाप्रमाणें उपयोग करावयास पाहत असतात. आफ्रिका व अमेरिका येथील नीग्रो लोक घ्या, किंवा या देशांतील अस्पृश्य मानलेले लोक घ्या, त्यांना जर योग्य प्रकारें शिक्षण देण्यांत आलें तर ते जगांतील अत्युच्च संस्कृतिहि आपलीशी करून घेण्यास किंवा युरोपियन संस्कृतीशीं एकजीव हो-ण्यास आणि कोणताहि प्रतिष्ठित धंदा उत्कृष्ट रीतीनें चालविण्यास समर्थ आहेत, असेंच प्रत्यक्ष अनुभवावरून दिसून येईल. ऐषआरामाची हौस बाळगणारे लोकहि तशीच परिस्थिति प्राप्त झाली म्हणजे स्वसंरक्षणार्थ हातीं शस्त्र धरावयाला किंवा स्वतःचें नशीब काढण्यासाठीं साहसाचे धंदे पत्करावयाला तयार होतात. तसेंच एकाकाळीं श्रमसहिष्णु व क्षात्र-वृत्तिसंपन्न असलेले लोकहि शांततेच्या दीर्घ परिचयानें केवळ कृषीवल किंवा सरस्वतीचे उपासक बनतात. भिन्न भिन्न मानववंश व त्यांचीं भिन्न भिन्न गुणकर्में यांविषयीं भौतिकशास्त्रवेत्ते व इतिहासकार यांचे वाटेल ते कोटिक्रम असोत; परंतु मानवजातींतल्या विशिष्ट लोकांनीं चिरकाल राज्यसत्ता गाजविली पाहिजे व दुसऱ्या लोकांनीं यावच्चंद्रदिवाकरौ त्या सत्तेचें जूं आपल्या मानेवर धारण केलें पाहिजे, ही पापकल्पना मनुष्या-च्या अंतरात्म्याला—त्याच्या हृदयांत गूढ असलेल्या दैवी अंशाला—केव्हांहि संमत होणार नाहीं. वरील प्रकारचे कायमचे दोन भेद मानण्याच्या कल्प-नेचा ज्या विचारी लेखकांनीं निषेध केलेला आहे त्यांच्या लेखांतील कांहीं

उत्तारे येथें देतों. डॉ. एमिल राइश हे आपल्या " Success among Nations " या पुस्तकांत म्हणतात: "राष्ट्राच्या उन्नतीचें कारण मानव-वंशविशिष्टतेमध्यें शोधून काढण्याची एक टूम पुष्कळ आधुनिक इतिहासकारांनीं अंमलांत आणली आहे. कोणत्याहि गोऱ्या राष्ट्राचें उदाहरण घेतलें तरी त्यामध्यें निरनिराळ्या मानववंशांची व जातींची इतकी भयंकर गुंतागुंत झालेली दिसून येईल कीं, त्यांत कोणत्या जातीचा सर्वांत अधिक अंश आहे, हें सरासरीच्या अंदाजानेंहि सांगणें अगदीं अशक्य होईल. विशिष्ट प्रकारच्या शरीरवर्णामध्यें किंवा रक्तमांसामध्यें विशिष्ट गुण मूळचेच असतात, ही भ्रामक कल्पना सोडून दिली पाहिजे, आणि त्या राष्ट्रांच्या भौतिक परिस्थितीचाच विचार करून कारणें शोधून काढलीं पाहिजेत. ही पद्धति स्वीकारल्यावर जेतृवर्गाला जित राष्ट्राच्या संस्कृतीपढें मान वांकविणें कां भाग पडतें, आणि जित लोकांच्या धोरणानें आपल्या प्रगतीचा मार्ग कां क्रमावा लागतो, तें दिसून येईल. इजिप्त, बाबिलोनिया व चीन यांच्या बाबतींत असें अनेक वेळां घडून आलें आहे. " त्याचप्रमाणें: " राष्ट्रांमधील बौद्धिक शक्तीच्या उदयाचें कार्यकारणदृष्ट्या विवेचन करण्याच्या कामीं मानवजातिविशिष्टत्व हेंच कारण दाखविण्याचा प्रयत्न अनेक तर्ककुशल ग्रंथकारांनीं केला आहे. परंतु ही उपपत्ति निरर्थक ठरली आहे, व या मीमांसेंत आतां कांहीं राम राहिलेला नाहीं. आधुनिक इतिहासकारांपैकीं त्या उपपत्तीचे बहुतेक अभिमानी पुरस्कर्ते आतां तिला फांटा देऊं लागले आहेत. मात्र साधारण लोकांची या उपपत्तीवरील श्रद्धा अद्यापि कायम आहे. आपल्या राष्ट्राचा चोहींकडे दबदबा वाढला याचें कारण अँग्लो-सॅक्सन रक्तच आपल्या शरीरामध्यें विशेषेंकरून खेळत आहे हें होय, असें सामान्य इंग्रज माणसाला वाटत असतें व यापुढेंहि त्याला तसेंच वाटत राहील. ही कल्पना अर्थातच राष्ट्राचा अहंकार खुलविणारी असते. उलटपक्षीं, फ्रेंच लोकांना आपल्या शरीरांतील गॅलिक व रोमन रक्ताबद्दलचा अभिमान वाटत असतो. इतिहासाच्या शास्त्रशुद्ध विवेचनामध्यें या कल्पना कशा निराधार व निरर्थक

ठरतात तें आम्हीं यापूर्वी दाखविलेंच आहे. मानववंशाच्या विशिष्टतेची ओळख पटणें अशक्य आहे. आणि जेथें मानववंशदृष्ट्या भेदरेषा असल्याचें कांहींसें दिसून येतें तेथें सुद्धां राष्ट्राची सरहद्द व त्या रेषा यांचा एकत्र आरंभ व शेवट होतो असें नाहीं. एतावता, बौद्धिक विकासाच्या कारणांची उपपत्ति लावतांना मानववंशभिन्नतेपेक्षां विशेष सयुक्तिक अशा युक्तिवादाचा आश्रय केला पाहिजे. " विशिष्ट लोकांच्या किंवा विशिष्ट मानवजातींच्या ठिकाणीं असणारे गुणधर्म अढळ व कोणत्याहि संस्कारांनीं न बदलणारे आहेत, असा आरोप करणें किती चुकीचें आहे, हें जेन फिनो यांनीं स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे. या बाबतींत त्यांनीं असा समारोप केला आहे कीं, " ऐतिहासिक कारणांमुळें किंवा परिस्थितीच्या प्रभावानें लोकसमाजाच्या ठिकाणीं विशिष्ट गुण किंवा अवगुण उत्पन्न होत असतात. रानटी लोक आमच्या संस्कृतीमध्यें प्रवेश करून यश संपादूं शकतात, तर संस्कृतिसंपन्न लोक पुनः रानटीपणाच्या पायरीला जातात. ... पांच किंवा सहा शतकांच्या काळांत पुष्कळ गोऱ्या जातींनीं जितकी प्रगति केली, तितकीच प्रगति अवघ्या पन्नास वर्षांमध्यें नीग्रो लोकांनीं केली आहे. " " संस्कृतीचा इतिहास म्हणजे निरनिराळ्या लोकांच्या व जातींच्या उन्नतीची व अवनतीची अथवा जगाच्या रंगभूमीवरील प्रवेशांची व निष्क्रमणांची अखंड परंपराच होय. प्रगति व सौख्य यांच्याकरितां चालू असलेल्या प्रचंड जीवनकलहांत सर्वांनाच पडावें लागतें. सर्व मानवजातींना या कलहामध्यें धडपड करितां येणें व बहुमानाच्या जागा मिळविण्याकरितां चढाओढ करणें शक्य आहे. निरनिराळ्या जाती व समाज यांचेमध्यें बाह्यतः कितीहि भेद दिसत असले तरी जीवनशास्त्रदृष्ट्या व मानसशास्त्रदृष्ट्या त्यांच्यामध्यें अंतःस्थ एकरूपताच असते व ती तशीच कायम राहते. " " थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मानववंशभिन्नता हें एक शब्दावडंबर असून कल्पनेच्या बाहेर प्रत्यक्ष सृष्टीमध्यें तिला कोठेंच स्थान नाहीं. हा भेद आम्हीं आमच्या बुद्धीनेंच निर्माण केला आहे व तो आमच्या कल्पनेचा एक खेळ आहे. "

सन १९११ सालीं भरलेल्या 'युनिव्हर्सल रेसेस कॉंग्रेस'च्या पहिल्या अधिवेशनासाठीं लिहिलेल्या "The Rationale of Autonomy" या विषयावरील आपल्या निबंधांत मि. जॉन एम्. रॉबर्टसन, एम. पी., हे लिहितात: "स्वराज्याचा अनुभव नसलेले सर्व लोक तुलनात्मक दृष्टीनें अपूर्णावस्थेंत असलेले होत, असें कबूल करण्यासारखाच हा प्रकार आहे. म्हणजे याचा अर्थ असा कीं, कोणत्याहि उच्च प्रतीच्या सामाजिक उन्नतीला आणि एकंदरींत पात्रता वाढण्याला स्वराज्य ही पहिली जरूरीची गोष्ट आहे. तथापि आधुनिक कालांतील साम्राज्यविस्ताराचा पुरस्कार करणाऱ्यांपैकीं विशेष विचारी लोकांकडून सुद्धां हें प्रमेय कबूल केलें जात नाहीं. प्राचीन काळीं ग्रीसमध्यें व रोम येथें स्वतंत्रपणें सार्वजनिक प्रश्नांची चर्चा होण्याचें बंद पडलें, राजकारणांतील चढाओढीची समाप्ति झाली, तेव्हां मानवी बुद्धीचा एकदरींत ऱ्हास होऊं लागला, ही गोष्ट आतांपर्यंत फारच थोड्या इतिहासकारांच्या लक्ष्यांत आली आहे. एकंदर समाजाची बौद्धिक व नैतिक प्रगति होण्यास लोकांमध्यें सतत भवति न भवति चालण्याची—विचारविनिमय होण्याची आणि कामकाजें हातून निरंतर घडत राहण्याची—अत्यंत आवश्यकता आहे, ही गोष्ट अद्यापि सर्वमान्य—स्वयंसिद्ध तत्त्व म्हणून मान्य—झालेली नाहीं. स्वराज्याचा अंत झाल्यावर प्राचीन काळच्या संस्कृतींचा कसा ऱ्हास झाला आणि स्वराज्याच्या सहवासानें आधुनिक संस्कृतीची कशी प्रगति झाली, हें पाहिलें म्हणजे वरील विधानाची सत्यता प्रत्ययास येते." "प्रस्तुत प्रश्न अगदीं थोडक्यांत मांडतां येण्यासारखा आहे. सध्यां परवश स्थितींत असलेल्या मानवजातींची प्रगति होत आहे किंवा नाहीं? जर प्रगति होत असेल तर त्यांची गति कितीहि मंद असली तरी ते स्वराज्याशीं सदृश असणाऱ्या स्थितीला पोंचण्याच्या मार्गास लागले आहेत. जर त्यांची प्रगति होत नसेल तर त्यांच्यावर विशेष प्रगमनशाली राष्ट्रांचा जो अमल आहे तो यशस्वी झालेला नाहीं हें स्पष्ट होय; आमची सत्ता कल्याणकारक आहे असें त्यांच्याकडून म्हणण्यांत येतें, तें केवळ निरर्थक ढोंग आहे."

“ उष्णकटिबंधांतील देश किंवा मागसलेल्या जाती यांच्याच बाबतींत ‘ अडचणी ’ व ‘ अपात्रता ’ यांसंबंधाच्या सबबी खऱ्या असतात असें नाहीं, असें स्पष्ट बजावून सांगणें हें पहिलें काम आहे. पात्रतेची सबब पुढें आणणारे लोक या बाबतींत ज्या टीकापद्धतीचा अवलंब करितात ती पद्धति अत्यंत सदोष आहे. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें असें दिसतें कीं, आरंभीं अतिशय अपात्रता अंगीं असूनहि ज्यांच्या उत्क्रांतीस आरंभ झाला आणि हरएक प्रकारच्या ठेंचाठोकरा खाऊनहि–देशांतल्या देशांत आपसामध्यें लढाई जुंपण्याचा प्रसंग येऊनहि आस्तेआस्ते स्वराज्याची मजल ज्यांनीं गांठली आहे त्या जातींमध्यें ‘ पात्रता ’ आहे. म्हणजे, अपात्रतेंतूनच पात्रतेची उत्क्रांति होते, ही गोष्ट सिद्ध झाली. असें असूनहि, अपात्रता असतां पात्रता केव्हांच येणार नाहीं, असें ते टीकाकार धरून चालतात. उदाहरणार्थ, हिंदुस्थानामध्यें स्वराज्याच्या संस्थांचा क्रमाक्रमानें विकास करण्यांत यावा असें प्रतिपादण्यांत आलें तर त्यावर एकदम असा जबाब देण्यांत येतो कीं, हिंदुस्थानांतून ब्रिटिश सैन्य निघून गेलें तर तो देश दुसऱ्या कोणत्या तरी देशाच्या भक्ष्यस्थानीं पडेल, निदान तेथें अंतःकलहाची धुमश्चक्री तरी माजेल. ब्रिटिशांनीं हिंदुस्थान देश सोडून देण्याच्या सूचनेविरुद्ध हा कोटिक्रम वरवर पहाणारास बरोबर दिसेल. मात्र हिंदुस्थानांतून ब्रिटिशांनीं आपला गाशा गुंडाळून चालतें व्हावें, असें कोणीहि राजकारणी गृहस्थानें सुचविलेलें नाहीं. परंतु कालें-करून स्वराज्याचा लाभ करून देणाऱ्या कोणत्याच प्रकारच्या संस्थांना समष्टिदृष्ट्या हिंदी लोक पात्र नाहींत, असें सिद्ध करण्याकरितांच वरील तर्कटाचा आश्रय करण्यांत येतो. आतां आपण इंग्लिश भाषा बोलणाऱ्या जगांतील निरनिराळ्या समाजांच्या स्थितीचें समालोचन करूं. इंग्लंडांत सतराव्या व अठराव्या शतकांमध्यें आपसांत यादवी माजून युद्धें झालीं. अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंड व वसाहती यांच्या दरम्यान आप-सांत युद्ध जुंपलें; आणि पुनः त्यानंतर एकोणिसाव्या शतकांत अमेरि-केंतील स्वतंत्र अशा संयुक्त संस्थानांमध्यें आणि कानडामध्यें आपसांत

यादवी माजली. या गोष्टी स्वराज्यविषयक पात्रतेचा टेंभा मिरविणाऱ्या 'जाती'मध्येंच घडल्या. साम्राज्यवादी लोक ज्या तत्त्वाचा पुरस्कार करितात त्याच तत्त्वाच्या आधारें, 'कर्तुमकर्तुम्' शक्तीनें संपन्न असलेल्या एखाद्या खगोलसंचारी देवदूतानें, वरीलपैकीं कोणत्याहि प्रसंगीं ॲंग्लो-सॅक्सन लोक स्वराज्याला अपात्र आहेत म्हणून ठरविलें असतें किंवा त्यांना दिलेल्या स्वराज्याचा उपभोग त्यांना घेतां येत नाहीं, सबब स्वराज्याचा प्रयोग अकालीं करण्यांत आला आहे असें म्हणून तो बंद ठेवला असता तर तें गैर झालें असतें काय ? पण कदाचित् त्यानें तशा प्रयोगाला आधीं आरंभच करूं दिला नसता." "आपण मागण्याचें बंद केलें म्हणजे आपोआप सर्व कांहीं आपल्या पदरांत येऊन पडेल, या आशेवर जित लोकांनीं अनिश्चित कालपर्यंत निमूटपणें असलेल्या स्थितींत समाधान मानून राहावें असें म्हणणें हा राजकीय चर्चेंतला परमावधीचा मूर्खपणा होय. अशा प्रकारें निमूटपणें राहणारे लोक स्वराज्याला सर्वथैव अपात्रच समजले पाहिजेत. अशा लोकांचें राष्ट्र फार काळपर्यंत जीवंतच राहावयाचें नाहीं."

सर चार्लस ब्रूस हे सदरील कॉंग्रेसमध्येंच वाचलेल्या 'परतंत्र लोक व समाज त्यांना वागविण्यासंबंधाची आधुनिक कालची सदसद्विवेकबुद्धि' या विषयावरील आपल्या निबंधांत म्हणतात: "युरोपियन कुलांत उत्पत्ति, ख्रिस्ती धर्म आणि कातडीचा सफेत रंग यांच्यावरच फक्त स्वराज्यविषयक पात्रता सर्वस्वीं अवलंबून आहे, अशी जी पाश्चात्य संस्कृतीच्या अभिमान्यांकडून बढाई मारण्यांत येते, ती परतंत्र लोकांना व समाजांना वागविण्याच्या बाबतींत आधुनिक सदसद्विवेकदृष्ट्या केवळ भ्रामक आहे, हेंच शेवटीं सांगावयाचें आहे. युरोपियन कुलोत्पत्ति, ख्रिस्ती धर्म व श्वेतवर्ण त्वचा यांचा संयोग ज्या लोकांमध्यें झाला आहे त्यांच्या अंगीं त्यांच्या परिस्थितीस अनुरूप अशी स्वराज्यक्षमता ज्याप्रमाणें आली आहे तशीच ती दुसऱ्या जातीच्या, पंथाच्या व शरीरवर्णाच्या लोकांमध्येंहि त्यांच्या भिन्न परिस्थितीला अनुरूप अशा स्वरूपांत दिसून येते, ही

गोष्ट आधुनिक सदसद्विवेकबुद्धीनें मान्य केलेली आहे. पाश्चात्य देशांतील जात व धर्म यांच्यामधील कलहाची तडजोड ज्या तत्त्वांवर झाली, त्याच तत्त्वांवर पूर्व व पश्चिम यांच्यामधील कलहाची तडजोड झाली पाहिजे; व्यक्तिस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य असणें आणि जात, धर्म अथवा शरीर-वर्ण यांचा भेद न ठेवतां, सर्वांना सुव्यवस्थित राज्यपद्धतीखालीं आप-आपली उन्नति करून घेण्यास सारखीच संधि मिळूं देणें, हेंच स्वतंत्रतेचें तत्त्व होय; असें आधुनिक कालची सदसद्विवेकबुद्धि प्रतिपादन करते. ”
“ ‘पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम,’ ( East is East and West is West ) या सर्वतोमुखीं झालेल्या पालुपदाला अनुसरून नव्हे, तर ‘ पौर्वात्य देशांत व पाश्चात्य देशांत सर्वत्र ईश्वर आहे ’ ( God's in the Occident, God's in the Orient ) असें एका कवीचें उदात्त विचार व्यक्त करणारें वचन आहे तें लक्ष्यांत ठेवून या प्रश्नाची तडजोड केली पाहिजे, असें इतिहास, युक्तिवाद व जपानमध्यें नुकताच आलेला अनुभव हीं आम्हांस कंठरवानें सांगत आहेत.”

## ‘ अजून वेळ आली नाहीं. ’

अपात्रतेसंबंधाचा मुद्दा दुसऱ्या एका स्वरूपानें पुढें आणला जातो. हा आक्षेप तितका बिनतोड नसला तरी तो कमी भयावह आहे असें नाहीं. कित्येक टीकाकार शिष्टपणाचा मोठा आव आणून म्हणतात कीं, “ अपात्रता हा असाध्य रोग आहे असें नाहीं. कालेंकरून, सध्यां अस्तित्वांत असलेल्या व क्रमाक्रमानें व्यापक स्वरूप पावणाऱ्या संस्थांच्या द्वारें काळजीपूर्वक व उदार बुद्धीनें जें राजकीय शिक्षण दिलें जात आहे, त्याच्यायोगानें, हिंदुस्थानांतील लोक स्वराज्यास पात्र होण्याचा संभव आहे. मात्र अशा बाबतींत निश्चित भविष्य वर्तविणें मूर्खपणाचें आहे. तो पात्रतेचा काल अद्यापि प्राप्त झालेला नाहीं. तेव्हां धीर धरा आणि तो काल येईपर्यंत धिमेपणानें वाट पाहा.” असें म्हणून हे आमचे उपदेशक अलंकार-युक्त भाषेंत सांगतात कीं, “मार्ग फार दूरचा व कंटाळवाणा आहे. पदोपदीं

अडचणी व संकटें आहेत. हा मार्ग तुमच्यापूर्वी ज्यांनीं क्रमिला त्यांना किती कष्ट सोसावे लागले, हाल भोगावे लागले, त्यांच्यावर किती संकटें ओढवलीं, त्यांच्यावर कसे भयंकर प्रसंग गुदरले तें तुम्हांला माहीत आहे काय ?" अलंकारिक भाषा व सुभाषितें, उपमा व दृष्टांत, इतिहास व महाकाव्यें यांच्यापासून आपल्यास पुष्कळ बोध होतो, आगाऊ सूचना मिळतात व योग्य मार्गाचें दिग्दर्शन होतें, या गोष्टी खऱ्या आहेत. परंतु जीवितांतील प्रत्यक्ष अनुभवाची सर त्यांना येणार नाहीं. व्यक्तींना व समाजांना जो प्रत्यक्ष अनुभव मिळाला पाहिजे, त्याचें काम त्या गोष्टींनीं होऊं शकणार नाहीं. स्वतःच्या बुद्धिकौशल्यानें व स्वतःच्या मनगटाच्या जोरावर तुम्ही अडचणींशीं झगडलां व त्यांचें निवारण केलेंत तरच तुम्हांला उत्कृष्ट शिक्षण मिळेल. स्वतःच्या अनुभवानें मिळविलेलें शिक्षण हें अत्यंत उच्च प्रतीचें व अत्यंत उपयुक्त होय. स्वराज्याचे अधिकार मिळाल्यानेंच हिंदी लोक स्वराज्यास पात्र होतील. त्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. त्यांनीं आपलीं उद्दिष्टें व ध्येयें ठरविलीं पाहिजेत, स्वतःच्या बुद्धीनें कार्यक्रम आंखून तो पार पाडला पाहिजे, तसें करतांना चुका झाल्या तरी त्या चुकांची दुरुस्ती स्वतः केली पाहिजे, नुकसान झाल्यास त्याची भरपाई स्वतःच्या हातानेंच केली पाहिजे, संकटं आल्यास त्यांचें निवारण स्वतःच केलें पाहिजे. मि. एल. कर्टिस हे आपल्या " The Problem of the Commonwealth " या पुस्तकांत लिहितात: " पहिली गोष्ट ही कीं, जबाबदारीनें कामें करण्याची संवय झाली म्हणजे तीं कामें करण्याची पात्रताहि वाढत जाते. एखाद्या माणसाला काम करावेंच लागलें म्हणजे तें काम कसें करावें हें तो शिकतो आणि त्या बाबतींतील कर्तव्याची जाणीव त्याच्या ठिकाणीं वाढूं लागते, हा प्रत्येकाचा अनुभव आहे. यासाठींच राजकीय सत्तेमध्यें सर्व नागरिकांना वांटा देण्यांत येतो व तसें केलेंच पाहिजे; त्यांचें ज्ञान व जबाबदारीची जाणीव यांची वाढ पूर्ण झालेली नसली तरी हरकत नाहीं."

अगदीं अकालींच या सुधारणेला आरंभ होतां कामा नये, त्याला पूर्व-

तयारीचें शिक्षण अवश्य आहे, हें खरें आहे. आतां असा प्रश्न उपस्थित होतो कीं, पूर्वतयारी होण्यास किती काळ लोटला पाहिजे? त्याला उत्तर हें कीं, जरूर तितकी बौद्धिक व मानसिक तयारी होण्यास व अवश्य तितका राजकारणांतला अनुभव प्राप्त होण्यास जो काळ लागेल तेवढा गेला पाहिजे. ही अवश्यक तयारी व हा अवश्यक अनुभव आमच्यापाशीं आहे, असें आमचें म्हणणें आहे. अशा दृष्टीनें तुलना केली तर, फिलिपाइन बेटांपेक्षां हिंदुस्थान स्वराज्याला कमी लायक आहे असें म्हणतां येणार नाहीं, किंवा कानडा अगर दुसऱ्या वसाहती यांना लोकनियंत्रित राज्यव्यवस्थेचे अधिकार मिळाले तेव्हां त्यांची सामान्यतः जी स्थिति होती तिच्यापेक्षां हिंदुस्थानची स्थिति विशेष मागसलेली आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. याच्याहि पुढें जरा जाऊन असें सुद्धां म्हणतां येईल कीं, हिंदुस्थानच्या बाबतींत जितक्या उणीवा आतां दाखविण्यांत येत आहेत तितक्याच उणीवा इंग्लंड व जपान यांची राज्यघटना जेव्हां पूर्णपणें लोकसत्तात्मक झाली तेव्हां, त्या देशांमध्येंहि होत्या. सन १८६१ मध्यें जपानच्या बादशाहानें हक्कांची सनद देऊन ती पाळण्याची शपथ घेतली; दहा वर्षांमध्यें लोकमतानुसारी राज्यघटना अंमलांत आणण्याचें १८८२ सालीं वचन दिलें; आणि १८९० त सर्व राष्ट्राची पहिली लोकसभा भरविण्यांत आली. फिलिपिनो लोकांना सुधारलेल्या राज्यपद्धतीचें शिक्षण पुरें वीस वर्षेंहि मिळालें नाहीं. हिंदी लोक फिलिपिनो लोकांपेक्षांहि मंदबुद्धि आहेत काय? कीं, अमेरिकन राजकीय संस्थांपेक्षां ब्रिटिश राजकीय संस्थांची गतिच मंद आहे? कारण दुसऱ्या देशांत जें शिक्षण वीस वर्षांमध्यें पूर्ण होऊं शकतें तें आम्हीं एक शतक घेत आहों, व आणखी किती काळ हें शिक्षण असेंच चालावयाचें तें समजत नाहीं. कानडामधील पहिल्या कायदेकौन्सिलची सभा १७९२ मध्यें भरली, आणि तेव्हांपासून पन्नास वर्षांनीं पूर्ण लोकनियंत्रित राज्यव्यवस्था तेथील जनतेला प्राप्त झाली. न्यू साउथ वेल्समध्यें पहिल्या पार्लमेंटची बैठक १८४३ सालीं झाली आणि लोकमताच्या तंत्रानें चालणारें मंत्रिमंडळ १८५६ मध्यें अधिकारारूढ

झालें. कायदेकौन्सिलांत हिंदी लोकांचा प्रवेश पहिल्यानें १८६१ सालीं झाला. त्यापूर्वीं पुष्कळ वर्षें ती संस्था अस्तित्वांत होती. या आरंभींच्या काळीं हिंदुस्थानांत कायदे करण्याचा अधिकार फक्त युरोपियन लोकांनाच होता व ते कौन्सिलमधील काम पार्लमेंटच्या पद्धतीवर चालवीत असत; वादविवादाचें वगैरे काम चालविण्यासंबंधानें नियम त्यांनीं स्वतः तयार केलेले असत; अधिकारिवर्गाच्या कृत्यांवर ते टीका करीत असत आणि अगदीं स्वतंत्रपणानें व शुष्क शिष्टाचारांची पर्वा न करितां ते वादविवाद चालवीत असत; हल्लींच्या सारखा सोंवळेपणा व कडकडीत संभावितपणा त्या वेळीं नव्हता; ही गोष्ट पुष्कळांना माहीत नाहीं, तरी ती लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. १८६१ मध्यें हिंदी लोकांचा कायदेकौन्सिलांत प्रवेश झाला, पण त्यांत किती तरी सावधगिरी ठेवलेली होती. कौन्सिलांतील बिनसरकारी हिंदी सभासद थोडे असून ते सरकाराकडून नेमले जात, आणि जेव्हां एकाद्या नवीन कायद्यासंबंधानें विचार करावयाचा असे तेव्हांच काय ती कौन्सिलची सभा भरत असे. त्यानंतर दुसरें पाऊल पुढें पडावयाला तीस वर्षें लागलीं. लोकांमध्यें बरीच चळवळ झाल्यावर १८९२ सालीं बिनसरकारी सभासदांची संख्या थोडीशी वाढविण्यांत आली. हे सभासद कायदेशीर दृष्टीनें पाहतां सरकारनें नेमलेले असत, परंतु वस्तुतः ते स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींनीं निवडलेले असत. प्रश्न विचारण्याचा मर्यादित अधिकार त्यांना या वेळीं देण्यांत आला आणि वार्षिक अंदाजपत्रक वाटाघाट करण्यासाठीं त्यांच्यापुढें ठेवण्यांत येऊं लागलें; मात्र निकाल त्यांच्या मतांवर अवलंबून ठेवलेला नसे. अशा स्थितींत सतरा वर्षें गेलीं आणि १९०९ सालीं तिसरें पाऊल पुढें टाकण्यांत आलें. त्यासाठींहि जोरदार चळवळ करावी लागली. या नवीन सुधारणेनें स्थानिक कायदेकौन्सिलांत बिनसरकारी सभासदांचें संख्याधिक्य ठेवण्यांत आलें, कौन्सिलांतील सभासदांना पुरवणीदाखल उपप्रश्न विचारण्याचा आणि सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबतींत ठराव [illegible]

मात्र अनेक अपवाद ठरविण्यांत आले आणि कौन्सिलानें एखादा ठराव बहुमतानें मान्य केला तरी त्यानें अधिकारिवर्ग बांधला जात नाहीं. या सुधारणा जाहीर करितांना उदारमतवादाची प्रचंड घोषणा करण्यांत आली. लोकांनींहि एकंदरींत ही महत्त्वाचीच सुधारणा झाली असें समजून आनंद प्रदर्शित केला. परंतु त्यानंतर सात वर्षांचा जो काळ लोटला त्यामध्यें लोकांच्या राजकीय विचारांची फारच मोठी प्रगति झाली आणि विशेष महत्त्वाच्या राजकीय आकांक्षा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाल्या यामुळें, कौन्सिलें म्हणजे नुसत्या वादविवादाच्या सभा असून त्यांना नांव मात्र मोठें देण्यांत आलें आहे, असें स्वराज्योन्मुख पुष्कळ लोक म्हणूं लागले आहेत. वस्तुतः सगळा अधिकार सरकारच्याच हातीं असून लोकमताच्या विरोधाला न जुमानतां स्वतःला पाहिजेत तसे कायदे तीं पास करून घेऊं शकतात. कौन्सिलांत हिंदी लोकांचा प्रवेश होऊन पंचावन्न वर्षें लोटलीं तरी अद्यापि लोकप्रतिनिधींना देशांतील राज्यव्यवस्थेचें नियंत्रण करण्याचा अधिकार मुळींच प्राप्त झालेला नाहीं. आम्ही घाईघाईनें पुढें पावलें टाकीत आहों, असें तरी निःसंशय कोणी मनुष्य म्हणूं शकणार नाहीं. पायाची मजबुती व्हावयाला पाहिजे तितका काळ गेलेला आहे, आणि स्वराज्याच्या इमारतीचा पूर्ण भार आतां हा पाया खात्रीनें सोसूं शकेल.

# योजना.

## रूपरेखा.

राज्यव्यवस्थेमध्यें कोणते महत्त्वाचे फेरबदल व्हावे अशी लोकांच्य पुढाऱ्यांची मागणी आहे याचा आतां आपण विचार करूं. या बाबतींत सुधारणांच्या योजना तयार करण्याकरितां हिंदी राष्ट्रीय सभा व अखिल भारतवर्षीय मुस्लिम संघ यांनीं कमिट्या नेमल्या व त्या कमिट्यांची एक संयुक्त सभा कलकत्ता येथें होऊन निरानिराळया सूचनांसंबंधानें वाटाघाट झाली. [ दोन्ही कमिट्यांनीं एक संयुक्त योजना तयार केली आणि ती लखनौ येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेमध्यें व मुस्लिम संघाच्या अधिवेशनामध्यें मंजूर करण्यांत आली. ही योजना या पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्टाच्या रूपानें देण्यांत आलेली आहे. ] त्याखेरीज वरिष्ठ कायदेकौन्सिलामधील एकोणीस लोकनियुक्त सभासदांनीं सरकारला एतद्विषयक बाबतींत एक मसुदा सादर केलेला आहे. राष्ट्रीय सभा व मुस्लिम संघ या ह्या देशांतील सर्वांत मोठ्या लोकमतनिदर्शक व अधिकारसंपन्न संस्था आहेत. त्यांनीं केलेल्या मागण्या म्हणजे अर्थातूच सर्व राष्ट्रानें एकमतानें केलेल्या मागण्या होत. त्यांची रूपरेखा थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे.

व्हाइसरॉयच्या मार्फत बादशाहांनीं हिंदुस्थानावर राज्य चालवावें आणि व्हाइसरॉयच्या मदतीला एक कार्यकारी कौन्सिल असावें. या कौन्सिलचे सहा सभासद असावेत आणि त्यांपैकीं तीन हिंदी व तीन युरोपियन असावेत. युरोपियन सभासदांची नेमणूक व्हाइसरॉयकडून केली जावी, परंतु ते इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधून किंवा हिंदुस्थानांतल्या दुसऱ्या कोणत्याहि सर्व्हिसमधूनच निवडले पाहिजेत असा निर्बंध असूं नये. हिंदी सभासदांची निवड व्हाइसरॉयच्या कायदेकौन्सिलमधील लोकनियुक्त सभासदांकडून केली जावी. सेक्रेटरी ऑफ स्टेटचें कौन्सिल

काढून टाकण्यांत यावें आणि सेक्रेटरी ऑफ स्टेटचा दर्जा वसाहतींच्या सेक्रेटरीच्या दर्ज्याप्रमाणें ठरवावा. अधिकारिवर्गावर हिंदुस्थानांतील कायदेकौन्सिलची सत्ता चालावी. हें कायदेकौन्सिल वाढवून त्यांतील सभासदांची संख्या १५० करण्यांत यावी. त्यांतील चार पंचमांश सभासद देशांतील लोकांनीं प्रत्यक्ष मताधिकाराच्या द्वारें निवडलेले असावेत. त्यांतील कांहीं जागा मुसलमानांकरितां राखून ठेवण्यांत याव्या, आणि मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघांकडून त्यांची निवड करण्यांत यांवी. एक्झिक्युटिव ( कार्यकारी ) कौन्सिलचे सभासद कायदेकौन्सिलचेहि सभासद असावेत, आणि बाकीचे सभासद सरकारी व बिन-सरकारी लोकांमधून व्हाइसरॉयकडून नेमण्यांत यावेत. सर्व हिंदुस्थानाकरितां कायदे करण्याचा अधिकार कौन्सिलला असावा, मात्र त्या कौन्सिलनें केलेले कायदे नामंजूर करण्याचा अधिकार व्हाइसरॉयना असावा, आणि विशिष्ट मुदतींत बादशाहांना त्यांना हरकत घेतां यावी. इंग्लंडांत पार्लमेंटच्या सभासदांना असतो त्याप्रमाणें कायदेकौन्सिलच्या सभासदांना अधिकारिवर्गाला प्रश्न विचारण्याचा अधिकार असावा. त्याचप्रमाणें ठराव पास करण्याचाहि त्यांना अधिकार असावा. ते ठराव व्हाइसरॉय नामंजूर करूं शकतील, परंतु तशा नामंजुरीनंतर एका वर्षानंतर ते ठराव तत्त्वतः त्याच स्वरूपामध्यें पुनः पास करण्यांत आले तर ते अधिकारिवर्गाला मान्य करावे लागतील. कौन्सिल आपला अध्यक्ष (Speaker) स्वतः निवडील. कार्यकारी कौन्सिलांतील सभासदांप्रमाणें कायदेकौन्सिलची मुदतहि पांच वर्षें असावी. त्यापूर्वीं त्याचें विसर्जन करण्याचा अधिकार व्हाइसरॉयांना असेल, मात्र त्यांनीं विशिष्ट मुदतीच्या आंत दुसऱ्या कौन्सिलची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे. कौन्सिलच्या दोन सभांच्या दरम्यान एका वर्षापेक्षां अधिक काळ जातां कामा नये. वसूल व खर्च यांच्या बाबतींत अशी व्यवस्था असावी कीं, कार्यकारी कौन्सिलनें दरवर्षीं त्या बाबतींत सूचना कराव्या आणि कायदेकौन्सिलांमध्यें त्यासंबंधानें वाटाघाट होऊन त्या पैशाच्या बिलांच्या रूपानें पास व्हाव्या. तथापि

लष्कर व आरमार यांच्या बाबतींतील खर्च कायदेकौन्सिलच्या मंजुरीवर अवलंबून असूं नये. थोड्याबहुत प्रमाणानें याच पद्धतीवर प्रांतिक राज्यव्यवस्था असावी. प्रत्येक प्रांतावर खुद्द बादशाहांनीं नेमलेला गव्हर्नर असावा. प्रांतिक कौन्सिलानें पास केलेले कायदे तेथील गव्हर्नर नामंजूर करूं शकेल आणि गव्हर्नर जनरलला त्यांच्या बजावणीस हरकत आणतां येईल. हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें यांच्या दरम्यानचा आर्थिक संबंध तपशीलवार निश्चित केलेला नाहीं, तरी स्थूल मानानें अशी कल्पना आहे कीं, राष्ट्रीय व प्रांतिक असे महसुलाचे दोन वर्ग करण्यांत येतील आणि देशाच्या अंदाजपत्रकांत तूट पडल्याचें दिसून आल्यास, वेळोवेळीं ठरविण्यांत येतील त्या तत्त्वांना अनुसरून हातभार लावण्याची जबाबदारी प्रांतांवर राहील.

## वसाहतींतील स्वराज्याच्या बरोबरीचें नव्हे.

वरील रूपरेखेवरून ही योजना वसाहतींत ज्याला स्वराज्य—लोकनियंत्रित राज्यव्यवस्था ( responsible government )—असें समजतात त्यापेक्षां कमी दर्ज्याची आहे हें दिसून येईल. पहिली गोष्ट ही कीं, आर्थिक स्वायत्तता ( financial autonomy ) फार मर्यादित स्वरूपाची आहे. परंतु त्याच्याहिपेक्षां महत्त्वाचा भेद म्हटला म्हणजे अधिकारिवर्ग व कायदेकौन्सिल यांच्यामधील संबंधाचा होय. या व्यवस्थेप्रमाणें, कायदेकौन्सिलांतील सभासदांच्या बहुमतावर कार्यकारी सभासदांचें अस्तित्व अवलंबून असलेंच पाहिजे असें नाहीं; विरुद्ध बहुमत झाल्यावर कार्यकारी कौन्सिलचे सभासद आपल्या जागा सोडून देणार नाहींत. कार्यकारी कौन्सिलावर समवाय्यदृष्ट्या जबाबदारी नाहीं. ब्रिटिश राज्यपद्धतीमध्यें जसा मुख्य मंत्री असतो तसा या व्यवस्थेंत कोणी नसल्याकारणानें राज्यव्यवस्थे ( Government ). चा प्रमुख तोच अधिकारिवर्गा( Executive )चाही मुख्य सत्ताधारी ( खरा प्रमुख, नुसत्या नांवाचा प्रमुख नव्हे ) असेल, हें उघड आहे. खऱ्या लोकनियंत्रित—लोकांना जाब देण्यास पात्र असणाऱ्या—राज्यव्यवस्थेमध्यें ( responsible government ) अधिकारिवर्गावर कायदे करणाऱ्या

लोकसभेचें जितकें सर्वस्व असतें तितकें जरी या योजनेमध्यें कायदेकौन्सिलला ठेवण्यांत आलेलें नाहीं तरी दोन वेळ पास झालेले ठराव कार्यकारी कौन्सिलला बंधनकारक असल्यानें व त्या कौन्सिलांतील निमे सभासद कायदेकौन्सिलाच्या लोकनियुक्त सभासदांनीं निवडावयांचे असल्यामुळें कायदेकौन्सिलच्या हातीं बरीच सत्ता येणार आहे. शिवाय कार्यकारी कौन्सिलांतील सभासदांची मुदत पांच वर्षांपुरती मर्यादित करण्यांत आलेली आहे. हे निर्बंध आभासमूलक नाहींत हें, दक्षिण आफ्रिकेंतील प्रांतांमधील अधिकारिवर्गासंबंधानें डॉ. ए. बी. कीथ यांनीं प्रदर्शित केलेल्या पुढील मतामधील जाड्या अक्षरांत दिलेल्या वाक्यावरून, दिसून येईल: " कमिटीचे सभासद हे प्रॉव्हिन्शल कौन्सिलचेहि सभासद नसले तरी चालतात. एक सार्वत्रिक निवडणूक ( General election ) होऊन दुसरी सार्वत्रिक निवडणूक होईपर्यंत कौन्सिलच्या मतांना अनुसरून न चालतांहि त्यांना अधिकारावर राहतां येतें, अर्थात् प्रांताच्या राज्यव्यवस्थेमध्यें लोकांना जाब देण्याला अधिकारिवर्ग बांधलेला नाहीं; **तथापि अधिकारी सभासद लोकनियुक्त असून कायमचे नसल्याकारणानें कांहीं अंशीं राज्यकारभार लोकनियंत्रितच आहे असें म्हटलें तरी चालेल.** " हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितींत पूर्णपणें पार्लमेंटच्या पद्धतीची राज्यव्यवस्था सोयीची नाहीं हें जाणून सदरील योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं तिचा बुद्धिपुरःसर अंगिकार केलेला नाहीं हें स्पष्ट होय. वरील मत कितपत शहाणपणाचें आहे याबद्दल मतभेद होणें शक्य आहे. तथापि त्या मताला अनुकूल असा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. पार्लमेंटरी पद्धति अमलांत येण्याला दोन गोष्टी अवश्य पाहिजेत. लोकसभेमध्यें दोन पक्ष असले पाहिजेत, ही पहिली गोष्ट व त्या पक्षाची संख्या दोहोंपेक्षां अधिक असतां कामा नये ही दुसरी गोष्ट. लॉर्ड ब्राइस म्हणतातः " इंग्लंडांतली मंत्रिमंडलात्मक राज्यव्यवस्था म्हणजे तत्त्वतः विशिष्ट पक्षाच्या हातीं असणारीच राज्यव्यवस्था होय. इंग्लंडांत व इतरत्र जेथें जेथें तिचा उपक्रम करण्यांत आला आहे तेथें तेथें असाच

अनुभव आला आहे. ती भिन्न रीतीनें अमलांत आणणें शक्य आहे हें अद्यापि कोणीं सिद्ध करून दाखविलेलें नाहीं." त्याचप्रमाणें डायसी यांचें मत आहेः " इंग्लंडांत दोन मुख्य पक्ष आहेत व फक्त दोनच तसले पक्ष आहेत. यामुळेंच तेथील राज्यघटनेची वाढ होण्यास साहाय्य झालें आहे ही गोष्ट आतां कोणासहि नाकबूल करतां यावयाची नाहीं. " लोकमतानुसारी मंत्रिमंडळाच्या अस्तित्वाबरोबरच विशिष्ट पक्षाच्या हातीं सत्ता असणें प्राप्त होतें हें जसें खरें आहे तसेंच ती पद्धति यशस्वी होण्यास राजकीय पक्षहि दोनच असले पाहिजेत, असें लोवेल यांनीं म्हटलें आहे. पुष्कळ ठिकाणीं इंग्लंडांतील मंत्रिमंडळाच्या पद्धतीचें अनुकरण करण्यांत आलें आहे, परंतु फायदेशीर परिणाम मात्र सारख्याच प्रमाणानें दिसून आलेले नाहींत. याचें कारण असें कीं, तेथें दोहोंपेक्षां अधिक पक्ष अस्तित्वांत असून तात्त्विक मतभेद व कार्यक्रमाची भिन्नता यांच्या अनुरोधानें वेगवेगळे पक्ष झालेले आहेत असें म्हणण्यापेक्षां मोठमोठ्या जागा व सत्ता यांच्याकरितां एकमेकांशीं चढाओढ करणाऱ्या व्यक्तींच्या भोंवतालचे ते वेगवेगळे परिवार होत असें म्हटलें तरी चालेल. इंग्लंडांतहि आयरिश नॅशनॅलिस्टांचा पक्ष व त्यानंतर हल्लींच्या काळीं कामकरी पक्ष हे अस्तित्वांत आल्यामुळें पक्षभेदानुसारी राज्यपद्धतीचे फायदे पूर्वींसारखे आतां दिसून येत नाहींत. आणि सध्यां तर महायुद्धामुळें पक्षभेदाचा लोप झालेला असून पक्षाभिमान हा देशाभिमानाला विघातक आहे असें समजण्यांत येऊं लागलें आहे. यावरून, इंग्लंडमध्यें पक्षभेदानुसारी राज्यपद्धतीला पूर्वींचा जोम व प्राबल्य पुनः येणें कितपत शक्य आहे, असा प्रश्न मनांत येणें स्वाभाविक होय. पक्षभेदपद्धतीवर जिचें पूर्ण यश अवलंबून आहे, अशी राज्यव्यवस्थेची घटना तयार करूं इच्छिणाऱ्यांची बुद्धि वरील शंकांमुळें कांहीं काल तरी स्तिमित होण्याचा संभव आहे. मूलतः परस्परविरोधी असणाऱ्या दोन तत्त्वांना भजणारे राजकीय विचारांचे दोन पंथ आमच्या देशांत केव्हां तरी निर्माण होतील कीं काय, याविषयीं कोणीहि भविष्य सांगूं शकणार नाहीं. परस्परांपासून तत्त्व-

दृष्ट्या स्पष्टपणें भिन्न नाहींत, असे पुष्कळ पक्ष आमच्यामध्यें अस्तित्वांत येतील, असाच संभव आहे. अशा स्थितींत लोकमतानुरोधी मंत्रिमंडळें फार काळ किंवा चांगल्या जोमानें राज्य चालवूं शकणार नाहींत. अर्थात् प्रत्येक पक्षाकडून आपआपल्या पोळीवर तूप ओढून घेण्याचा प्रयत्न होईल. सरकारी नोकऱ्यांची कार्यक्षमता नाहींशी होऊन लांचलुचपतीच्या प्रकारांना ऊत येईल आणि त्यामुळें साहजिकच देशांतील एकंदर लोकांच्या शीलावर भयंकर दुष्परिणाम होतील, अशी भीति आहे. त्या-खेरीज हिंदुस्थानच्या बाबतींत आणखी एक मोठें भय आहे. लोवेल यांच्या Government of England या पुस्तकांत या अरिष्टाचें दिग्द-र्शन झालें आहे, हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. " समाजांतील निरनिराळ्या वर्गांना अनुसरून निरनिराळ्या पक्षांमधील भेदरेषा निश्चित होतात, तेव्हां फार मोठें भय असतें. कारण, एका पक्षाला असें वाटत असतें कीं, दुसरा पक्ष समाजहिताच्या मुळावरच कुऱ्हाड घालूं पाहत आहे, आणि त्यामुळें, देशांत यादवी माजली म्हणजे जसा वणवा पेटतो, त्याप्रमाणें मनोवृत्ती संतप्त व प्रज्वलित होतात. मनुष्यजातींमध्यें परस्प-रांशीं अगदीं भिन्नत्वानें वागणारे समाज ज्या तीव्रतर भावनांच्या योगानें अस्तित्वांत येतात, त्याच भावना जेव्हां पक्षभेदासहि कारण होतात, तेव्हां वरील प्रकारचा अनुभव येतो, आणि अशा प्रकारच्या दोन तीन मनोवृत्तींना एकाच द्वारें वाव मिळाला म्हणजे तर तसा अनुभव विशेषच येतो. इंग्लडांतील राजकारणामध्यें आय-रिश नॅशनॅलिस्ट पक्षाची जी अडचण येते, तिचें कारण पुष्कळ अंशीं असें आहे कीं, इंग्लिश व आयरिश लोकांमध्यें जातिविषयक ( racial ), धर्मविषयक, सामाजिक व आर्थिक या सर्व दृष्टींनीं भेद आहे. पक्षापक्षांमधील कलह नुसता निरुपद्रवीच नव्हे तर तो राष्ट्रहितपोषकहि होण्यास एकंदर जनसमाजाच्या गरजांविषयींच्या खऱ्याखुऱ्या मतभेदावरच पक्षभेदाची रचना झाली पाहिजे. पक्ष-विषयक कलह सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें न चालतां ज्या मानानें

विशिष्ट व्यक्तींच्या किंवा वर्गांच्या खाजगी फायद्याच्या दृष्टीनें अथवा श्रीमंत लोक व गरीब लोक असे भेद करून त्यांच्या फायद्यासाठीं चालेल त्या मानानें राजनीतीला भ्रष्ट स्वरूप प्राप्त होऊन आपमतलबी लोकांच्या चढाओढीमध्यें तिचें पर्यवसान होईल." योग्य मर्यादा पाळण्यांत आली, तर पक्षभेदानुसारी राज्यपद्धति उपयुक्त आहे यांत संशय नाहीं, परंतु त्या पद्धतीमध्यें नियंत्रण झुगारून देऊन वावरण्याचा गुण उपजतच असतो. अमेरिकेंत या पद्धतीला प्रचंड स्वरूप प्राप्त झालें असून खुद्द राज्यव्यवस्थेशीं स्पर्धा करणाऱ्या पक्षविषयक जगड्व्याळ संस्था तेथें अस्तित्वांत आल्या आहेत. इंग्लंडांत सुद्धां या पद्धतीचे इतके अनिष्ट परिणाम दिसूं लागले आहेत कीं, प्रो० डायसी यांनीं त्या बाबतींत भयसूचना दिली आहे. "पक्षभेदजन्य संस्थांचें बेसुमार प्राबल्य हें इंग्लंडवरील राजकीय बाबतींतील सर्वांत मोठें अरिष्ट," असें त्यांनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं ते म्हणतातः—"युनायटेड स्टेट्समधील समाजहितैषि नागरिकांना पक्षविशिष्ट संघटनेविषयीं संशय व पुष्कळ वेळां तिरस्कारच वाटत असतो. इंग्लंडांतील निरनिराळ्या पक्षांचें संगनमत, एकमेकांचा फायदा करून देण्याची आपसांत ठरलेली व्यवस्था व पार्लमेंटांतील लपंडाव यांच्यामुळें हाउस ऑफ कॉमन्सवरील लोकांची नैतिक व राजकीय श्रद्धा कमी कमी होत आहे. आमच्या पक्षभेदानुसारी राज्यपद्धतीचे, विस्तृत मतदारसंघांमुळें, जे स्वाभाविक दुष्परिणाम झाले आहेत ते जेणेंकरून कमी होतील अशी कांहीं उपाययोजना केली पाहिजे, असें पुष्कळ इंग्रज लोकांना वाटूं लागलें आहे."

## स्वराज्य कीं 'होमरूल'?

फाजील वाटाघाटीस पात्र झालेल्या एका वादाचा येथें उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं. वरील योजनेमध्यें स्वराज्याचा अंतर्भाव होतो काय? त्याला 'होमरूल' असें म्हणतां येईल काय? हा तो वाद होय. हिंदी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं आपल्या राजकीय आकांक्षांचें ध्येय 'ब्रिटिश

साम्राज्याच्या स्वराज्यसंपन्न घटकांना ज्या राज्यपद्धतीचा उपभोग मिळत आहे तिच्याशीं सदृश असणारी राज्यपद्धति ' किंवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वसाहतींच्या धर्तीवरील स्वराज्य, हें ठरविलें याचें कारण वसाहतींमध्यें कांहीं काळ विशिष्ट स्वरूपाची राज्यपद्धति चालू असून तिची कमीजास्ती विशदपणानें व्याख्या करितां येण्यासारखी आहे, हें होय. आयर्लंडला ' होमरूल ' देण्यांत आलेलें आहे असें मानलें तरी आयर्लंडला तें अद्यापि मिळालेलें नाहीं. खरें म्हटलें असतां ' स्वराज्य ' ( Self-Government ) याचा अर्थ स्वातंत्र्य (absolute independence ) असाच झाला पाहिजे. उदाहरणार्थ मि. कर्टिस यांच्या पुस्तकांतील एका प्रकरणाचा शिरोलेख " वसाहतींची मजल स्वराज्यापर्यंत कशी गेली नाहीं ? " ( How the Dominions stopped short of Self-Government ) असा आहे. अंतर्गत राज्यव्यवस्थेच्या बाबतींत बरीचशी स्वायत्तता, या अर्थानें ' स्वराज्य ' ( Self-Government ) व ' होमरूल ' या दोहोंपैकीं कोणताही शब्द वापरला तरी साधारण व्यवहारांत काम भागण्यासारखें आहे. दोहोंपैकीं कोणता शब्द विशेषेंकरून उपयोगांत आणावयाचा, ही ज्याच्या त्याच्या आवडीची गोष्ट होय. ' होमरूलसंपन्न हिंदुस्थान या शब्दांपेक्षां अर्थातूच ' स्वराज्यसंपन्न हिंदुस्थान ' हे शब्द विशेष कर्णमधुर आहेत. लॉर्ड डर्हाम यांनीं ' लोकनियंत्रित राज्यव्यवस्था ' या शब्दांचा उपयोग केला तेव्हां वसाहतींच्या बाबतींत त्या शब्दांना आतां जो अर्थ प्राप्त झाला आहे तो त्यांच्या मनांत नव्हता. लष्करी बाबी, परराष्ट्रांबरोबरचे वसाहतीचे संबंध, तसेंच व्यापारासंबंधानें नियम व सरकारी मालकीच्या जमिनींची विल्हेवाट करण्याचा हक्क यासंबंधीं अधिकार लॉर्ड डर्हाम यांनीं वसाहतींना दिला नव्हता. गेल्या थोड्या वर्षांमध्यें पुढील बाबतींतच साम्राज्याची सत्ता वसाहतींमध्यें चालत आहे (१) वसाहतींच्या अंतर्गत राज्यकाभारासंबंधाच्या कांहीं बाबी, ( २ ) तद्देशीय मूळच्या लोकांसंबंधाच्या बाबी, ( ३ ) गौरकाय लोकांखेरिज इतर लोकांचा वसाहतींत प्रवेश व वास्तव्य,

( ४ ) परराष्ट्रांबरोबरच्या तहांनीं ठरलेले व इतर संबंध, ( ५ ) व्यापार व पैशाचें चलन, ( ६ ) व्यापारी जहाजांची नेआण, ( ७ ) पुस्तकें, चित्रें वगैरेसंबंधाचे हक्क, ( ८ ) घटस्फोट आणि ( ९ ) लष्करी व आरमारी बंदोबस्त. आयर्लंडसंबंधीं ' गव्हर्न्मेंट ऑफ आयर्लंड ॲक्ट ' नांवाचा कायदा थोड्या दिवसांपूर्वी पास झाला, परंतु सध्यां त्याची अंमलबजावणी तहकूब ठेवण्यांत आली आहे. त्याच्या अन्वयें आयरिश लोकांना संयुक्त राज्याच्या–ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांच्या–पार्लमेंटमध्यें ४२ सभासद पाठविण्याचा हक्क आहे; कार्यकारी राज्यव्यवस्था ( Executive Government ) राजेसाहेबांच्या नांवानें लॉर्ड लेफ्टनेंट यांजकडून चालविली जाईल आणि आयरिश पार्लमेंटमध्यें ज्या पक्षाचें मताधिक्य असेल त्या पक्षांतून लॉर्ड लेफ्टेनंट यांजकडून मंत्रिमंडळाची नेमणूक होईल. आयरिश पार्लमेंटच्या सत्तेला बरेचसे निर्बंध आहेत. जमाबंदी व खर्च यांचें नियमन फार गुंतागुंतीच्या नियमांनीं उभय सरकारांनीं ठरविलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, परराष्ट्राबरोबरचे राजकीय संबंध, लष्कर व आरमार, बहुमानाचे हुद्दे व पदव्या, राजद्रोह, परकीयांना देशदीक्षा ( Naturalisation ), व्यापार, दीपगृहें, नाणें व चलन, मापें व वजनें, कॉपीराइट वं पेटंटें, या बाबी आयरिश पार्लमेंटाच्या अधिकारांतून वगळल्या आहेत. विशिष्ट मुदतीकरितां दुसऱ्या कांहीं बाबतींत अधिकार दिले नाहींत, त्या बाबी ह्या:–जमिनीची खरेदी, नॅशनल इन्शुरन्स, ओल्ड एज पेन्शन्स, लेबर एक्सचेंजेस ( या बाबतींत ब्रिटिश कायदे लागू आहेत), करांचे पैसे गोळा करणें, पोलिस खातें, पोष्ट ऑफिस, सेव्हिंग्ज बँक्स्, ट्रस्टी सेव्हिंग्ज बँक्स्, फ्रेंडली सोसीयटाज्, व पाब्लिक लोन्स ( कायदा होण्याच्या पूर्वींचीं ). यावरून राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानाकरितां तयार केलेली योजना वसाहतींच्या मानानें निःसंशय कमी दर्ज्याची आहे, हें दिसून येईल. त्याचप्रमाणें, आयर्लंड व इंग्लंड यांचे परस्परांशीं जे चमत्कारिक गुंतागुंतीचे संबंध आहेत ते सोडून दिले तर आमची योजना आयर्लंडच्या मानानेंही कमी दर्ज्याची आहे. या दृष्टीनें पाहिल्यास ' स्वराज्य ' ( सेल्फ-गव्हर्न्मेंट ) व ' होमरूल ' हे शब्द ज्या

विशिष्ट अर्थाचे वाचक आहेत त्या अर्थानें त्यांपैकीं कोणताच आमच्या योजनेस लागू पडणार नाहीं. स्थूल दृष्ट्या मात्र दोन्ही शब्दांचा उपयोग करितां येईल. ' होमरूल ' शब्दाशीं अप्रिय गोष्टींचा इतिहास संलग्न झालेला आहे या आक्षेपांत म्हणण्यासारखा अर्थ नाहीं. ब्रिटिश लोकांच्या अंगीं राजकारण इतकें मुरलेलें आहे कीं एखादा शब्द ऐकूनच ते बिचकून जावयाचे नाहींत. शिवाय खुद्द इंग्लंडसाठीं, त्याचप्रमाणें स्कॉट्लंडसाठीं व वेल्ससाठींहि होमरूलच्या मागण्या होत आहेत. उलटपक्षीं पाहतां, राष्ट्रीय सभेच्या घटनेमध्यें ' स्वराज्य ' ( सेल्फ-गव्हर्न्मेंट ) हा शब्द योजण्यांत आला आहे व अशा रीतीनें तो महाजनसंमत झाला आहे हें तो शब्द विशेष आदरणीय होण्यास सबळ कारण आहे.

## वाढीची शक्यता.

ब्रिटिश साम्राज्यामध्यें राज्यघटनेची वाढ कशा क्रमानें होतें हें पाहिलें तर त्यांत तीन पायऱ्या असल्याचें दिसून येईल. क्राउन कॉलनीची राज्यपद्धति ही पहिली पायरी, त्यानंतर प्रातिनिधिक संस्थांची स्थापना आणि शेवटीं लोकनियंत्रित राज्यव्यवस्था, असा क्रम आहे. लॉर्ड डर्हाम यांनीं आपल्या सुप्रसिद्ध रिपोर्टामध्यें मधल्या स्थिती-संबंधानें बरेंच विरुद्ध मत दिलें आह. कारण त्या पद्धतीमध्यें कायदेकारी मंडळ व कार्यकारी मंडळ यांच्यामध्यें जोराचे खटके उड-ण्याचे वरचेवर प्रसंग येतात. लॉर्ड डर्हाम यांच्या रिपोर्टांतील ज्या उता-ऱ्यामध्यें हें मत प्रदर्शित करण्यांत आलें आहे, तो उतारा प्रसिद्ध असून ट्रान्सवाल व ऑरेंज रिव्हर कॉलनी यांना स्वराज्याचे अधिकार देण्या-संबंधाचा ठराव हाउस ऑफ कॉमन्समध्यें आणतांना मि. वुइन्स्टन चर्चिल यांनीं त्याचा उपयोग केल्यामुळें तर त्याची विशेषच प्रसिद्धि झाली. " प्रातिनिधिक स्वरूपाची व लोकांना जबाबदार नसणारी अशा दोन्ही प्रकारची राज्यव्यवस्था एकत्रपणें यशस्वी रीतीनें चालवितां येईल, अशी कल्पना तरी इंग्रज मुत्सद्यांच्या मनांत कशी आली असेल हें समजणें कठिण

आहे. वसाहतींच्या बाबतींत मात्र प्रातिनिधिक संस्था लोकांना जबाबदार न होतील अशा स्वरूपाच्या करणें जरूरीचें आहे, असा कित्येकांचा समज दिसतो. सरकारी अंमलदार नेमावयाचे ते ज्या लोकांचे हितसंबंध त्यांच्या हवालीं करावयाचे त्यांच्या इच्छेचा विचार न करतां साम्राज्य-सरकारानें नेमावयाचे, ही व्यवस्था प्रातिनिधिक राज्यपद्धति पूर्णपणें धाब्यावर बसविणारी आहे. ती व्यवस्था चालू ठेवण्यांत साम्राज्याचा फायदा कोणता, याचा कोणींहि अद्यापि खुलासा केलेला नाहीं. तसें करण्याची जर आवश्यकताच असेल, तर वसाहतींतील प्रातिनिधिक राज्यपद्धति म्हणजे नुसता एक फार्स असून विशेष गोंधळ माजण्याचें मात्र तें एक साधन आहे, असेंच म्हटलें पाहिजे. कारण, लोकप्रतिनिधींच्या संस्था आपली सत्ता सोडण्यास जेणेंकरून तयार होतील असें कांहीं साधन या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांनीं अद्यापि शोधून काढलेलें नाहीं, किंवा वसाहतींच्या प्रत्यक्ष राज्यकारभारांत तें उपयोगांत आणून दाखविलेलें नाहीं.” सदरील ठरावावर नंतर जो वादविवाद झाला त्यामध्यें वरील मताविरुद्ध सर चार्लस डिल्क यांनीं भाषण केलें आणि मि. वुइन्स्टन चर्चिल यांचें विधान धाष्टर्याचें आहे असें सांगितलें. जेथें काळे किंवा श्वेतवर्णीय नव्हेत असे तद्देशीय लोक संख्येनें फारच अधिक असतील तेथें फक्त प्रातिनिधिक संस्था असलेली, परंतु लोकमताला जबाबदार नाहीं, अशीच राज्यव्यवस्था असली पाहिजे, हें अनुदार तत्त्वहि सदरील भाषणांत सर चार्लस डिल्क यांनीं प्रतिपादिलें. पण त्यासंबंधानें येथें विचार करण्याचें कारण नाहीं. लोकमतानुरोधानें कार्यकारी मंडळांत फेरफार होणें याला लोकमतनियंत्रित राज्यव्यवस्था असें म्हणतात. परंतु कायदेकारी मंडळाला कार्यकारी मंडळास जाब विचारण्याचा अधिकार असण्यास वरील प्रकारें मंत्रिमंडळ बदलण्याचीच व्यवस्था असली पाहिजे कीं काय, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मुख्य सत्तेमध्यें निरनिराळ्या अंगांचा समावेश झालेला असतो आणि त्या अंगांच्या बलाबलावर व इभ्रतीवरच एकमेकांवर दाब ठेवला जाण्याची पद्धति अवलंबून असते. इंग्लंडांत या अंगांचा

परस्परांशीं जो संबंध आहे, तसाच हिंदुस्थानांतहि आहे असें गृहीत केलें तरच ती पद्धति जशाची तशी स्वीकारतां येईल. परंतु तसें मानणें योग्य होणार नाहीं. असें गृहीत करून काढलेलीं अनुमानें ढांसळून पडण्यास एकच गोष्ट पुरेशी आहे. ती ही कीं, आमच्या योजनेंत कार्यकारी मंडळाचा—अधिकारिवर्गाचा—मुख्य सूत्रचालक-सम्राटाचा प्रतिनिधि असावयाचा आणि कायदेकारी मंडळानें केलेले कायदे नामंजूर करण्याची बरीच मोठी सत्ता त्याच्या हातीं असावयाची आहे. या बाबतींत अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचेंहि महत्त्वाचें उदाहरण आहे. तेथें उच्च प्रतीची लोकसत्तात्मक राज्यपद्धति अस्तित्वांत आहे, तरी कायदेकारी मंडळाच्या मतानें तेथील कार्यकारी मंडळ स्थानभ्रष्ट होऊं शकत नाहीं. प्रश्न, ठराव, जमाबंदी व खर्च यांच्यावरील ताबा आणि कार्यकारी मंडळाच्या निम्मे सभासदांची निवडणूक यांच्यासंबंधानें प्रस्तुत योजनेमध्यें असलेली तजवीज अधिकारिवर्गाचें नियंत्रण करण्यास पुरेशी नाहीं, असें प्रत्यक्ष अनुभवांतीं दिसून आलें तर, ज्याच्यायोगानें एखाद्या मंत्र्याला किंवा सर्व मंत्रिमंडळाला राजीनामा देण्याची पाळी येईल, असा निरात्र्यंजक ठराव करण्याचा प्रयत्न करून पाहतां येईल. देशांतील अंतर्गत राज्यव्यवस्थेसंबंधाचे कायदे आणि ज्यांत साम्राज्याचे हितसंबंध व सम्राटाचे खास अधिकार यांचा संबंध येतो असे कायदे, अशा प्रकारचा भेद करितां येईल; पहिल्या प्रकारच्या कायद्यांच्या बाबतींतील व्हाइसरॉयचा नामंजुरीचा अधिकार ठरावांच्या बाबतींतील तशा अधिकाराप्रमाणें मर्यादित करावयाचा आणि दुसऱ्या प्रकारच्या कायद्यांच्या बाबतींत तो अधिकार जशाचा तसाच कायम ठेवावयाचा.

# आक्षेप.

## देशी संस्थानांचें काय ?

हिंदुस्थानच्या राज्यघटनेमध्यें करावयाच्या सुधारणेच्या या योजनेवर जे आक्षेप घेण्यांत येतात त्यांतील कांहीं आक्षेपांचा आतां विचार करूं. या योजनेमधून देशी संस्थानांना वगळण्यांत आलें आहे, ही गोष्ट प्रथमदर्शनींच लक्षांत येणारी आहे. थोड्या दिवसांपूर्वीं हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांची परिषद् भरली होती त्यावेळीं त्यांनीं आपल्यापैकीं एका अत्यंत हुषार व सुविद्य अशा प्रतिनिधीच्या मुखानें असें जाहीर केलें कीं, ब्रिटिश हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कोणत्याहि प्रकारें हात घालण्याचा आपला इरादा नाहीं; तसेंच आपल्या कारभारांत हें ब्रिटिश हिंदुस्थाननें पडूं नये अशी आपली इच्छा आहे. संस्थानिकांनीं यापूर्वीं हें आपलें धोरण अशा रीतीनें जाहीर केलें नव्हतें, तरी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं आरंभापासून आपल्या कार्यक्रमांतून संस्थानांसंबंधाचें राजकारण वगळलें आहे. युद्धसमाप्तीनंतर स्वराज्याचे बरेचसे अधिकार प्राप्त झाले तर ब्रिटिश हिंदुस्थानची प्रगति इतक्या झपाट्यानें होईल कीं, त्याच मार्गाचें अवलंबन करण्याविषयीं देशी संस्थानांना त्यांच्या प्रजाजनांकडून जोरानें आग्रह केला जाईल, व त्या मार्गानें जाण्यास त्यांना भाग पाडण्यांत येईल. परिस्थिति ओळखणारे व विशेष प्रबुद्ध असे संस्थानिक आपल्या लोकांना स्वराज्याचे अधिकार देऊन आपलें नांव अजरामर करूं शकतील आणि त्यांचा कित्ता दुसऱ्या संस्थानिकांकडून गिरविला जाईल. पुढील वाढ होणें ही फार दूरच्या भविष्यकाळाची गोष्ट आहे. त्यासंबंधानें आतांच वाटाघाट करण्याचें कारण नाहीं.

## ‘ हाउस ऑफ लॉर्ड्स् ’चा अभाव.

इंग्लंडांत हाउस ऑफ कॉमन्सप्रमाणें हॉउस ऑफ लॉर्डस ही जशी दुसरी ‘ चेंबर ’ ( लोकसभा ) आहे तशी कांहीं व्यवस्था आमच्या या योजनेंत नाहीं, असा आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे. इंग्लिश राज्यघटनेचें ज्यांनीं अनुकरण केलें आहे त्या देशांचा अनुभव योजना तयार करणारांनीं लक्ष्यांत घेतलेला नाहीं असें टीकाकाराला वाटेल. कानडामधील बहुतेक प्रांत व दक्षिण आफ्रिकेच्या यूनियनखालीं असलेले प्रांत हे खेरीज करून बाकीच्या ब्रिटिश वसाहतींनीं व संस्थानांनीं दोन सभांची पद्धति अमलांत आणलेली आहे. वरील अपवादांवरून प्रांतिक राज्यव्यवस्थेपुरतें प्रस्तुत योजनेचें अंशतः समर्थन करतां येण्यासारखें आहे. परंतु हिंदुस्थानची राज्यव्यवस्था म्हणजे इतर ठिकाणच्या ‘फेडरेशन्स ’ ( निरनिराळ्या भागांच्या किंवा संस्थानांच्या संयुक्त राज्यव्यवस्थे- ) प्रमाणें असल्याकारणानें, एकच लोकसभा ( चेंबर ) असलेली सर्व जगांतन्ली तीं कदाचित् पहिलीच राज्यपद्धति असूं शकेल. इंग्लंडांतील हाउस ऑफ लॉर्डस् यशस्वी न झाल्याची जाणीव हिंदी राजकारणी पुरुषांच्या मनांत ठसलेली आहे, परंतु लॉर्डस्च्या सभेचें उच्चाटन करण्याच्या सूचनेस रॅडिकल व लेबर या पक्षाच्या लोकांखेरीज बाकीच्या लोकांचें फारसें पाठबळ मिळालेलें नाहीं. लॉर्डांची सभा नाहींशी करून न टाकतां तिची सुधारणा करावी, असेंच साधारणतः लोकमत आहे. ग्रेटब्रिटनच्या व्यतिरिक्त इतर देशांत दुसऱ्या चेंबर्स इतक्या अप्रिय झालेल्या नाहींत. फार तर त्या निरुपयोगी ठरल्या आहेत इतकेंच. ऑस्ट्रेलियामधील कित्येक संस्थानांमध्यें कायदे करण्याचें बरेंच काम त्यांच्याकडून होत असतें. अर्थातूच दोन लोकसभांमध्यें वरचेवर मतभेद उपस्थित होतो. मतभेदामुळें राज्ययंत्र बंद पडूं नये यासाठीं मुद्दाम कायद्याच्या द्वारें तपशीलवार तजवीज केलेली असते. ब्राइस यांनीं म्हटल्याप्रमाण, लोकसत्ताविशिष्ट राज्यशासन सर्व देशांमध्यें सारख्याच मार्गांनीं चालत नाहीं किंवा त्यापासून होणारे नफेतोटे सर्वत्र सारख्याच प्रमाणानें दिसत नाहींत. एकाच प्रति-

निधिसभेची राज्यपद्धति हिंदुस्थानांत कितपत उपयोगी होऊं शकेल, हें केवळ अनुभवानेंच समजून येणार आहे. लोकनियुक्त सभासदांचें बहुमत अंमलांत येण्यास पुष्कळ वर्षें लागतील असा संभव आहे. दरम्यान, कार्यकारी मंडळ ( Executive Council ) व सरकारनें नेमलेले सभासद यांजकडून कांहीं अंशीं सेकंड चेंबरचें काम बजावलें जाईल. त्यांच्याकडून एकाद्या कायद्याला विलंब लावण्यांत येईल किंवा त्यांमध्यें दुरुस्ती करण्यांत येईल; निदान ज्यांचें एकजात संख्याधिक्य आहे अशा सभासदांच्या लक्ष्यांत न आलेल्या, एकाद्या कायद्यासंबंधाच्या, गोष्टींचा विचार करण्यास त्यांजकडून भाग पाडलें जाईल. कांहींही असलें तरी पूर्णपणें लोकनियुक्त सभासदांचेंच जेथें पार्लमेंट आहे तेथें दुसऱ्या चेंबरच्या अभावीं इच्छित उद्देश सिद्धीला जाणें कठिण आहे. सार्वजनिक बाबतींत मन घालणारे बहुतेक लोक प्रागतिक विचारांचे असतात आणि कमीजास्त प्रमाणानें त्यांच्या आवडत्या कल्पना सारख्याच स्वरूपाच्या असतात. अर्थात् त्यांच्यापुढें विचाराकरितां जे प्रश्न येतील त्यांच्यामधील विशिष्ट मुद्यांवर त्यांजकडून भर दिला जाणें व बाकीच्या मुद्यांकडे त्यांचें दुर्लक्ष्य होणें स्वाभाविक आहे. त्याशिवाय निरनिराळया वर्गांचे व जातींचे वेगवेगळे हितसंबंध, शिक्षणामध्यें व इतर संस्कारांच्या बाबतींत असणारें निरनिराळया समाजांमधील अंतर, यांचा विचार करतां सकृद्दर्शनींच दुसऱ्या चेंबरची आवश्यकता स्पष्टपणें दिसून येते. जिच्यांत सर्वस्वीं किंवा बव्हंशीं लोकनियुक्त सभासदांचाच भरणा असून त्या सभासदांची मुदत पहिल्या लोकसभेमधील सभासदांच्या मुदतीपेक्षां अधिक वर्षांची आहे आणि सभासदांची निवड करणारे मतदारसंघ भिन्न तत्त्वांवर स्थापलेले आहेत, अशा दुसऱ्या लोकसभेची योजना तयार करणें हिंदी मुत्सद्यांच्या कल्पनाशक्तीला अशक्य आहे असें नाहीं. तशी दुसरी लोकसभा स्थापित झाल्यास पहिल्या लोकसभेनें प्रदर्शित केलेल्या विचारांना महत्त्वाच्या बाबतींत तिच्याकडून पुस्ती जोडली जाईल असा पुष्कळ संभव आहे. या बाबतींत जगास आलेल्या अनुभवाचा, हल्लीं पास झालेल्या आयरिश

होमरूलसंबंधाच्या कायद्यामध्यें, उपयोग करून घेण्यांत आला आहे. मि॰ रेडमंड यांना इंग्लंडांतील लॉर्डांच्या सभेविषयीं प्रेम वाटण्याचें कांहींच कारण नाहीं, तथापि त्या कायद्याविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, " हा कायदा फार महत्त्वाचा असून त्याच्या पुरस्कर्त्यांचे हेतू सिद्धीस जाण्याला तो पुरेसा आहे. त्याबद्दल माझ्या स्वतःच्या व इतर आयरिश सभासदांच्या वतीनें मी आनंद व्यक्त करतों. " सदरील कायद्यामध्यें सीनेट या नांवानें दुसऱ्या चेंबरची योजना केलेली आहे. तिची घटना व पहिल्या लोकसभेशीं असणारा तिचा संबंध यांचें वर्णन थोडक्यांत पुढीलप्रमाणें करतां येईल. " आयरिश सीनेटमध्यें चाळीस सभासद असतील. पहिल्या खेपेच्या सीनेटच्या सभासदांची नेमणूक लॉर्ड लेफ्टेनंट यांजकडून एक्झीक्यूटिव्ह कमिटीच्या सल्ल्यानें होईल. सीनेटच्या सभासदांची मुदत आठ वर्षांची असेल आणि पार्लमेंटचें विसर्जन झालें तरी त्यांत फरक होणार नाहीं. एकचतुर्थांश सभासद एका वर्षाआड आपल्या जागा सोडतील आणि त्यांच्या जागीं नवीन सभासदांची नेमणूक करण्यांत येईल. महसूल अथवा पैसा यांचा विनियोग करण्यासंबंधाचीं अगर कर बसविण्यासंबंधाचीं बिलें फक्त आयरिश हाउस ऑफ कॉमन्समध्येंच येतील. मात्र लॉर्ड लेफ्टेनंट यांनीं केलेल्या शिफारसीला अनुसरून असल्याखेरीज कसलाच ठराव, मागणीचा अर्ज, अथवा आयर्लंडच्या सरकारी महसुलाचा अगर कराचा कोणताही भाग कसल्याच कामाकरितां उपयोगांत आणण्याचें बिल आयरिश हाउस ऑफ कॉमन्सला बहाल किंवा पास करतां येणार नाहीं. कर बसविण्यासंबंधाचें किंवा महसुलाचा अगर पैशाचा विशिष्ट कामासाठीं खर्च करण्यासंबंधाचें बिल आयरिश सिनेटला नामंजूर करतां येणार नाहीं किंवा तशा बाबतींत कोणत्याही बिलामध्यें दुरुस्ती करतां येणार नाहीं किंवा लोकांवरील करांचा बोजा वाढवितां येणार नाहीं. आयर्लंडमधील उभय लोकसभांमध्यें सतत मतभेद होऊं लागल्यास उभय सभांचें संयुक्त अधिवेशन भरवून वादविषयक प्रश्नाचा निकाल संयुक्त मतानें करण्यांत येईल. " एकच चेंबर असण्याच्या विरुद्ध हिंदी राजकारणी मंडळीचें

एकमत असल्याकारणानें ह्या बाबतींत विशेष विवेचन करण्याची जरूरी नाहीं. तथापि, चेंबर असण्याच्या साधारण प्रश्नासंबंधानें प्रसिद्ध विचारी लेखकांचीं थोडीं मतें येथें देतों:-

जॉन स्टुअर्ट मिलचें मत: " एकच लोकसभा असली म्हणजे तिच्यांत ज्या पक्षाचें कायमचें बहुमत असतें-एकमेकांच्या सल्लामसलतीनें त्या पक्षांतील लोक जेव्हां कामें चालवितात व आपल्या पक्षांस नेहमीं जय मिळेल अशी जेव्हां त्यांची खात्री असते तेव्हां-तो पक्ष सहजच 'हमकरेसो कायदा' अशा धोरणानें व उद्दामपणानें वागतो. याकरितां त्यांच्यावर दुसऱ्या तसल्याच अधिकारी संस्थेचा दाब असला पाहिजे. त्या सभेला आपलीं कृत्यें पसंत पडतील किंवा नाहीं याचा विचार करणें त्याला भाग पडलें पाहिजे. ज्या कारणास्तव रोमन लोकांनीं दोन कॉन्सल नेमण्याची पद्धति अंमलांत आणली त्याच कारणास्तव दोन चेंबर्स असणें इष्ट आहे; अशाकरितां कीं, एक वर्षच कां होईना परंतु दोहोंपैकीं कोणत्याही चेंबरला एकसूत्री सत्ता अयोग्य रीतीनें गाजविण्याचा जो मोह पडतो तो पडूं नये." वॉल्टर बेजहॉटचें मत: "कनिष्ठ लोकसभा (Lower House) पूर्णत्वयुक्त असल्यावर वरिष्ठ लोकसभे (Upper House)-ची फारशी किंमत राहणार नाहीं, हें निश्चित आहे. राष्ट्रांतील लोकमत ज्यांत पूर्णपणे प्रतिबिंबित झालें आहे, ज्याचें धोरण नेहमीं नेमस्तपणाचें आहे, ज्यांत अविचारी मनोविकारांचें केव्हांच प्राबल्य होत नाहीं, ज्यांत फुरसतीचा वेळ ज्यांना बराच सांपडतो असे पुष्कळ लोक आहेत, ज्यांत चांगल्या रीतीनें प्रत्येक गोष्टीचा विचार केला जातो आणि उगाच उतावळेपणा करण्यांत येत नाहीं, असें आदर्शवत् हाउस ऑफ कॉमन्स असलें तर दुसऱ्या चेंबरची आवश्यकता नाहीं, हें खरें आहे. तसें असल्यास काम इतक्या चांगल्या रीतीनें होईल कीं, त्या कामावर कोणाची देखरेख असण्याची जरूरी असणार नाहीं; आणि हेंही खरें आहे कीं, राज्यव्यवस्थेमध्यें जें कांहीं अनवश्यक असतें तें दुष्परिणामावहच समजलें पाहिजे. ... आदर्शतुल्य हाउस ऑफ कॉमन्स अस-

त्यावर लॉर्डांची सभा अनवश्यक व वरील नियमाप्रमाणें अहितकारक होईल हें खरें असलें तरी, सध्यां हाउस ऑफ कॉमन्सची जी स्थिति आहे ती लक्षांत घेतां ज्यांना विशेष फुरसत आहे अशा लोकांची, कॉमन्सवर मखलाशी करणारी, दुसरी सभा अगदीं अवश्य नसली तरी अत्यंत उपयोगी आहे." डब्ल्यू. ई. एच. लेकी: "मनुष्यजातीमध्यें राज्यव्यवस्थेचे जितके कांहीं प्रकार शक्य आहेत त्या सर्वांमध्यें, लोकप्रतिनिधींच्या एकाच चेंबरच्या द्वारें राज्य चालविण्याइतका दुसरा कोणताही वाईट प्रकार असल्याचें मला ठाऊक नाहीं." हेनरी सेज्विक: "सेनेट स्थापण्याचा मुख्य उद्देश असा असतो कीं, प्राथमिक लोकसभेपेक्षां भिन्न स्वरूपाच्या व शक्य असल्यास बौद्धिक दृष्ट्या विशेष उच्च दर्ज्याच्या किंवा पूरक स्वरूपाच्या संस्थेकडून सर्व कायदेकानूंचा पुनः विचार करण्यांत यावा." आल्फ्यूस टॉड: "स्थानिक स्वराज्याचे अधिकार ज्या वसाहतींना आहेत त्यांच्यामध्यें दुसरी चेंबर ही आवश्यक संस्था आहे. लोकनियुक्त व अत्यंत प्रबल अशा सभेंतील लोकसत्तावादाच्या वर्चस्वाला ती एक लगाम आहे. उतावळेपणानें व पुरा विचार न करितां कांहीं कायदे घडविले जाऊं नयेत किंवा कृत्यें होऊं नयेत यासाठीं तो एक बंदोबस्त आहे आणि त्यामुळें पहिल्या लोकसभेमध्यें व्यक्त होणाऱ्या भावनाप्रधान मताचें निर्विकार विचारशक्तीकडून नियंत्रण केलें जातें." अलेक्झांडर हॅमिल्टन: "कायदेकारी मंडळाची ही शाखा प्रायः विशेष काळजीनें व सारासार विचारानें नेमलेल्या सभासदांची असेल, आणि त्यांचीं ( सीनेटमधील सभासदांचीं ) मनें तितक्या पक्षाभिमानानें दूषित असणार नाहींत." सर हेनरी मेन: "चांगल्या पायावर रचिलेल्या दुसऱ्या चेंबरपासून प्रमादराहित्याची अपेक्षा करावयाची नाहीं. विशेष सुरक्षितपणा हाच तिच्यापासून फायदा होय. या दृष्टीनें, मुळींच दुसरी लोकसभा नसण्यापेक्षां कशाहि प्रकारची दुसरी लोकसभा असली तरी ती श्रेयस्कर होय, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं." आबे सेयेस: "दुसऱ्या लोकसभेनें पहिल्या लोकसभेच्या विरुद्ध मत दिलें तर ती उपद्रव-

कारक समजली पाहिजे, आणि पहिल्या लोकसभेप्रमाणेंच तिनें मत दिलें तर तिची अनवश्यकता सिद्ध होते." गोल्डविन स्मिथः "स्वतःच्या हातीं तितकाच अधिकार नसतां प्राथमिक लोकसभेनें पास केलेल्या कायद्यांची जी तपासणी करूं शकेल व देशांतील सुबुद्ध लोकमत व्यक्त करूं शकेल अशी दुसरी वरिष्ठ लोकसभा तयार करणें हें राजकीय शिल्पकाराच्या सामर्थ्याच्या बाहेरचें आहे. जेथें सत्ता असेल तेथेंच समधात्तपणा उत्पन्न होण्याची तजवीज केली पाहिजे. महत्त्वाच्या बाबतींत सत्ताधारी संस्था बलहीन संस्थेचा अंकुश स्वतःवर चालवून घेईल अशी कल्पना करणें हेंच चुकीचें आहे."

## पुनर्घटित साम्राज्यांतील स्थान.

ब्रिटिश साम्राज्यामध्यें हिंदुस्थानाला कोणतें स्थान मिळावयाचें या प्रश्नाविषयीं आमच्या अँग्लो-इंडियन बंधूंना खुद्द हिंदुस्थानांतल्या अंतर्गत स्वायत्ततेपेक्षां विशेष अगत्य वाटतें. एवढा महत्त्वाचा प्रश्न सोडून लहानशा गोष्टींतच आम्ही गुरफटून राहिलों आहों, हा आमचा तारतम्याभाव पाहून कदाचित् ते आम्हांला हंसतीलही. ज्या योजनेसंबंधानें आम्ही प्रस्तुत विचार करीत आहों, तिच्यामध्यें वरील विषयाचा एकदांच उल्लेख आलेला आहे, आणि स्थूलमानानें असें धोरण दर्शविलेलें आहे कीं, साम्राज्याची पुनर्घटना होईल तेव्हां हिंदुस्थानाला वसाहतींच्या बरोबरीचें स्थान देण्यांत यावें. ही मागणी मान्य होण्यास अगोदर हिंदुस्थानाला स्वराज्याचे अधिकार मिळाले पाहिजेत, ही गोष्ट सिद्धच आहे. अँग्लो-इंडियनांना अर्थात्च तें पसंत पडावयाचें नाहीं. राजकीय वर्चस्व व तदनुषंगानें प्राप्त होणारा आर्थिक बाबतींतील पुढारीपणा हीं अँग्लो-इंडियन सध्यां उपभोगीत आहेत. परंतु हिंदुस्थानाला स्वायत्तशासनाधिकार प्राप्त झाल्यास अँग्लो-इंडियनांचें राजकीय व आर्थिक वर्चस्व प्रथम कमजोर होईल व शेवटीं तर नामशेषच होईल. शिवाय, साम्राज्यपरिषदेमध्यें साम्राज्यासंबंधाच्या व्यापक प्रश्नांची वाटाघाट होईल तेव्हां 'हिंदु-

स्थ.नचे आम्हीच काय ते प्रतिनिधी ' निदान ' आम्ही सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी ' असें अँग्लो-इंडियन म्हणूं शकणार नाहींत. हिंदुस्थानाची अंतर्गत स्वायत्तता व हिंदुस्थानचें साम्राज्यांतील स्थान या गोष्टी अन्योन्यसंबंधी आहेत, तरी त्यांतील विशेष महत्त्वाची व निकडीची कोणती याविषयीं हिंदी व अँग्लो-इंडियन लोकांमध्यें मतभेद असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. भावी साम्राज्यसंघटनेमध्यें हिंदी लोकांचे स्वतःचे प्रतिनिधी दाखल करण्यांत आले नाहींत तर हिंदुस्थानच्या आर्थिक व इतर हितसंबंधांचें योग्य रीतीनें संरक्षण होणार नाहीं. फार लांब कशाला, खुद्द हिंदुस्थानसरकारालाही, तें परतंत्र देशाचें ( Dependency ) सरकार असल्याकारणानें, त्याचा पक्ष पूर्णपणें न्यायाचा असतांहि दक्षिण आफ्रिकेच्या सरकाराबरोबर झालेल्या सामन्यांत हार खावी लागली. भावी इंपीरियल पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानच्या लोकांना—सरकार किंवा येथें तात्पुरतें वास्तव्य करून राहणारे युरोपियन लोक यांचा यांत अंतर्भाव होत नाहीं—कांहीं तरी स्थान देणं हें न्यायाचें व सोयीचें—शहाणपणाचें—आहे, असें वसाहतींतीलहि कित्येक लेखक म्हणूं लागले आहेत. परंतु हे लेखक व पाश्चात्य विचारपद्धतीचें ज्यांनीं ग्रहण केलें आहे असे सुशिक्षित हिंदी लोक पाश्चात्य विचारपद्धतीप्रमाणें राजकीय हक्कांना अपात्र असलेला अशिक्षित बहुजनसमाज, यांच्यामध्यें भेद करितात. ज्यांचा ग्रंथ अँग्लो-इंडियन लोकांना राजकीय बाबतींत बायबलतुल्य प्रमाणभूत झाला आहे ते मि० कर्टिस असा सिद्धांत ठोकून देतात कीं, " युरोपियन लोकांची संख्या लहान असली तरी जगाच्या राज्यकारभारांत राज्यसत्तेचा अनन्याधिकार त्यांचा आहे. याचें कारण उघड आहे व त्याचें खंडन करतां येण्यासारखें नाहीं. तें कारण हें कीं, तो कार्यभार शिरावर घेण्यास जगांत युरोपियन लोकच काय ते समर्थ आहेत. " तथापि मि० कर्टिस यांनीं हिंदुस्थानामध्यें सार्वजनिक बाबतींत मन घालणारे युरोपियन लोकांच्या बरोबरीचे आणि मंत्रिमंडळें व पार्लमेंटें यांतहि शोभूं शकणारे असे मूठभर लोक असून त्यांचा कायदे कौन्सिलामध्यें शिरकाव झाल्याकारणानें हिंदुस्थान

सरकारावर आपली छाप बसविण्याचा अधिकार ते सध्यां उपभोगीत आहेत ही गोष्ट कबूल केलेली आहे. साम्राज्यासंबंधाच्या प्रकरणांत त्यांची सल्ला घेतली जावी, अशाबद्दलची त्यांची मागणी सयुक्तिक आहे, हेंहि मि० कर्टिस यांनीं मान्य केलेलें आहे. मात्र त्या मागणीचा निकाल कशा प्रकारें लावावयाचा याचा विचार ते आपल्या पुढील ग्रंथामध्यें करणार आहेत. साम्राज्य-महाजनसभा ( An Imperial Senate ) व साम्राज्य-लोक-प्रतिनिधिसभा ( An Imperial House of Representatives ) यांच्या संबंधाच्या योजनेची रूपरेखा मि. वर्सफोल्ड यांनीं तयार केलेली असून ब्रिटिश राज्यछत्राखालील बिन-गोऱ्या लोकांना कसें न्यायपूर्वक वागवितां येईल हें दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. साम्राज्याच्या सदरील दोन्ही सभांमध्यें, गौरवर्णीयेतर ( coloured ) लोकांची संख्या श्वेतवर्णीय लोकांपेक्षां अतिशय जास्त आहे तरी प्रतिनिधींची संख्या एकंदर संख्येच्या एकचतुर्थांशानें असेल. गौरवर्णीय लोकांचे सीनेटमधील प्रतिनिधी लोकनियुक्त असतील, परंतु गौरवर्णीयेतरांचे प्रतिनिधी त्यांच्या सरकारां-कडून नेमण्यांत येतील. सरकारनें नेमलेले हे प्रतिनिधी गौरवर्णीयेतर किंवा श्वेतवर्णीयहि असतील. दोहोंपैकीं कोणत्याहि चेंबरसाठीं जे गौरवर्णीयेतर लोक निवडण्यांत येतील तत्पूर्वी गौरवर्णीय लोकांच्या मताधिकाराला ( white franchise ) पात्र झालेले असले पाहिजेत, म्हणजे गोऱ्या लोकांच्या मतदारसंघांमध्यें गोऱ्या लोकांच्या बरोबरीनें निवडणुकींत भाग घेण्याचा अधिकार त्यांना असला पाहिजे. कारण मि. वर्सफोल्ड यांची अशी कल्पना आहे कीं, गौरवर्णीयेतर लोकांच्या प्रदेशांतहि त्या लोकांचे प्रतिनिधी त्यांच्या स्वतंत्र मतदारसंघांच्या मार्फत निवडून आले पाहिजेत. गोऱ्या लोकांचा विशिष्ट मताधिकार पुढीलपैकीं एखाद्या बाबतींत लायकी असल्याचें कोर्टांत शाबीद झाल्यावरच देण्यांत यावयाचाः–( अ ) सर-कारी बाबतींत विशिष्ट प्रकारचा हुद्दा किंवा अमलदारी असणें, ( आ ) सरकारमंजूर युनिव्हर्सिटीची एखादी पदवी असणें,( इ ) वकिली, डॉक्टरी वगैरेपैकीं एखादा प्रतिष्ठित धंदा असणें, (ई) व्यापारी बाबतींत मान्यता

असणें, ( उ ) स्थावर किंवा जंगम मिळकत असणें, आणि ( ऊ ) समाजाची कांहीं उपयुक्त सेवा केलेली असणें. ब्रिटिश साम्राज्यामधील गौरवर्णीयेतर लोकांच्या वांट्यास एकचतुर्थांश जागा यावयाच्या, त्यांपैकीं शेंकडा ६० जागा हिंदुस्थानच्या वांट्यास येतील. मि० वर्सफोल्ड यांनीं दिलेल्या आंकड्यांप्रमाणें महाजनसभे ( सीनेट ) मधील २०० जागांपैकीं ३० व लोकप्रतिनिधिसभेमधील ४०० जागांपैकीं ६५ हिंदुस्थानला मिळतील. संख्येच्या प्रमाणानें प्रतिनिधी निवडले जाणें अशक्य आहे. कारण, तसें केल्यास हिंदुस्थानच्या वांट्याला तीनचतुर्थांश जागा येतील, आणि कोणत्याहि मंत्रिमंडळाचें हिंदुस्थानच्या मतावर अवलंबून राहिल्याखेरीज चालावयाचें नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सगळ्या साम्राज्यावर हिंदुस्थानचीच सत्ता चालेल. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, हिंदुस्थानांतील बहुतेक लोकांना आपल्या मताधिकाराचा सुबुद्धपणें उपयोग करितां यावयाचा नाहीं. म्हणून मि० वर्सफोल्ड हे पुढीलप्रमाणें समारोप करितात:" हिंदुस्थानावरील युरोपियन लोकांच्या नियंत्रणसत्तेस धोका न आणतां अथवा साम्राज्याच्या कारभाराची मुख्य संस्था या नात्यानें मध्यवर्ती कायदेकारी मंडळाच्या लोकप्रतिनिधिसभे- ( Lower House ) च्या कार्यक्षमतेला अन्य प्रकारें बाध न आणतां तिच्यामध्यें हिंदुस्थानचे त्याच्या कामाला पुरतील इतके प्रतिनिधी जेणेंकरून प्रविष्ट करतां येतील अशी निवडणुकीची पद्धति शोधून काढणें हेंच मुख्य कार्य आहे. " एवंच, साम्राज्याची घटना तयार करूं पाहणारांना कशाबद्दल अडचण वाटत आहे तें आतां आमच्या ध्यानांत येऊं शकेल. हिंदुस्थानांतील लोकांना गोऱ्या लोकांच्या बरोबरीनें साम्राज्यांतील हक्क दिले तर हिंदी लोक एकदम डोक्यावर जाऊन बसतील; बरें साम्राज्यघटनेच्या योजनेंतून हिंदुस्थानाला वगळावें तर तें न्यायाचें दिसणार नाहीं. म्हणून पहिल्यानें हिंदुस्थानला पंगु करावयाचें व नंतर त्याला साम्राज्यघटनेमध्यें दाखल होऊं द्यावयाचें, अशी तोड काढण्यांत आली आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानांची संख्या हिंदूंपेक्षां कमी असल्या-

कारणानें त्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणाबाहेर प्रतिनिधी निवडण्याचा हक्क देण्यांत आला आहे; तर उलटपक्षीं साम्राज्यामध्यें हिंदी लोकांचें संख्याधिक्य आहे म्हणून साम्राज्यघटनेमध्यें त्यांचे प्रतिनिधी अगदीं थोडे ठेवावयाचे. ब्रिटिश साम्राज्य एकच, पण त्यांत निरनिराळ्या बाबतींत निरनिराळीं तत्त्वें लागू करण्यांत येतात ! हिंदुस्थान हा साम्राज्यघटनेमध्यें एक मोठा कांटाच झाला आहे व तो सरळ उपटून काढल्याखेरीज गत्यंतर नाहीं ! हिंदुस्थान आकारानें मोठें असून साम्राज्याला त्याचें फार महत्त्व व किंमत आहे, हा त्याचा एक अपराधच झाला म्हणावयाचा. लहान तोंडीं मोठा घांस घेऊं नये तो यासाठीं ! अशा बाबतींत लॉर्ड मिल्नरसारखे स्पष्टवादी व दुसऱ्यांच्या मतांस न जुमानणारे निग्रही मुत्सद्दी छान तोड शोधून काढतात. न्यायाचें अथवा समतेचें बंड ते चालूं देत नाहींत. गौरवर्णीयेतरांना कसा मताधिकार द्यावयाचा व गौरवर्णीयांच्याच हातीं सत्ता कशी ठेवावयाची याविषयीं त्यांनीं पुढीलप्रमाणें मत दिलें आहे. “ काळे व गोरे यांच्या बाबतींत मालमत्ता व शिक्षण यांची इयत्ता सारखीच कां ठेवावी हें मला मुळींच समजत नाहीं. काळ्या लोकांच्या बाबतींत ही इयत्ता जाणूनबुजून व सांगूनसवरून मी अधिक ठेवीन, आणि ह्या धोरणाचें समर्थन करावयाला मी तयार आहें. मात्र कोणतीही इयत्ता ठरविली तरी, त्या इयत्तेची लायकी दाखविल्यावर सर्व जातींच्या गौरवर्णीयेतर लोकांना सर्व प्रकारच्या कायदेशीर गैरलाभांपासून मुक्त होण्याचा मार्ग मोकळा असला पाहिजे. ” ( हीं वाक्यें मि. वर्सफोल्ड यांनीं आपल्या पुस्तकामध्यें उद्धृत केलीं आहेत ). साम्राज्य-एकीकरणाच्या ( Imperial Federation) कल्पनेनें ज्यांचीं मनें मोहित केलीं आहेत असे प्रसिद्ध लोक इंग्लंडांत व वसाहतींत पुष्कळ आहेत. परंतु ज्यांच्या मताला महत्त्व दिलें पाहिजे असे दुसरेहि कांहीं लोक असून त्यांच्या मतें ती कल्पना अप्रबुद्धपणाची व अव्यवहार्य आहे. हिंदी लोकांच्या मताला मान मिळणें शक्य असेल, तर बहुतेक हिंदी पुढारी त्या कल्पनेला विरोधच करितील.

त्यांची अशी दृढ समजूत आहे कीं, हिंदुस्थानाला जर स्वराज्य मिळावयाचें नसेल तर या नवीन व्यवस्थेपेक्षां सध्यांची व्यवस्थाच हिंदुस्थानच्या फायद्याची आहे.

## विसंगतपणा.

कित्येक टीकाकारांच्या मतें आमची प्रस्तुत योजना विसंगततेच्या दोषानें युक्त आहे. तो विसंगतपणा हा कीं, व्यापारासंबंधाच्या जकातींचें नियंत्रण करण्याच्या हक्कासुद्धां पूर्ण आर्थिक स्वायत्ततेची मागणी केलेली असतांहि, त्या योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं सर्व प्रकारच्या लष्करी व आरमारी खर्चाच्या प्रश्नाला धक्काहि लावलेला नाहीं व ती बाब कायदेकारी मंडळाच्या अंकुशाविरहित, पूर्वीप्रमाणेंच सर्वस्वीं कार्यकारी मंडळाच्या — अधिकारिवर्गाच्या ( Executive Government ) — हातीं ठेविली आहे. हें विधान खरें आहे. हिंदुस्थानला होमरूल पाहिजे असें म्हणणाऱ्या लोकांनीं हिंदुस्थानच्या संरक्षणासंबंधाच्या प्रश्नाला मुळींच हात लावलेला नाहीं. अर्थात्च स्वराज्याधिकाराच्या बाबतींत प्रस्तुत योजनेच्या अनुसार हिंदुस्थानचा दर्जा वसाहतींच्या दर्जापेक्षां कमी आहे. कारण, गेल्या थोड्या वर्षांत वसाहतींनीं स्वतःचीं लष्करें व आरमारें स्थापलीं असून त्यांच्यावर त्यांचाच पूर्ण ताबा आहे. आणखी असें कीं, व्हाइसरॉयच्या कायदे कौन्सिलला लष्करी खर्चाच्या बाबतींत आजमितीस जो अधिकार आहे, त्याच्यावरहि या योजनेमध्यें तुळशीपत्र ठेवून पाणी सोडण्यांत आलें आहे, असें दिसून येतें. तथापि, जेथें तडजोडीचेंच सारें महत्त्व आहे अशा बाबतींत सयुक्तिकपणा व सुसंगतपणा यांची अपेक्षा कशी करतां येईल ? कोणतेंहि तत्त्व, निर्बंध व सुरक्षितपणाचे आगाऊ उपाय यांच्याखेरीज आत्यंतिक रीतीनें अंमलांत आणतां येणें शक्य नाहीं. जोंपर्यंत कौन्सिलांतील जादा सभासदांनीं आणलेले ठराव, सरकारच्या संमतीखेरीज, पास होण्याची लवमात्र आशा नाहीं आणि यदाकदाचित् ते पास झाले तरी त्यांना

केवळ शिफारसीपेक्षां विशेष महत्त्व नाहीं, तोंपर्यंत लष्करी खर्चासंबंधाचे प्रश्न कौन्सिलच्या कार्यक्षेत्रांत आले काय किंवा न आले काय, दोहोंचेंहि फारसें महत्त्व नाहीं. परंतु लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य असलेलें व स्वायत्ताधिकारानें युक्त असें कायदेकारी मंडळ, प्रस्तुत योजनेला अनुसरून, अस्तित्वांत आल्यावर या प्रश्नाला वेगळें स्वरूप प्राप्त होतें. देशाच्या सुरक्षिततेचीच नव्हे तर त्याचा ब्रिटिश साम्राज्याशीं असलेला संबंध अबाधित राहील याविषयींचीहि आगाऊ तजवीज ज्या योजनेमध्यें केलेली नसेल तिच्याकडे साम्राज्याचे अधिकारी ढुंकूनहि पाहणार नाहींत. प्रस्तुत योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं आर्थिक स्वायत्ततेच्या बाबतींत लष्करी व आरमारी खर्चाची महत्त्वाची बाब वगळली आहे; यावरूनच ब्रिटिश साम्राज्याविषयीं त्यांच्या मनांत किती निष्ठा आहे आणि ब्रिटिश साम्राज्यांतच हिंदी देशभक्तांच्या अत्युच्च ध्येयांना मूर्त स्वरूप प्राप्त होईल अशी त्यांची किती मनःपूर्वक समजूत आहे, हेंहि दिसून येतें. खरें सांगावयाचें म्हणजे प्रस्तुत योजनेसंबंधानें वाटाघाट चालू असतांना, लष्करी खर्चासंबंधाचा प्रश्न कांहीं ठरीव वर्षेंच कायदे कौन्सिलच्या नियंत्रणाधिकारांतून वगळण्यांत यावा, अशी एक सूचना करण्यांत आली होती, परंतु कॉंग्रेसच्या कमिटीनें ती सूचना लगेच फेंटाळून लाविली.

## लोकनियुक्त कार्यकारी सभासद.

कार्यकारी मंडळाचे निम्मे सभासद हिंदी असून ते निवडलेले असावे, अशी जी प्रस्तुत योजनेमध्यें तरतूद करण्यांत आलेली आहे, तिच्यावर कांहीं टीका झालेली आहे. मंत्रिमंडळाची लोकांकडून निवड होणें ही गोष्ट कांहींशीं अभूतपूर्व आहे, यांत शंका नाहीं. स्वित्झर्लंडमध्यें आणि दक्षिण आफ्रिकेंतील प्रांतिक कमिट्यांच्या बाबतींत अशी व्यवस्था आढळून येते. ऑस्ट्रेलियामध्यें अशी कल्पना सुचविण्यांत आली आहे, परंतु ती अद्यापि अमलांत मात्र आलेली नाहीं. महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतींत मंत्रिमंडळाचा पराभव झाला कीं, मंत्रि-

मंडळानें राजीनामा दिला पाहिजे, अशी जी पार्लमेंटरी राज्यपद्धति तिच्याशीं वरील कल्पनेचा मेळ घालतां येत नाहीं, असा आक्षेप आहे. परंतु पार्लमेंटरी राज्यद्धति अस्तित्वांत आणणें हा मुळीं आमच्या योजनेचा उद्देश नाहीं. अर्थात्च वरील आक्षेप येथें लागू पडत नाहीं. निवडणुकीच्या पद्धतीनें नेहमीं सर्वांत लायक माणसेंच उपलब्ध होतील असें नाहीं, हा जो या बाबतींत दुसरा आक्षेप आहे, त्याला मात्र विशेष महत्त्व दिलें पाहिजे. निवडणुकीमध्यें यशस्वी होण्याला जे गुण पाहिजे असतात, ते गुण अधिकार चालविण्याच्या प्रत्यक्ष कामामध्यें उपयोगीं पडत नाहींत हें खरें आहे; परंतु निवडणुकीखेरीज दुसरा कोणता उपाय आहे? त्याखेरीज, व्हाइसरॉयनीं नेमणूक करणें हाच काय तो एक मार्ग आहे. व्हाइसरॉयनीं सरकारी किंवा बिनसरकारी लोकांतून आपले मंत्री निवडावयाचे; परंतु हिंदुस्थानसरकारच्या कार्यकारी मंडळामध्यें अधिकारी वर्गांतील इसमांना नेमण्याच्या अगदीं विरुद्ध हिंदी लोकमत आहे. तशींच कांहीं विशेष कारणें असल्याखेरीज या तत्त्वाच्या बाबतींत तडजोड करतां येणें शक्य नाहीं. बरें, बिनसरकारी लोकांमध्येंच निवडानिवड करावयाची असें मानलें तरी, निरनिराळ्या प्रांतांमध्यें उपलब्ध असणाऱ्या लोकांसंबंधाची जरूर ती माहिती कोणा तरी व्हाइसरॉयला असूं शकेल काय? मतदारांचीं मतें मिळविण्यासाठीं ज्या निरनिराळ्या प्रकारच्या शक्कली लढविण्यांत येतात, त्यांच्यापेक्षां मोठमोठ्या अमलदारांना हुद्दे देण्याच्या बाबतींत घडणारे प्रकार कमी लाजिरवाणे असतात असें नाहीं. योग्यतासंपन्न हिंदी लोकांबरोबर दळणवळण ठेवण्याचे व संभाषण करण्याचे प्रसंग व्हाइसरॉयना इतके कमी येत असतात कीं, एखाद्या उमेदवाराचें शील कितपत उच्च दर्जाचें आहे व त्याच्या समाजांत त्याची कितपत मान्यता आहे, हें त्यांना समजणें साधारणपणें शक्य नसतें. उलटपक्षीं, तशा विशेष लायकीचा इसम व्हाइसरॉयना माहीत असला तर ते बहुतकरून त्याची नेमणूक करितील, परंतु तोच इसम निवडणुकीमध्येंहि बहुमतानें पसंत होण्याचा तितकाच संभव आहे. या दृष्टीनें पाहिलें

असतां ह्या दोन प्रकारांत म्हणण्यासारखा कांहीं फरक नाहीं. या जागा मिळविण्याकरितां उमेदवारांकडून मतें मिळविण्याच्या बाबतींत नाना प्रकारच्या युक्त्या लढविण्यांत येतील, एकमेकांचीं कामें साधून देण्याविषयीं आपसांत गुप्त करारमदार होतील आणि त्यामुळें मतदारांना वाईट वळण लागेल, हीच या बाबतींत भीतीची व अनिष्ट गोष्ट आहे. अगदीं सरळपणानें उमेदवारांनीं वागल्याखेरीज या अनिष्टाचा प्रतिकार करण्यास दुसरा उपाय नाहीं. प्रस्तुत योजना तयार करणारांच्या मनांत या बाबतींत दोन गोष्टींसंबंधानें मुख्यतः विचार आलेला होता. एखादा मनुष्य खानदानी घराण्यांतला असून त्याच्या अंगीं तोंडपुजेपणा असला म्हणजे त्याच्या गैरलायकीकडे व्हाइसरॉयचें लक्ष न जाण्याचा संभव आहे, ही कांहींशा अनुभवानें वाटत असलेली भीति हें पहिलें कारण, व दुसरें कारण असें कीं, मंत्रिमंडळाला अधिकारावरून दूर करण्याच्या सत्तेच्या अभावीं निदान त्या मंडळांतील निम्मे लोक तरी कायदेकारी मंडळाशीं सहसा मतभेदानें न वागणारे असावे. कांहीं असलें तरी, प्रस्तुत योजना करणारांची या व्यवस्थेवर सर्वस्वीं मदार नाहीं. तिचे सुपरिणाम दिसून आले नाहींत तर तिच्यामध्यें आम्हांला फेरबदल करितां येणार नाहीं, असें थोडेंच आहे ?

## सुशिक्षितवर्गाचें वर्चस्व.

ह्या योजनेवर दुसरा आक्षेप असा आहे कीं, ती अमलांत आल्यास मूठभर सुशिक्षित लोकांचें त्यांच्यापेक्षां संख्येनें फारच अधिक असलेल्या अशिक्षित लोकांवर अबाधित वर्चस्व चालेल; थोडे लाख लोक कोट्यवधि लोकांवर अंमल चालवितील. त्यावर उत्तर हें कीं, तसें झालें तरी संख्येच्या दृष्टीनें एकंदरींत प्रगतिच होईल. कारण सध्यांच्या राज्यकर्त्या वर्गांतील लोकांची संख्या येथें अधिक तर हजारांनींच मोजण्यासारखी आहे. यावर टीकाकार म्हणतील: "परंतु खेडेगांवांतील लोकांच्या जीवनक्रमाचें व वाचाहीन कोट्यवधि लोकांसंबंधाचें आह्मांला ज्ञान आहे. तुम्हां शहरांत

राहणाऱ्या सुशिक्षित हिंदी लोकांना तें ज्ञान मिळण्यासारखें नाहीं व तें मिळविण्याची तुह्मांला इच्छाहि नाहीं." यावर आमचा असा उलट जबाब आहे कीं, "अशी वस्तुस्थितिच नाहीं. सुशिक्षित लोक व अशिक्षित लोक यांच्या दरम्यान, विरोधभाव व तिरस्कार यांच्यामुळें, परस्परसंबंध कांहीं नाहीं, ही गोष्टच मुळीं कल्पित असून तिच्या योगानें तुम्ही आत्मवंचना करीत आहां. बहुतेक सुशिक्षित लोक मूळचे खेड्यांतलेच असतात आणि खेड्यांतील जीवनक्रमाशीं त्यांचा संबंध कायम असतो. उलटपक्षीं सध्यांच्या राज्यकारभारांतलें एक ढोबळ व्यंग असें आहे कीं, जे हजारों मैलांवरून साता समुद्राच्या पलीकडील देशांतून येतात, ज्यांना देशभाषांचें कामचलाऊ ज्ञानहि नसतें आणि ज्यांना खेडवळ वगैरे अशिक्षित लोकांशीं बोलतांना नेहमीं दुभाष्याची जरूरी पडते, असे लोक राज्य चालवितात. शिवाय, ते इतक्या गर्विष्ठपणानें व अलगपणानें वागतात कीं त्यांचा तो गर्विष्ठपणा व अलगपणा ब्राह्मणांच्या जुन्या काळच्या अहंमन्यतेपेक्षां निराळ्या प्रकारचा व वेगळ्या स्वरूपाचा असला तरी परस्परांविषयीं सहानुभूति व भरंवसा वाटण्याच्या बाबतींत त्यापेक्षांहि विशेष प्रतिबंधक असतो. हिंदुस्थान व हिंदुस्थानांतील लोक म्हणजे एक कधींहि न सुटणारें कोडें आहे, जों जों हिंदुस्थानामध्यें जास्त जास्त दिवस घालवावे तों तों तेथले लोक, त्यांचा स्वभाव, त्यांचे विचार व त्यांची राहणी यांचें यथातथ्य ज्ञान होणें अधिकाधिक अशक्य वाटूं लागतें, अशी आतां अँग्लो-इंडियनांची कायमची समजूत झालेली दिसते." "परंतु खालील वर्गांतील लोक स्वसंरक्षणासाठीं आमच्यावरच सर्व भार ठेवून आहेत. त्यांची ज्या बेबंदशाहींपासून व जुलमापासून आम्हीं मुक्तता केली त्या बेबंदशाहीचें व जुलमाचें त्यांना अद्यापि स्मरण आहे आणि तुम्हीं कैक शतकें त्यांच्यावर सामाजिक बाबतींत जुलूम केलेला असल्याकारणानें आमच्या हातांतील सत्ता तुमच्या हातीं जावी या गोष्टीला ते कधींहि रुकार देणार नाहींत," असें आमचे आक्षेपक म्हणतात, तेव्हां आम्ही त्यांना पुढीलप्रमाणें उत्तर देतों: "इतर देशांच्या इति-

हासाप्रमाणें आमच्या देशाच्या इतिहासांत बऱ्यावाईट राजसत्तेचे काळ येऊन गेले आहेत. केव्हां समाजाचें हित झालें आहे तर केव्हां समाजांत विपत्ति वाढली आहे; केव्हां प्रगति झाली आहे तर केव्हां ऱ्हास झाला आहे. तुम्ही या देशांत आलां तेव्हां आम्ही भयंकर दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलों होतों, अव्यवस्था माजली होती, साम्राज्याचीं शकलें उडालीं होतीं. तुमच्या दृष्टीस अर्थातच तोच देखावा पडला आणि आमच्या देशाची तशी स्थिति झालेली होती म्हणून तुमचें राज्य येथें स्थापित होण्यास साहाय्य झालें. वरच्या वर्गांतील लोकांनीं खालच्या वर्गावर जुलूम करणें ही गोष्ट पौर्वात्य देशांच्या इतिहासांत मात्र आढळून येते असें नाहीं. अर्वाचीन भूतदयाप्रधान युगाचा उदय होण्याच्या पूर्वी यूरोपचा इतिहास अशाच प्रकारच्या सत्तादुरुपयोगाच्या व जोरजुलुमाच्या उदाहरणांनीं कलंकित झालेला होता. प्राचीन काळीं प्लेटोनें सांगून ठेवलें आहे कीं, प्रत्येक शहरामध्यें दोन शहरें असतात, एक श्रीमंतांचें व दुसरें गरीबांचें. आजमित्तीसहि अत्यंत उदार राज्यव्यवस्थेखालीं असलेल्या देशांत सुद्धां कायदे करून त्यांचा स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्यासाठीं उपयोग करणाऱ्या, परंतु तोंडानें मात्र बहुजनसमाजाला साहाय्य करण्याचा व दुःखमुक्त करण्याचा आव घालणाऱ्या, लोकांचा पढतमूर्खपणा व स्वार्थपरायणता यांचा शेतकरी व कामकरी लोकांकडून धिक्कार होत असल्याचें दिसून येईल. लोकसमाजाच्या स्थितीची सुधारणा व समाजसेवा यांविषयींच्या कल्पना आणि राज्यव्यवस्थेचे उच्च आदर्श यांची हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकांना ओळख पटलेली आहे. देशाच्या उत्कर्षाविषयीं त्यांना पूर्वीपेक्षां फारच अगत्य वाटत असल्यामुळें त्यांचें ज्ञान आणि देशसेवेला स्फूर्तिकारक अशी सहानुभूति हींहि फार वाढलेलीं असल्याकारणानें पूर्वीचें जातिवर्चस्व व निष्ठुर जुलूम यांचें पुनरुज्जीवन होईल अशी भीति बाळगण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं. हल्लींच्या सत्ताधिकारिवर्गाइतका हा नवीन सत्ताधिकारी—सुशिक्षित हिंदी लोकांचा—वर्ग देशाला हितकारक खास होईल.'' बहुजनसमाजाचें संरक्षण झालें

पाहिजे अशासंबंधाची जी ही सबब पुढें आणली जाते तिच्यावर तीं आणणारांचा—तो भ्रम कायम ठेवण्यांत ज्यांचा फायदा आहे त्यांचा—तरी विश्वास आहे किंवा काय याबद्दल शंका वाटते. लोकांमध्यें शिक्षण-प्रसार करण्याच्या सूचनेस विरोध करणारे व पुनः लोकांच्या अशिक्षित-पणाचा कोटिक्रम पुढें आणून राजकीय प्रगतीचा काळ अद्यापि आला नाहीं म्हणून सांगणारे कोण ? सुशिक्षित हिंदी लोक कीं हल्लींचे राज्यकर्ते ? प्रत्येक माणसाला आपआपल्या अभिरुचीप्रमाणें पदार्थ विकत घेण्याची मोकळीक असली पाहिजे असें ह्मणून सरकारच्या अब-कारी धोरणाचें समर्थन करण्याचा प्रयत्न कोणांकडून केला जातो ? त्याचप्रमाणें, रयतेजवळ जास्त पैसे झाले म्हणजे ते दारूच्या गुत्त्यांत जातात या सबबीवर, दर पैमाषीला सरकारकडून जमिनीवरील कर वाढविण्यांत येतो, त्याला कोण पसंती दाखवितात ? व्यापाराच्या बाब-तींत खुले दरवाजे ठेवून देशामध्यें सस्ता तकलदी परदेशी माल येऊन लोटण्याला कोणाकडून मोकळीक मिळते ? आणि ग्रेटाब्रिटन व त्याच्या वसाहती यांसुद्धां दुसऱ्या देशांनीं ज्या एकाच उपायानें आपल्या उद्यो-गधंद्यांची वृद्धि केली त्या उपायांचा अवलंब करून या देशांतील लोकांचे उद्योगधंदे ऊर्जितावस्थेस आणावयाचें नाकारणारे कोण ? जबर होम-चार्जेस भरण्यासंबंधांतील वटावाची सरकारची अडचण टाळण्याकरितां थोड्या वर्षांपूर्वी गरीब शेतकऱ्यांच्या खिशाला चट्टा बसेल याची पर्वा न करतां चलनी नाण्यासंबंधाचा कायदा कोणीं केला ? त्याच वेळेस, युरोपियन लोकांकरितां राखून ठेवलेल्या नोकऱ्यांच्या बाबतींत, कर भर-णाऱ्या लोकांच्या हितसंबंधांकडे लक्ष न देतां, वटावाची भरपाई म्हणून अलावन्स कोणीं दिलें ? सध्यां उधळमाधळ करणें हें आत्मघातकीपणाचें समजलें जात असतां व ऐषआराम करणें हा महदपराध म्हणून मानण्यांत येत असतां, गिरिशिखरांवर वर्षांतून सहा महिने राहून कोण चैन करतात व बढतीमध्यें झालेल्या दिरंगाईबद्दल सिव्हिलियनांना जादा अलावन्स देण्यास मंजुरी देऊन शिक्षणाच्या बाबतींत मात्र छाटाछाट कोण करतात ?

ह्यासाप्रमाणें आमच्या देशाच्या इतिहासांत बऱ्यावाईट राजसत्तेचे काळ येऊन गेले आहेत. केव्हां समाजाचें हित झालें आहे तर केव्हां समाजांत विपत्ति वाढली आहे; केव्हां प्रगति झाली आहे तर केव्हां ऱ्हास झाला आहे. तुम्ही ह्या देशांत आलां तेव्हां आम्ही भयंकर दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलों होतों, अव्यवस्था माजली होती, साम्राज्याचीं शकलें उडालीं होतीं. तुमच्या दृष्टीस अर्थात्च तोच देखावा पडला आणि आमच्या देशाची तशी स्थिति झालेली होती म्हणून तुमचें राज्य येथें स्थापित होण्यास साहाय्य झालें. वरच्या वर्गांतील लोकांनीं खालच्या वर्गावर जुलूम करणें ही गोष्ट पौर्वात्य देशांच्या इतिहासांत मात्र आढळून येते असें नाहीं. अर्वाचीन भूतदयाप्रधान युगाचा उदय होण्याच्या पूर्वी यूरोपचा इतिहास अशाच प्रकारच्या सत्तादुरुपयोगाच्या व जोरजुलुमाच्या उदाहरणांनीं कलंकित झालेला होता. प्राचीन काळीं प्लेटोनें सांगून ठेवलें आहे कीं, प्रत्येक शहरामध्यें दोन शहरें असतात, एक श्रीमंतांचें व दुसरें गरीबांचें. आजमित्तीसहि अत्यंत उदार राज्यव्यवस्थेखालीं असलेल्या देशांत सुद्धां कायदे करून त्यांचा स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्यासाठीं उपयोग करणाऱ्या, परंतु तोंडानें मात्र बहुजनसमाजाला साहाय्य करण्याचा व दुःखमुक्त करण्याचा आव घालणाऱ्या, लोकांचा पढतमूर्खपणा व स्वार्थपरायणता यांचा शेतकरी व कामकरी लोकांकडून धिक्कार होत असल्याचें दिसून येईल. लोकसमाजाच्या स्थितीची सुधारणा व समाजसेवा यांविषयींच्या कल्पना आणि राज्यव्यवस्थेचे उच्च आदर्श यांची हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकांना ओळख पटलेली आहे. देशाच्या उत्कर्षाविषयीं त्यांना पूर्वीपेक्षां फारच अगत्य वाटत असल्यामुळें त्यांचें ज्ञान आणि देशसेवेला स्फूर्तिकारक अशी सहानुभूति हींहि फार वाढलेलीं असल्याकारणानें पूर्वीचें जातिवर्चस्व व निष्ठुर जुलूम यांचें पुनरुज्जीवन होईल अशी भीति बाळगण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं. हल्लींच्या सत्ताधिकारिवर्गाइतका हा नवीन सत्ताधिकारी–सुशिक्षित हिंदी लोकांचा–वर्ग देशाला हितकारक खास होईल. '' बहुजनसमाजाचें संरक्षण झालें

पाहिजे अशासंबंधाची जी ही सबब पुढें आणली जाते तिच्यावर तीं आणणारांचा—तो भ्रम कायम ठेवण्यांत ज्यांचा फायदा आहे त्यांचा—तरी विश्वास आहे किंवा काय याबद्दल शंका वाटते. लोकांमध्यें शिक्षण-प्रसार करण्याच्या सूचनेस विरोध करणारे व पुनः लोकांच्या अशिक्षित-पणाचा कोटिक्रम पुढें आणून राजकीय प्रगतीचा काळ अद्यापि आला नाहीं म्हणून सांगणारे कोण ? सुशिक्षित हिंदी लोक कीं हल्लींचे राज्यकर्ते ? प्रत्येक माणसाला आपआपल्या अभिरुचीप्रमाणें पदार्थ विकत घेण्याची मोकळीक असली पाहिजे असें ह्मणून सरकारच्या अब-कारी धोरणाचें समर्थन करण्याचा प्रयत्न कोणांकडून केला जातो ? त्याचप्रमाणें, रयतेजवळ जास्त पैसे झाले म्हणजे ते दारूच्या गुत्त्यांत जातात या सबबीवर, दर पैमाषीला सरकारकडून जमिनीवरील कर वाढविण्यांत येतो, त्याला कोण पसंती दाखवितात ? व्यापाराच्या बाब-तींत खुले दरवाजे ठेवून देशामध्यें सस्ता तकलदी परदेशी माल येऊन लोटण्याला कोणाकडून मोकळीक मिळते ? आणि ग्रेटब्रिटन व त्याच्या वसाहती यांसुद्धां दुसऱ्या देशांनीं ज्या एकाच उपायानें आपल्या उद्यो-गधंद्यांची वृद्धि केली त्या उपायांचा अवलंब करून या देशांतील लोकांचे उद्योगधंदे ऊर्जितावस्थेस आणावयाचें नाकारणारे कोण ? जबर होम-चार्जेस भरण्यासंबंधांतील वटावाची सरकारची अडचण टाळण्याकरितां थोड्या वर्षांपूर्वीं गरीब शेतकऱ्यांच्या खिशाला चट्टा बसेल याची पर्वा न करतां चलनी नाण्यासंबंधाचा कायदा कोणीं केला ? त्याच वेळेस, युरोपियन लोकांकरितां राखून ठेवलेल्या नोकऱ्यांच्या बाबतींत, कर भर-णाऱ्या लोकांच्या हितसंबंधांकडे लक्ष न देतां, वटावाची भरपाई म्हणून अलावन्स कोणीं दिलें ? सध्यां उधळमाधळ करणें हें आत्मघातकीपणाचें समजलें जात असतां व ऐषआराम करणें हा महदपराध म्हणून मानण्यांत येत असतां, गिरिशिखरांवर वर्षांतून सहा महिने राहून कोण चैन करतात व बढतीमध्यें झालेल्या दिरंगाईबद्दल सिव्हिलियनांना जादा अलावन्स देण्यास मंजुरी देऊन शिक्षणाच्या बाबतींत मात्र छाटाछाट कोण करतात ?

पब्लिक सर्व्हिसेस कमिशनच्या रिपोर्टाच्या अन्वयें, आधींच भरपूर पगार मिळविणाऱ्या लोकांना आणखी जास्त पगार देण्याचा प्रसंग येईल तेव्हां कर भरणाऱ्या वाचाहीन व मताधिकारहीन लोकांची बाजू कोण घेणार आहे? बिचाऱ्या सुशिक्षित हिंदी लोकांना कौन्सिलामध्यें आपलें मताधिक्य करतां येणें शक्य नाहीं. त्यांनीं तोंड वेंगाडून केविलवाण्या स्वरानें आपलें रडगाणें गावें, परंतु "आम्ही हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाचे कैवारी असून त्यांच्या निर्दय देशबंधूंपासून त्यांचें रक्षण करीत आहों" अशी विस्मयमूढ जगाच्या कानाशीं मोठमोठ्या तुताऱ्या व कर्णे वाजवून जी प्रचंड घोषणा करण्यांत येते तिच्यामध्यें त्या रडगाण्याचा सूर कोठच्या कोठें लोपून जातो.

बहुजनसमाजाच्या हितसंबंधांचें रक्षण होण्यास युरोपियन लोकां-च्याच हातीं सगळीं अधिकारसूत्रें राहिलीं पाहिजेत, असल्या सबबी सांगून सुशिक्षित हिंदी लोकांना त्यांच्या वाजवी हक्कांपासून दूर ठेवणें हें राजकीय दृष्ट्या खचित शहाणपणाचें नाहीं. सुशिक्षित हिंदी लोकांच्या मागण्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्याच द्योतक आहेत, त्यांचा उदात्ततर असा कांहीं हेतु नाहीं असें जरी धरून चाललें, तरी तशा महत्त्वाकांक्षा धरणें हा कांहीं दुर्गुण नव्हे, कीं अपराध नव्हे. त्यांचा धिक्कार करणें व त्या जागच्या जागीं दाबून टाकणें योग्य होणार नाहीं. गौरवर्णीय लोक असोत किंवा इतर लोक असोत, त्या सर्वांच्या अंतःकरणांत जीं प्रगति-तत्त्वें बीजरूपानें असतात त्यांचींच तीं फळें होत. अशा महत्त्वाकांक्षे-विषयीं तिरस्कारबुद्धि व्यक्त करणारे लोक स्वतःच्याच अत्यंत उदात्त अशा अंशाचा तिरस्कार करितात, असेंच म्हटलें पाहिजे. या बाब-तींत लॉर्ड डर्हाम यांनीं प्रदर्शित केलेले विचार वाजवीपेक्षां अधिक कडक भाषेत प्रदर्शित केले आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. ते म्हणतातः "स्वतः महत्पदावर चढावें अशी आकांक्षा बाळगणें हा जोंपर्यंत मनु-ष्याचा स्वभावधर्म आहे आणि जोंपर्यंत प्रत्येक स्वतंत्र व संस्कृतिसंपन्न समाजामध्यें या महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहन देणें हें नीतिशुद्ध धोरण समजलें जातें, तोंपर्यंत त्या आकांक्षेचा योग्य रीतीनें विकास होऊं देणें हें शहा-

ण्या राज्यकर्त्यांचें एक महत्त्वाचें कर्तव्यच आहे. मतलबी व महत्त्वाकांक्षी व्यक्तींच्या प्राबल्यामुळेंच या वसाहतींमधील कारभाराच्या अव्यवस्थेमध्यें अधिक गोंधळ माजला आहे असें जें साधारणत: विधान करण्यांत येतें तें खरें आहे असें मानलें तरी, ती अनिष्ट स्थिति दूर करण्याचा उत्कृष्ट उपाय म्हटला म्हणजे जेणेंकरून सरकारच्या कामांत आडकाठ्या घालण्याऐवजीं सरकारच्या हेतूंना साहाय्य करण्याकडेच तशा लोकांची प्रवृत्ति होईल अशा प्रकारें त्यांच्या महत्त्वाकांक्षेला वाव देणें हाच होय. लायक लोकांना उच्च जागा मिळण्याची लोकमतानुसारी राज्यव्यवस्थेमध्यें तजवीज केल्यानें उद्दाम आकांक्षा त्वरित्त शांत करितां येतील आणि सध्यां अव्यवस्था माजविण्यांत ज्या बुद्धिमत्तेचा दुरुपयोग होत आहे त्या बुद्धिमत्तेचा योग्य व उदात्त कार्यांमध्यें उपयोग करून घेतां येईल. सध्यां युनायटेड स्टेट्स् या नांवानें ओळखले जाणारे प्रांत ज्या कारणांमुळें ब्रिटनच्या हातून गेले असें ॲडाम स्मिथ यांनीं यथार्थ दाखविलें आहे तें कारण आम्हीं या वसाहतींमधून काढून टाकलें पाहिजे; म्हणजे याचा अर्थ असा कीं, सध्यां वसाहतींतील निरनिराळ्या पक्षांमध्यें अल्पस्वल्प बक्षिसें मिळविण्याकरितां जी सोडतीवजा किंवा सट्टेबाजीसारखी धडपड चालते ती कमीपणाची आहे असें वाटून वसाहतींतील पुढारी लोकांना विशेष महत्त्व संपादण्याची इच्छा व्हावी, अशासाठीं सवड ठेवण्यांत आली पाहिजे. ” मि. कर्टिस यांनाहि सुशिक्षित व लायक माणसांची बुद्धिमत्ता उपयोगावांचून फुकट जाऊं देण्याचें धोरण नापसंत आहे. “ राज्याधिकार चालविण्याची पात्रता ज्या नागरिकांनीं खरोखरच स्वत:च्या अंगीं थोड्याबहुत प्रमाणानें आणलेली असेल त्यांना जर ती पूर्णपणें कृतीमध्यें दाखविण्याची संधि दिली नाहीं तर ती कमी कमी होण्याचा संभव असतो. त्यांचें ज्ञान व जबाबदारीची जाणीव हीं नुसतीं फुकट जातील इतकेंच नव्हे, तर उपयोगाच्या अभावीं तीं कमी कमीहि होत जातील. राजकीय बाबतींतील जे निर्णय करण्यांत त्यांचें स्वतःचें अंग असेल त्यांच्यामुळें परिणामीं दुष्टोत्पत्तीस येणाऱ्या

गोष्टी त्यांना कळून येणार नाहींत. एकंदरींत राज्यव्यवस्थेला त्यांच्यामुळें बळकटी येण्याच्या ऐवजीं कमकुवतपणाच येईल. कामचलाऊ ज्ञान व कर्तव्याची जाणीव हीं ज्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाल्याचें स्पष्टपणें दिसून येत असेल त्या नागरिकांच्या कोणत्याहि वर्गाला राजकीय जबाबदारीपासून वगळण्यांत आलें तर शेवटीं राज्यव्यवस्थेलाच हानि पोंचते, म्हणून लोकमतनियंत्रित राज्यव्यवस्थेची अधिकाधिक वाढ करण्यास केव्हांहि अवकाश असतो, आणि तसें करणें नेहमीं जरूरीचें असतें. सार्वजनिक कारभाराच्या बाबतींत अधिकाधिक जबाबदारी अंगावर टाकण्यांत आली म्हणजे स्वातंत्र्यास पात्र झालेल्या लोकांची संख्या अधिकाधिक वाढत जाते. हातून चुका घडल्या तरी त्यांची दुरुस्ती करण्याची सत्ता अंशतः त्यांच्या हातीं असते. ”

## लढाऊ जाती बिथरतील.

आतां शेवटीं एका आक्षेपाचा विचार करून हें प्रकरण संपवूं. तो आक्षेप हा कीं, हिंदी लोकांना वसाहतींप्रमाणें स्वराज्याचे पूर्ण हक्क मिळतील तेव्हां देशांतील सत्ता दुर्बल लोकांच्या हातीं गेली आहे असें समजून या देशांतील लढाऊ जाती बंडाचा झेंडा उभारतील आणि नवीन सत्ताधिकाऱ्यांना आरंभींच जेरीला आणतील. परंतु या बाबतींत आह्मीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मुसलमान, शीख किंवा मराठे यांना देशाभिमानाची दीक्षा यापूर्वींच मिळालेली असल्याकारणानें त्यांच्या बाबतींत ती गोष्ट खरी नाहीं. दुसरें असें कीं, लष्करी नोकरीच्या द्वारें शरीरप्रकृतिदृष्ट्या योग्य असलेल्या सर्व लोकांना मोकळीक ठेवण्यांत आली व जात किंवा शरीरवर्ण यांचा भेद न ठेवतां लायक असलेल्या सर्व लोकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें बढती मिळण्याची व्यवस्था झाली तर लढाऊ जाती व बिनलढाऊ जाती हा जो भेद आज दिसत आहे त्याचा एका पिढीच्या आंत लोप होईल. याशिवाय वरील आक्षेपाला मुख्य उत्तर असें आहे कीं, ब्रिटिश साम्राज्यापासून हिंदुस्थान वेगळें करून ब्रिटिश लोकांचा या देशावरील

ताबा अजीबात नाहींसा करावयाचा व त्यांच्या संरक्षणाची अगदींच अपेक्षा ठेवावयाची नाहीं, अशा प्रकारची जर आमची योजना असती तर मात्र तिला हा आक्षेप लागू पडला असता. आमची प्रस्तुत योजना तशा स्वरूपाची नाहीं. आमच्या सूचनांचा परिणाम किंवा त्यांच्या मुळाशीं असलेला आमचा हेतु यांचा विपर्यास करून निष्कारण भीति उत्पन्न करण्याचा प्रयत्न आमच्या टीकाकारांकडून खुशाल केला जातो. परंतु एका मोठ्या गृहस्थानें एकदां म्हटल्याप्रमाणें "सर्व काळ कांहीं लोकांना फसवितां येईल व कांहीं काळ सर्व लोकांना फसवितां येईल, पण सर्व काळ सर्व लोकांना फसवितां येणें शक्य नाहीं." हिंदुस्थानामध्यें ब्रिटिश लोकांचें वर्चस्व कायम ठेवणें व ब्रिटिश साम्राज्याची सार्वभौम सत्ता हिंदी लोकांना संतोषपूर्वक मान्य करविणें हा प्रस्तुत योजनेचा मुख्य उद्देश आहे. कारण ब्रिटिश अमलापासून हिंदी लोकांचें अपरिमित हित झालें आहे, लुप्त झालेल्या किंबहुना केव्हांच अस्तित्वांत नसलेल्या एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा त्यामुळें उदय झाला आहे आणि आधुनिक संस्कृतीचें अत्यंत महत्त्वाचें फळ जें लोकस्वातंत्र्य (democratic freedom) त्याची त्यामुळेंच हिंदी लोकांना अंशतः प्राप्ति झाली आहे. मि० कर्टिस यांच्या पुस्तकांतील पुढील उताऱ्यामध्यें दर्शविण्यांत आलेल्या ब्रिटिश साम्राज्याविषयींची निष्ठेची भावनाच, त्या उताऱ्यांत आलेला सजातीयत्वाचा संबंध सोडून दिल्यास, हिंदुस्थानांतील राजकीय पुढाऱ्यांच्या अंतःकरणांत स्फुरत आहे यांत शंका नाहीं. मि० कर्टिस म्हणतातः "सजातीत्वाच्या भावनेमुळें जरी त्यांच्या निष्ठेला विशेष पवित्र स्वरूप आलें आहे तरी त्या निष्ठेचें मूळ, लोकांना स्वायत्ततापूर्वक राज्य चालविण्याच्या कर्तव्याची ओळख पटवून देणारी ब्रिटिश राज्यपद्धति ही जगांतील सर्वांत मोठी संस्था आहे, या विश्वासामध्येंच आहे. स्वराज्यवाद हें ब्रिटिश राज्यपद्धतीचें ब्रीद आहे आणि तिचा नाश झाला तर त्या कार्याचाहि ऱ्हास होईल हें ते जाणून असल्यामुळेंच ब्रिटिश राज्यपद्धति अभंग ठेवण्यासाठीं आपलें वित्तजीवित अर्पण करण्यासहि ते तयार असतात."

व्हाइसरॉय व प्रांताधिपति यांची नेमणूक खुद्द बादशाहांकडून व्हावयाची असें प्रस्तुत योजनेंत आहे. या योजनेच्या अनुसार कार्यकारी कौन्सिलचे निम्मे सभासद युरोपियन असतील आणि आणखी पुष्कळ वर्षेंपर्यंत इंडियन सिव्हिल-सर्व्हिसमध्यें ब्रिटिश लोकांचाच अधिक भरणा असेल. हीच गोष्ट पोलिसखात्यासंबंधानें. त्याचप्रमाणें बहुतेक व्यापारी हितसंबंधहि युरोपियन लोकांच्या हातीं असतील. आमच्या टीकाकारांना ज्या सुरक्षिततेबद्दल हमी पाहिजे असें वाटतें त्या सुरक्षिततेची हमी म्हणून, लष्करी खात्यावर व्हाइसरॉयचाच ताबा असावा, असें योजनेमध्यें बुद्ध्याच ठरविण्यांत आलेलें आहे. अशा प्रकारची स्थिति असतांना, आतां आपल्याला कोणी शास्ता उरला नाहीं, तेव्हां दुर्बल जनतेवर बेबंदशाही माजविण्यास आपल्याला कोणतीच हरकत नाहीं, अशी कल्पना लढाऊ जातींच्या मनांत कशी येऊं शकेल हें समजणें कठीण आहे. आपल्या हातांत अधिकारसूत्रें आलीं तर शिराळशेटीच्या बाबतींत झाल्याप्रमाणें तो औट घटकांचाच कारभार होईल, हें ठाऊक असतां अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेण्यास धांवण्याइतके सुशिक्षित हिंदी लोक खास वेडेपीर नाहींत.

# इंग्रज लोक सत्तात्याग करतील काय ?

## त्यांचें हिंदुस्थानांतील कार्य.

वरील युक्तिवाद तत्त्वतः न्याय्य आहे हें पुष्कळ लोक कबूल करितात, परंतु म्हणतात कीं, या बाबतींत मनुष्यस्वभाव योग्य रीतीनें लक्षांत घेऊन विचार केलेला दिसत नाहीं; जगांतील दुर्बल जातींवर राज्य चालविणें किंवा, बोलून दाखविण्यांत येतें त्याप्रमाणें, तसें करून त्यांची उन्नति करणें हें आपलें जीवितकार्य आहे, अशी ॲंग्लो-सॅक्सन लोकांची समजूत झालेली असतां, त्यांच्या हातीं जी सत्ता आली आहे, ती ते सोडून देतील काय ? इंग्लंड हें खरोखरच स्वातंत्र्याचें माहेरघर आहे; परंतु मिल्नें म्हटल्याप्रमाणें सर्व माणसांना स्वातंत्र्यापेक्षां सत्तेचीच अधिक आवड असते. जेथें सत्ता आपली व स्वातंत्र्य दुसऱ्याचें अशी स्थिति असते तेथें तर ही गोष्ट विशेषच खरी असते. बहुतेक व्यक्तींच्या बाबतींत हें खरें आहे, परंतु उत्कट नैतिक प्रेरणांचे असे कांहीं प्रसंग असतात कीं, कित्येक थोर मनाच्या स्त्रीपुरुषांच्या बाबतींत निराळाच अनुभव येतो. सत्ताप्रिय अशा राष्ट्रांचा इतिहास पाहिला तरीहि त्यांमध्यें, राष्ट्रांविषयीं समष्टिदृष्ट्या वरील विधान करतां येणार नाहीं असे कांहीं काळ येऊन गेल्याचें दिसून येतें. याचा अर्थ असा कीं, केव्हां केव्हां व्यक्तींपेक्षां मनाचा मोठेपणा राष्ट्रामध्यें विशेष आढळून येतो. राष्ट्रांतील साधारण नागरिकांची जी मनःप्रवृत्ति असते तिच्यापेक्षां राष्ट्राचें समवायात्मक शील उदात्ततर असल्याचा प्रत्यय येतो. इंग्लंडच्या इतिहासाचें व्यापक दृष्टीनें पर्यालोचन केलें असतां शेवटीं मनावर असाच ठसा उमटून राहतो कीं, त्याच्या हातून मोठमोठे प्रमाद घडलेले असले तरी सर्वांना स्वातंत्र्यपोषक संस्थांचा लाभ व्हावा, याविषयींची आवड हेंच त्या राष्ट्राच्या संस्कृतीचें रहस्य आहे. मुत्सद्दीगिरीचे डावपेंच व परंपरागत

धोरण यांच्या निर्बंधांनीं इंग्लंडांतील राज्यव्यवस्था जखडून गेलेली असल्याकारणानें, तिनें नेहमींच स्वातंत्र्याचा पक्ष घेतलेला आहे असें नाहीं. परंतु स्वातंत्र्याकरितां धडपड करणाऱ्या लोकांविषयीं उदारमनस्क इंग्लंडला सदैव सहानुभूति वाटली आहे; मग ते लोक बंडास प्रवृत्त झालेले अमेरिकन असोत, फ्रान्स देशामधील राज्यक्रांतिवादी लोक असोत, इटलींतील असोत, ग्रीसमधील असोत किंवा बेल्जियममधील असोत. परवांपर्यंत मानवी संस्कृतीला घोर कलंकरूप असलेली व प्राचीन साम्राज्याच्या नैतिक ऱ्हासाला कारण झालेली अशी जी गुलामगिरी ती पहिल्यानें इंग्लंडनेंच नाहींशी केली. इंग्लंडच्या या उज्ज्वल उदाहरणाचें जगांतील बाकीच्या सुधारलेल्या राष्ट्रांनीं अनुकरण केलें. गुलामगिरीचींच थोड्याशा वेगळ्या प्रकारचीं स्वरूपें जीं दास्य ( serfdom ) व कराराची मजुरी तींहि ब्रिटिशसाम्राज्यांतून नामशेष झालीं आहेत; आणि हिंदुस्थानांतील मुदतबंदी मजुरीच्या पद्धतीचीहि आयुर्मर्यादा संपण्याची वेळ आली आहे. आतां एवढें खरें कीं, ब्रिटिशांनीं आपल्या अमलाखालीं अन्य लोकांना ठेविलें आहे; परंतु त्याचें उघडपणें व दांडगटपणें समर्थन करावयाला इंग्रज लोकांची मनोदेवता तयार नाहीं. ज्या जाती सध्यां स्वातंत्र्याला अपात्र आहेत त्यांच्या अंगीं ती पात्रता आणण्यासाठींच त्यांच्यावर अंमल चालविला जात आहे असें सांगण्यांत येतें. मात्र दुर्दैवाची गोष्ट ही कीं, इंग्लंडचे प्रतिनिधी असें स्वतःस म्हणविणारे कांहीं लोक 'स्वातंत्र्य, स्वातंत्र्य तें काय ? ती एक नुसती पोपटपंची आहे,' असें म्हणावयास कमी करीत नाहींत आणि पौर्वात्य देशांतील इंग्लंडच्या कांहीं राजप्रतिनिधींनीं इंग्लंडचा इतर जातींची उन्नति करण्याचा हेतु उघडपणें नाकबूल केला असून साम्राज्यवादाच्या नांवाखालीं आगाळिकीचीं स्वैर कृत्यें केलीं आहेत. परंतु अशा रीतीनें वागणाऱ्या मुत्सद्यांच्या धोरणाचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला आहे आणि त्यांनीं केलेल्या अपकारकृत्यांचें थोड्याबहुत कालांतरानें उपकारकृत्यांमध्येंच रूपांतर झालेलें आहे. इंग्लंडच्या आधाराची जरूरी नाहीं अशी स्थिति हिंदुस्थानाला भविष्यकाळीं केव्हां

तरी प्राप्त होईल, ही कल्पना अनेक उदारमनस्क ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मनांत आली असून त्या बाबतींत माल्कम व एल्फिन्स्टन यांच्या नांवाचा प्रमुखत्वानें उल्लेख करावयाला हरकत नाहीं. उदात्त व भूतदयानुसारी राजनीतीची घोषणा जेव्हां करण्यांत येते तेव्हां तिच्यामध्यें प्रसंगवशात् थोड्याबहुत प्रमाणानें अर्थवादाची भेसळ झालेली असते; तथापि राजकीय विचारामध्यें त्या राजनीतीचें बीं रुजल्याखेरीज राहात नाहीं, व त्यामुळें राजकीय कृतीच्या उगमस्थानांचें शुद्धीकरणहि होतें. उत्क्रांति सरळ रेषेमध्यें होत नाहीं तर तिची गति नागमोडी, मागेंपुढें अशी असते, परंतु एकंदरींत तिची गति पुढेंच असते, मागें असत नाहीं. तद्वत्च हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. थोड्या वर्षांपूर्वी, आम्ही प्रतिगामी धोरणाच्या लाटेबरोबर साफ वाहून जातों कीं काय, अशी भीति वाटत होती. पूर्वींच्या राज्यकर्त्यांचें लोकहितकारी उदार धोरण त्या वेळचे अधिकारी जाणूनबुजून टाकून देत असल्याचा भास होत होता. या धोरणाचें विवेचन करणारे व खुद्द अधिकारिवर्गाच्या प्रशंसेस पात्र झालेले मॉ. जोसेफ शेली हे लिहितात:“एका काळीं, माल–कम व माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या कारकीर्दींत ( सन १८३० च्या सुमारास ) आणि शिपायांच्या बंडानंतरहि, हिंदुस्थानांतील लोकांना सुशिक्षित करणें, त्यांचें राष्ट्र बनविणें व स्वराज्याच्या जबाबदारीसाठीं त्यांची तयारी करून देणें हें आपलें हिंदुस्थानांतील कार्य आहे, अशी ब्रिटिश लोकांच्या मनाची भावना होती. तें कार्य एक दोन शतकांच्या अवधींत पूर्ण झालें, म्हणजे आपल्या कर्तृत्वाच्या या वैभवशाली बालकाला स्वतःच्या पायावर उभें राहूं देऊन आपण दूर व्हावयाचें अशी तत्कालीन ब्रिटिश मुत्सद्यांची समजूत होती. सांप्रत बहुतेक इंग्रज लोकाच्या मनांतून ही कल्पना निघून गेली आहे. नाहीं म्हणावयाला १९०४ सालच्या हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानीं विराजमान झालेले सर हेनरी कॉटनप्रभृति थोड्या लोकांच्या मनांत ती कल्पना अद्यापि वसत आहे. हिंदुस्थान सोडून जाण्याच्या कल्पनेला याउप्पर हिंदुस्थानांतल्या किंवा ग्रेटब्रिटनमधल्या इंग्रज

लोकांच्या मनांत थारा मिळावयाचा नाहीं; इंग्लंडशीं ज्या रज्जूंनीं हिंदुस्थान बद्ध झालेलें आहे ते रज्जू इतके बळकट आहेत कीं, तशी कल्पना मनांत येणें शक्यच नाहीं. हिंदुस्थान म्हणजे ब्रिटिश साम्राज्याचा एक मुख्य आधारस्तंभ असून साम्राज्याचें वैभव त्याच्यावर अवलंबून आहे; अर्थात् इंग्लंड आपल्या हातून हिंदुस्थानला जाऊं देणार नाहीं." "हिंदी लोकांकरितांच हिंदुस्थान" (India for the Indians) हेंच जर इंग्लंडचें ब्रीदवाक्य असतें, एल्फिन्स्टन व माल्-कम यांच्या कल्पनांना अनुसरून आपला अमल तात्पुरता आहे असें मानून तें चाललें असतें तर, विसंगततेच्या दोषास पात्र झाल्याखेरीज तें राष्ट्रीय पक्षाला क्रमशः व वाढत्या प्रमाणावर हक्क-सवलती देऊं शकलें असतें आणि त्यामुळें हिंदी लोकांना कालेंकरून स्वायत्तता प्राप्त झाली असती. परंतु तो आतां इंग्लंडचा उद्देश नाहीं. इंग्लंडचा अमल आजमित्तीस हिंदुस्थानावर चालू आहे व तो तसाच चालू ठेवण्याची त्याची इच्छा आहे. थोडेसे हिंदु लोक त्याच्या विरुद्ध आहेत; परंतु मुसलमान, बौद्ध व पारसी या अल्पसंख्याक जाती, त्याचप्रमाणें हिंदूंचा बहुजनसमाज त्याच्या पक्षाचा आहे. राष्ट्रीय पक्षाला अधिकाधिक मानपदव्या व अधिकाराच्या जागा देण्यास इंग्लंड तयार आहे, परंतु तत्त्वाच्या बाबतींत मात्र त्याजकडून तडजोड होणार नाहीं. राज्यनौकेचें आधिपत्य व कर्णधारत्व हीं तें स्वतःकडेच ठेवील आणि त्याची राज्यव्यवस्था त्या त्या काळच्या परिस्थितीमध्यें शक्य तितक्या प्रमाणानें एकतंत्रीपणाचीच असेल. १८३५ मध्यें लॉर्ड मेकॉले यांनीं उद्गार काढले होते: 'हिंदुस्थानाला स्वातंत्र्ययुक्त राज्यव्यवस्था मिळूं शकणार नाहीं तर त्याच्या खालोखाल असणारा जो उत्कृष्ट लाभ—म्हणजे लोकमतानियंत्रणाविरहित सुदृढ व निःपक्षपाती राज्यपद्धतीचा—तो मात्र मिळूं शकेल.' ह्यानंतर सत्तर वर्षांनीं हिंदुस्थान सरकारचे माजी फडनवीस सर एडवर्ड बेकर यांनींही तात्पर्यार्थानें तीच गोष्ट प्रतिपादिली. ते म्हणाले कीं, "हिंदुस्थान हा ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग आहे व तो तसाच राहिला पाहिजे आणि शेवटीं कांहीं झालें तरी त्याच्यावर ब्रिटिश सरकारचाच

ताबी असला पाहिजे. अंतःस्थ राज्यव्यवस्थेच्या बाबतींत स्वायत्तता कबूल करतां येण्यासारखी नाहीं आणि लष्करी बाबी व परराष्ट्रांसंबंधाचें धोरण यांच्या बाबतींत तर स्वायत्ततेची कल्पना त्याहीपेक्षां अग्राह्य आहे. या दृढनिश्चयापुढें आमूलाग्र सुधारणेच्या योजनांचा साफ चुराडा होऊन जाईल. केवळ जबरदस्तीनेंच हा निश्चय ढांसळू शकेल." परंतु ईश्वराच्या दरबारीं ऱ्हा अन्यायच ठरेल; कारण प्रेम व परोपकार हाच ईश्वरप्रणीत धर्म आहे. असली अधर्म्य राजनीति चिरकाल टिकणें शक्य नाहीं. माल्कम व एल्फिन्स्टन यांच्या तत्त्वाचा जय केव्हांना केव्हां तरी झालाच पाहिजे. हिंदुस्थानासंबंधाच्या धोरणाच्या बाबतींत इंग्लंडांतील विशेष सात्त्विक लोकमत पुनः प्रबळ होऊं पहात आहे व तें पुढील उताऱ्यामध्यें सर थिऑडोर मॉरिसन यांनीं व्यक्त केलें आहेः "हिंदुस्थानला स्वायत्ततापूर्वक स्वतःचा कारभार पाहण्याचें सामर्थ्य येऊन ब्रिटिश साम्राज्याच्या महान् संघटनांमध्यें स्वायत्ततायुक्त घटक या नात्यानें आपलें स्थान संपादण्याचें त्याला सामर्थ्य यावें अशा रीतीनें तेथें राज्य चालविणें हें आमचें कर्तव्य आहे, ही दृढ समजूत प्रत्येक इंग्रजाच्या मनांत वसत असल्याचें बहुधा आढळून येईल. आशियाटिक लोकांवरील आमच्या सत्तेचें समर्थन शेवटीं याच धोरणानें होऊं शकेल; आणि हिंदुस्थानाला इंग्लंडच्या घरची दुभती गाय या नात्यानें, सदैव परवश स्थितींतच ठेवलें पाहिजे या दुसऱ्या धोरणाचें प्रतिपादन करण्याचें धाष्ट्यं दाखविणाऱ्या मुत्सद्यांची सार्वजनिक आयुःक्रमांतून धिक्कारपूर्वक हाकालपट्टी करण्यांत येईल."

## सजातीयत्व आवश्यक नाहीं.

आशा अमर आहे असें म्हणतात, परंतु दुर्दैवानें संशयहि तसाच अमर आहे. निराशावादी मनुष्य आपल्या दृष्टीनें इतिहासाकडे पहात असतो. ब्रिटिशांनीं इतरांना स्वातंत्र्य दिलें असलें तरी हाडामांसानें आपल्याशीं एक असणाऱ्या लोकांनाच त्यांनीं तें दिलें आहे, अशी त्याच्या मनाला

शंका वाटते. कानडामधील फ्रेंच लोक व दक्षिण आफ्रिकेंतील बोअर लोक यांच्या संबंधाच्या उदाहरणांवरून त्याच्या मनाची खात्री होत नाहीं. दोन्ही वसाहतींमध्यें ब्रिटिश लोकहि होते आणि त्यांना लोकमतनियंत्रित राज्यव्यवस्थेचे हक्क देणें भाग होतें; शिवाय, सत्तेचा अधिक भाग त्यांच्याकडेच राहील अशा विषयींहि काळजी घेण्यांत आली होती. परकी लोकांनीं जित लोकांना स्वराज्याचे हक्क दिल्याच्या बाबतींत फिलिपाइन्सचें उदाहरण ठळक आहे, परंतु दुर्दैवानें फिलिपाइन्सचें उदाहरण ब्रिटिश साम्राज्याच्या बाबतींत लागू नाहीं. आयर्लंडचें भवितव्य अद्यापि अधांतरीं लटकत आहे. त्या ठिकाणींसुद्धां अल्स्टरमध्यें प्रॉटेस्टट लोक असून ते बहुतेक ब्रिटिशच आहेत. त्यांना आयरिश लोकांच्या होमरूलमधून वगळलं पाहिजे किंवा त्यांच्या हितसंबंधांना धक्का लागणार नाहीं अशासाठीं खास तजवीज करून त्यांचें समाधान केलें पाहिजे. अर्थात्, इतिहासामध्यें बरोबर रीतीनें आमच्या उपयोगीं पडणारें उदाहरण नाहीं. तथापि, आम्हांस इंग्लंडनें अभिवचन दिलेलें असून निराशावादी लोक कांहींहि म्हणत असले तरी आम्ही प्रगतीच्या मार्गांत आहों यांत शंका नाहीं. या जगद्व्यापी साम्राज्यामध्यें फक्त शांततेच्या व कायदेशीर उपायांनीं स्वराज्य मिळविणारे पहिलेच ब्रिटिशेतर लोक हा मान मिळण्याचें भाग्य आमच्या वांटयास कां येऊं नये ? एका प्रसंगीं पर. नामदार गोखले यांनीं म्हटल्याप्रमाणें, जगाच्या इतिहासाची अद्यापि ' इतिश्री ' झालेली नाहीं. या इतिहासामध्यें आणखी पुष्कळ नवीन प्रकरणें अजून सामील व्हावयाचीं आहेत. इंग्लंड व हिंदुस्थान यांच्याकडून एका उज्ज्वल प्रकरणाची भर त्यामध्यें पडणें ईश्वरी कृपेनें शक्य आहे. ब्रिटिशांना येथून घालवून देणें आणि ब्रिटिश साम्राज्यापासून हा देश पूर्णपणें विभक्त करणें हाच हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीचा उद्देश आहे, असें भासविणें ज्यांच्या अंगवळणीं पडलेलें आहे अशा वर्गांतील अँग्लो-इंडियनांकरितांच मॉ. शेली यांनीं आपले पुस्तक लिहिलें आहे. ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून घालवून द्याव-

याचें ही कल्पना जबाबदार हिंदी पुढाऱ्यांच्या अंतःकरणांस केव्हांहि शिवलेली नाहीं. प्रतिगामी विचारांच्या थोड्याशा लोकांच्या मनांत व तीहि अल्पकाळ ती कल्पना आली असेल. अर्थात् मॉ. शेली व त्यांच्याच मताचे दुसरे लोक यांची बिनअंदाजी गोलंदाजी आमच्यावर लागू पडत नाहीं. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, स्वतःच्या देशांत जे आम्ही परके झालों आहों आणि ब्रिटिश लोकांनीं जे स्वतःकडेच बहुतेक सर्व अधिकार घेऊन ठेवले आहेत तसें असूं नये; आणि जात, कुलोत्पत्ति, शरीरवर्ण किंवा धर्म या सबबीवर आम्हांला ब्रिटिश साम्राज्यांत कोठेंहि बादशाहाच्या दुसऱ्या कोणत्याहि प्रजाजनांपेक्षां कमी लेखण्यांत येऊं नये; तसेंच वसाहतींच्या बाबतींत असल्याप्रमाणें व आतांपर्यंत आम्हांला देण्यांत आलेल्या अभिवचनांना अनुसरून, आमच्या मातृभूमी-च्या अंतर्गत राज्यव्यवस्थेचें नियंत्रण करण्याचा अधिकार यापुढें आम्हांस चालवूं द्यावा, इतःपर मानहानिकारक निर्बंध व्यक्तींच्या बाबतींत असूं नयेत, इतःपर आमच्या समाजाला आर्थिक परवशतेमध्यें राहणें भाग पडूं नये आणि साम्राज्याच्या हितसंबंधाच्या व साम्राज्यसत्तेच्या खास अधिकारांच्या दृष्टीनें जरूर असेल त्यापेक्षां राजकीय पराधीनता यापुढें आम्हांला असतां कामा नये. कायद्याच्या दृष्टीनें सगळे समान आहेत हें जें आधुनिक संस्कृ-तीचें मूलतत्त्व त्याची अंमलबजावणी व्हावी अशी मागणी केली असतांहि आमच्या डोक्यावर शिव्याशापांची वृष्टि कां व्हावी ? अर्काटच्या वेढ्या-च्या वेळीं तेथील सैनिकांना जेव्हां अन्नाचा तुटवडा पडला तेव्हां क्लाइव्हचे शिपाई आपल्या बरोबरच्या युरोपियन सोल्जरांना 'तुम्ही भात खा, आम्ही पेज पिऊनच राहूं' असें म्हणाले, असा दाखला आहे. त्या भल्या हिंदी शिपायांना 'भात तुम्हांला, पेज आमच्या वांट्यास' असा न्याय सतत चालावा असें त्या वेळीं खात्रीनें वाटलें नसेल. हा प्रश्न जो एकदां उप-स्थित झाला आहे, त्याचा निकाल लागलाच पाहिजे. नाहींपेक्षां पुनः पुनः उद्भवल्याखेरीज राहावयाचा नाहीं. असले प्रश्न निकालास लागले नाहींत तर राष्ट्रांना स्वस्थता मिळत नाहीं, असें बर्कनें सांगून ठेवलेंच आहे.

तंत्र्य ही कोणाच्या अनन्याधिकाराची वस्तु नव्हे. आयर्लंडविषयीं बोलतांना ब्राइट यांनीं आपल्या विचारांच्या तर्कशुद्धतेला अनुसरून स्वातंत्र्यप्रसाराचें प्रतिपादन केलें. ते म्हणाले: “ ग्रेटब्रिटनशीं झालेला राजकीय संयोग (Union) रद्द व्हावा, अशी मागणी करण्याची अथवा शक्य असेल तर तो रद्द करून घेण्याची मोकळीक आयरिश लोकांना नाहीं, असें मीं केव्हांहि प्रतिपादिलेलें नाहीं. आम्ही ठरवूं त्याच अटींवर आयर्लंड व ग्रेटब्रिटन यांचें एकीकरण झालें पाहिजे, असा आग्रह धरून बसण्याचा आम्हांला मुळींच अधिकार नाहीं असेंच मीं म्हणतों. संयुक्त राज्याच्या पार्लमेंटनें जो कायदा पास केला आहे तो त्या पार्लमेंटला रद्द करतां येईल, असें कबूल करणाऱ्या लोकांपैकीं मी एक आहें व ती गोष्ट कोणाहि समंजस माणसाला कबूल झाली पाहिजे. इतकेंच नव्हे तर, प्रत्येक परकीय राष्ट्राला, त्याला तसें करणें आपल्या हिताचें वाटत असेल तर, स्वातंत्र्य मागण्याचा व स्वातंत्र्याकरितां प्रयत्न करण्याचा हक्क आहे, ही गोष्ट इंग्लंडांतील प्रत्येक माणसाला मान्य आहे, हेंहि कबूल करावयाला मी तयार आहें. ” त्याचप्रमाणें, कानडासंबंधानें लिहितांना लॉर्ड डर्हाम हे दुसऱ्या देशांतील लोकांच्या तर्फेही, स्वतःला न कळत कां होईना, स्वातंत्र्यवाद प्रतिपादीत होते. लॉर्ड डर्हाम यांनीं प्रतिपादिलेल्या तत्त्वाचा निष्कर्ष सर चार्लस ल्यूकास यांनीं पुढीलप्रमाणें काढला आहे: “ विनाशक कार्य न करितां विधायक कार्य करणें; अस्तित्वांत असलेल्या रचनेचा विध्वंस न करितां नवीन रचना करणें; लहान लहान व विस्कळीत अशा घटकांचें एकीकरण करणें; फूट पाडून राज्य चालविण्याचें धोरण हें सबलत्वाचें नव्हे तर दुर्बलत्वाचें लक्षण असल्याकारणानें त्या धोरणाचा पूर्णपणें व सदैव त्याग करणें; निर्भय व सामर्थ्यसंपन्न असणें; आणि जगांतील सर्व लोकांना प्रगतीचा मार्ग स्वीकारावयास प्रोत्साहन देणें, हेंच व्यक्तींच्या किंवा राष्ट्राच्या जीविताचें सार्थक्य आहे, या तत्त्वाचा त्यांनीं ( लॉर्ड डर्हाम यांनीं ) सर्व काळच्या व सर्व प्रकारच्या लोकांना उपदेश केलेला आहे.

लॉर्ड डर्हाम यांचा रिपोर्ट विधायक धोरणानें व्यापलेला असून त्यामध्यें त्यांनीं आंग्ल जनतेच्या स्वभावाचें रहस्य–ब्रिटिश साम्राज्यामध्यें राजकीय प्रश्नांचा निर्णय करण्याच्या व सत्ताधिकार चालविण्याच्याहि बाबतींत सारखेंच लागू असणारें तत्त्व–जितक्या विशदपणें प्रतिपादिलें आहे तितकें दुसऱ्या कोणींहि प्रतिपादिलेलें नाहीं. ” स्वातंत्र्यपोषक संस्थांच्या स्थापनेमुळें सर्व लोकांना सारखेंच सुख होईल, ही कल्पना सर्वांगसुंदर मानवसमाजाविषयींच्या कल्पनेचा ध्यास घेतलेल्या युरोपियन तत्त्ववेत्यांच्या मनांत आलेली आहे, अशी लॉर्ड ब्राइस यांची साक्ष आहे. ते म्हणतातः “ १८३० पासून १८७० पर्यंत युरोपांतील तत्त्ववेत्त्या व लेखकवर्गांतील अतिशय बुद्धिवैभवसंपन्न व थोर मनाच्या लोकांची मनःप्रवृत्ति आशापूर्ण होती. लोकस्वातंत्र्याला पोषक अशा संस्थांच्या स्थापनेमुळें मानवी प्रगतीला व मानवजातीच्या सुखाला अतिशय साहाय्य होईल, अशी त्यांची अपेक्षा होती. ही अपेक्षा निष्फळ झालेली नाहीं. जेथें तशा संस्था अस्तित्वांत आहेत त्या सर्व देशांतील बहुजनसमाजाच्या स्थितीमध्यें ठळकपणें दिसून येण्यासारखी सुधारणा झालेली आहे. ही सुधारणा भौतिकशास्त्राची प्रगति व त्यामुळें झालेली सोयीसुखांची वाढ यांच्यामुळेंच झाली आहे असें नाहीं, तर न्याय व भूतदया यांना विशेषेंकरून अनुसरणारे कायदे अस्तित्वांत आल्यानेंहि ती सुधारणा होण्यास पुष्कळ साहाय्य झालें आहे. साधारण माणसाच्या हिताच्या दृष्टीनें पाहिलें तर आजचें जग पूर्वींच्या जगापेक्षां चांगलें आहे, ही गोष्ट कोणी नाकबूल करणार नाहीं. तसेंच याचें बहुतांशीं कारण विशेष चांगल्या प्रकारच्या राजकीय संस्था अस्तित्वांत आल्या हें होय, हेंहि कोणाला सहसा नाकबूल करितां यावयाचें नाहीं. याचें प्रत्यंतर, पार्लमेंटच्या धर्तीवर राज्यव्यवस्था चालविण्याकरितां जपान व रशिया या देशांमध्यें झालेल्या आणि इराण व तुर्कस्थान यांनीं सुरू केलेल्या प्रयत्नांमध्यें मिळतें. चीनमध्यें सुद्धां अशा प्रयत्नांचा उपक्रम होण्याचीं लक्षणें दिसत आहेत.”

# समारोप.

## आमचें कर्तव्य.

हिंदुस्थानच्या स्थितींत युद्धसमाप्तीनंतर कोणती सुधारणा होईल ? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनांत येणें स्वाभाविक आहे. भविष्यत्कालाच्या आड असणारी जवनिका दूर करावी असें ज्याला त्याला वाटतें. कमीजास्त प्रमाणानें अतर्क्य असणाऱ्या अनेक गोष्टींवर अखेरचा निकाल अवलंबून राहील; तथापि हिंदी लोकांचे आस्थेवाईक व निर्धाराचे प्रयत्न ही एक त्यांतील महत्त्वाची गोष्ट आहे. राजकीय चळवळ चालविण्याची कला अद्यापि आम्हांस चांगल्या रीतीनें साधलेली नाहीं, ही गोष्ट रुचण्यासारखी नसली तरी ती खरी आहे हें कबूल केलें पाहिजे. ग्रेटब्रिटनमधील राज्ययंत्र लोकमताच्या तंत्रानें चालत असतें, त्याअर्थी ज्यांना कांहीं राजकीय सुधारणा घडवून आणावयाच्या असतील त्यांनीं तेथील लोकमताचा पाठिंबा प्रथम मिळविणें अवश्य आहे. लोकमत अनुकूल करून घेण्याकरितां वर्तमानपत्रांमध्यें लेख प्रसिद्ध करून, व्याख्यानें देऊन, डेप्युटेशनें पाठवून अथवा कमीजास्त प्रमाणानें गलबला करण्याच्या दुसऱ्या साधनांचा अंगीकार करून सतत मोहीम चालवावी लागते. कित्येक चळवळींसाठीं खास वर्तमानपत्रें, मासिकें वगैरे असतात आणि पुष्कळ पगारी लोक कामें करावयाला नेमलेले असतात. मंत्रिमंडळाकडून काम करून घ्यावयाचें असल्यास पार्लमेंटमधील सभासदांची, विशेषेंकरून उभयपक्षाच्या पुढारी मंडळीची, सहानुभूति मिळविली पाहिजे. वसाहतींनीं स्वराज्य किंवा तसलेच दुसरे महत्त्वाचे हक्क मिळविण्याचा प्रयत्न करतांना अशींच साधनें उपयोगांत आणलीं होतीं. त्यांनीं ग्रेटब्रिटनमध्यें आपलीं डेप्युटेशनें पाठविलीं होतीं व त्यांतले कांहीं सभासद पुष्कळ काळपर्यंत

लंडनमध्यें राहत असत. कायद्यांच्या बिलांचे मसुदे होत असतां ... लोकांच्या खाजगी मुलाखती वेळोवेळीं घेणें जरूरीचें असतें. हिंदुस्थ-मध्यें अशा प्रकारच्या कामाचें महत्त्व लोकांना अद्यापि चांगल्या रीतीनें समजलेलें नाहीं. या बाबतींत आह्मांला विशेषच अडचणी आहेत. हिंदु-स्थानांतील प्रतिगामी धोरणाचे अधिकारी, इंडिया ऑफिस, रिटायर झालेले अँग्लो-इंडियन लोक आणि कॉन्सरवेटिव पक्षाचीं अनेक वर्तमानपत्रें या सर्वांशीं आम्हांला झुंजावयाचें आहे. अर्थातच आम्हीं नेटाचे व अविरत प्रयत्न केले पाहिजेत आणि त्या मानानें मोठा स्वार्थत्यागहि केला पाहिजे. नुसत्या इंग्लंडांतच चळवळ चालवून काम भागणार नाहीं. हिंदुस्थानांतहि चळवळ चालविली पाहिजे. अनेक दृष्टींनीं इंग्लंडांतील चळवळीपेक्षां हिंदुस्थानांतील चळवळीचें महत्त्व अधिक आहे. महायुद्ध संपण्याचा रंग दिसतांच देशाच्या सर्व भागांत संचार करून उत्साही कार्यकर्त्या लोकांनीं बहुजनसमाजाला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य म्हणजे काय हें समजा-वून दिलें पाहिजे, लघु पुस्तकें व हस्तपत्रकें ठिकठिकाणीं वांटलीं पाहिजेत, इंग्रजी भाषेंतून व देशी भाषांतून वर्तमानपत्रांच्या द्वारें लेखांचा वर्षाव केला पाहिजे; आणि एक मूळ अर्ज तयार करून त्याच्या प्रतींवर हजारों लाखों लोकांच्या सह्या घेऊन तो अधिकाऱ्यांना सादर करण्यासाठीं तयार करून ठेवला पाहिजे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या वर्गांचे प्रतिनिधी असलेल्या वेगवेगळ्या पुढाऱ्यांना अधिकारिवर्गाशीं संभाषण करण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येईल तेव्हां तेव्हां राष्ट्रीय सभेनें पसंत केलेली राजकीय सुधारणांची योजना आपल्यास सर्वस्वीं मान्य आहे असें स्पष्टपणें जाहीर केलें पाहिजे. ' माझ्या अधिकारांतल्या प्रदेशांत स्वराज्यविषयक चळवळीचें नांव फारसें ऐकूं येत नाहीं ' असें गुप्तपणें किंवा अन्य रीतीनें सरकारला कळविणें, कोनाकोंपऱ्यांतल्या प्रदेशांमधील अधिकाऱ्यांनाहि शक्य होतां कामा नये. अशा रीतीनें अतिशय उत्साह दाखवूनहि जरी आम्हीं चळवळ चालविली तरी आमच्या आकांक्षा पूर्णपणें तृप्त होण्यास बराच कालावधि लागेल असाहि संभव आहे. निराशा व निरुत्साह, उपहास व शिव्याशाप हीं सा-

म्हांला पदोपदीं सोसावीं लागतील. तसेंच पुढाकार घेऊन जोरानें चळ-वळ चालविणाऱ्या कांहीं देशभक्तांच्या वांट्याला तंबी व छळ हींहि येतील. तथापि, कांहीं झालें तरी अंगीकृत कार्यापासून ढळतां कामा नये. आंखून ठेवलेल्या कार्यक्रमांत फेरफार करण्याचे, विशेष जागरूकतेनें वागण्याचे, अधिक मनुष्यबलाचा उपयोग करण्याचे प्रसंग वरचेवर येतील; परंतु निराश म्हणून होतां कामा नये. सत्पक्षाला ईश्वराचें साहाय्य असलेंच पाहिजे. राष्ट्राच्या इच्छाबलापुढें कोणतेंहि विघ्न टिकणार नाहीं. मात्र राष्ट्राच्या ठिकाणीं हें इच्छाबळ आम्हीं उत्पन्न केलें पाहिजे. तसें केल्यावर प्रत्येक जण आपआपल्यापरी कार्यामध्यें साहाय्य करूं शकेल.

## आलेली पर्वणी साधली पाहिजे.

केवळ कायदेशीर–सनदशीर चळवळीच्या द्वारें ब्रिटिश राज्यव्यवस्थे-मध्यें मोटमोठे फेरफार घडवून आणतां येणें शक्य आहे. ही गोष्ट जुनीच आहे, तथापि तिचा पुनरुच्चार करावयाला हरकत नाहीं. योग्य काळीं लोकांना सवलती देऊन व तडजोड करून इंग्लिश मुत्सद्यांनीं दांडगाईच्या उपायांचे व राज्यक्रांतीचे प्रसंग येऊं दिलेले नाहींत, असें इंग्लिश इतिहासकार अभिमानपूर्वक म्हणत असतात. चांगलें कार्य सिद्धीला नेण्यासाठीं वाईट साधनांचा उपयोग करण्याची जरूरी नसते ही गोष्ट आमच्या देशांतील मद–वृद्ध व तरुण–कार्यकर्त्यांनीं ध्यानांत ठेवावी. मधूनमधून लंग्याभुंग्या लोकांकडून आम्हांला त्रास होईल, त्यांचें वर्तन संतापजनक होईल, अल्प अधिकारानें फुगून गेलेला एकादा क्षुद्र मनुष्य प्रसंगविशेषीं मूर्खपणानें वागेल. हिंदी लोकांची कल्पनाशक्ति प्रज्वलित असते असें म्हणतात. तें जर खरें असेल तर त्या कल्पनाशक्तीच्या साह्यानें, हिंदुस्थानांत युरोपियनांच्या मार्गांत कसकशा अडचणी असतात हें लक्षांत घेऊन आपण सहिष्णुता धारण केली पाहिजे. हिंदुस्था-नांत कोट्यावधि लोक असून युरोपियन लोक थोडेसे हजारच आहेत. ...

अर्थी राजकीय अस्वस्थतेच्या काळीं त्यांचीं मनें अकारण संश
होणें व त्यांच्या हातून भीतिविशतेमुळें भलतीं कृत्यें होणें एकान्त स्वाभाविक आहे. परंतु आम्हीं आमची चळवळ आत्मसंयमनपूर्वक भारदस्तपणानें चालविली पाहिजे; तसें केल्यानें परिणामीं तोटा न होतां फायदाच होईल. जर दांडगाईच व्हावयाची असेल तर ती आमच्या हातून न व्हावी, ती दुसऱ्यांनीं हवी तर आमच्याशीं करावी. या झगड्यांत जर कोणास हालकष्ट सोसावे लागतील तर आपणच सोसावेत. जी कांहीं हानि सोसावी लागेल ती आम्हींच सोसावी, आम्हीं दुसऱ्यांची हानि करण्यास उद्युक्त होऊं नये. सांप्रत ब्रिटिश मुत्सद्यांपुढें बिकट प्रश्न येऊन पडले आहेत. जे प्रश्न अतिशय निकडीचे आहेत व ज्यांचा निकाल लावल्यावांचून सुटकाच नाहीं अशा प्रश्नांकडेच त्यांचें सध्यां लक्ष्य जाईल. एरव्हीं, साधारण स्थितीमध्यें सुद्धां, लोकमताचा पुरेसा पाठिंबा नसल्यास किंवा निदान लोकांची मोठीशी ओरड नसल्यास एकदा प्रश्न मागें पडतो व त्याच्या पूर्वी दुसऱ्या प्रश्नांचा विचार होतो. एकादी बाब निकडीची आहे किंवा नाहीं हें ठरवावयाचें असलें म्हणजे लोकांत त्यासंबंधानें कितपत ओरड आहे आणि तो प्रश्न पुढें आणणाऱ्या लोकांच्या ठिकाणीं कितपत तळमळ आहे, हें पाहण्याचा इंग्लंडांतील राजकारणी लोकांचा स्वभावच आहे. या स्वभावाचा कित्येक वेळां अतिरेक होतो आणि लोकांचीं मनें खरोखरच बिथरलीं आहेत अशी खात्री होईपर्यंत वाट पाहण्यांत येते. राज्यकर्त्यांना ज्या मानानें अडविण्यांत येईल व लोकांच्या असंतोषास ज्या मानानें दंग्याधोप्याचें स्वरूप येईल त्या मानानें कोणत्याहि प्रश्नाची निकड समजण्यांत येते. परंतु अधिकाऱ्यांचें व शांततेचें रक्षण करणारांचें लक्ष अशा रीतीनें वेधण्यांत आम्ही हिंदी लोक वाकबगार नाहीं हें कबूल केलें पाहिजे. या बाबतींत आमची स्थिति मोठ्या अडचणीची आहे. थोड्या तरुणांनीं जरी कांहीं अविचार केला तरी तो राजद्रोहात्मक व अराजनिष्ठाप्रचारक चळवळीचा परिणाम आहे असा गवगवा करण्यांत येतो. हल्लीं महायुद्धामुळें ब्रिटिश मुत्स—

यांचा पूर्वींचा चालढकल करण्याचा आणि निर्वाणींची वेळ येईपर्यंत वाट पहाण्याचा स्वभाव बदलला आहे असें दिसतें. तशी जर खरोखरच सुधारणा झाली असेल तर आम्हां शांतताप्रिय, अधिकाऱ्यांवर सगळा भरिभार टाकून राहणाऱ्या व त्यांच्याकडेच सुधारणेच्या उपक्रमाचें काम सोंपविणाऱ्या हिंदी लोकांच्या दृष्टीनें ती गोष्ट अभिनंदनीयच समजली पाहिजे. प्रजाहितदक्ष राजानें वेषांतर करून लोकांमध्यें फिरावयाचें आणि कोणावर कोठें अन्याय होत आहे कीं काय किंवा कोणाला दुःख पोंचत आहे कीं काय याची जातीनें चौकशी करावयाची, लोकांकडून गाऱ्हाणीं येईपर्यंत वाट पहावयाची नाहीं, हीच कल्पना अद्यापि आमच्या मनांत खिळून राहिली आहे. लोकांमध्यें पुष्कळच ओरड होऊन अनिष्ट लक्षणें दृष्टोत्पत्तीस आल्यावरच उपाययोजना करण्यांत यावी अशा प्रकारची राज्यघटना कव्हांहि योग्य मानतां येणार नाहीं, आणि जेथें असा प्रघात आहे, तेथें आपोआप दुःख निवारण केलें जाईल, प्रयत्नावांचून दाद लागेल, अशी अपेक्षा करणें शहाणपणाचें होणार नाहीं.

# परिशिष्ट.

## राष्ट्रीय सभा व मुस्लिम संघ यांनीं पसंत केलेली

# सुधारणांची योजना.

१९१७ सालीं लखनौ येथें राष्ट्रीय सभा व मुस्लिम संघ यांच्या बैठकींत सर्वानुमतें पास झालेले स्वराज्यविषयक ठराव आणि स्वराज्याचा पहिला हप्ता म्हणून राष्ट्रीय सभेच्या ऑल-इंडिया काँग्रेस कमिटीनें आणि मुस्लिम संघाच्या रिफार्म-कमिटीनें केलेली व या उभय संस्थांनीं पसंत केलेली सुधारणांची योजना पढें देत आहों:--

## राष्ट्रीय सभेचा ठराव.

( अ ) हिंदुस्थानांतील मोठमोठे जनसमूह हे प्राचीन काळीं सुधारलेल्या लोकांचे वंशज असून राज्यकारभार चालविण्यामध्यें त्यांनीं पुष्कळच कुशलता दाखविली आहे हें लक्षांत घेतां, तसेंच ब्रिटिश अमलाखालीं एक शतकांत त्यांनीं शिक्षणाच्या व सार्वजनिक जीवनाच्या बाबतींत केलेली प्रगति लक्षांत घेतां, त्याचप्रमाणें सध्यांची राज्यपद्धति त्यांच्या कायदेशीर आकांक्षा पूर्ण करणारी नसून सांप्रतच्या परिस्थितीस व गरजांस अननुरूप आहे हें लक्षांत घेतां, राष्ट्रीय सभेचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांस लवकरच स्वराज्य देण्याचा ब्रिटिश राजनीतीचा हेतु व संकल्प आहे, असा बादशाहांनीं जाहिरनामा काढण्याची वेळ आली आहे.

( आ ) ऑल-इंडिया काँग्रेस कमिटीनें अखिल-भारतीय मुस्लिम संघाच्या रिफॉर्म-कमिटीच्या विचारें केलेल्या योजनेंत निर्दिष्ट केलेल्या सुधारणा अमलांत आणून स्वराज्याचा उपक्रम करावा अशी ह्या राष्ट्रीय सभेची मागणी आहे.

( इ ) साम्राज्याच्या पुनर्घटनेंत हिंदुस्थानास सध्यां जो अंकित देशाचा दर्जा आहे तो बदलून स्वयंसत्ताक वसाहतींच्या बरोबरीचें स्थान त्यास द्यावें अशीहि ही सभा मागणी करते.

## मुस्लिम संघाचा ठराव.

अखिल-भारतीय मुस्लिम संघाच्या रिफॉर्म-कमिटीनें केलेली व त्याच्या कौन्सि-लनें पसंत केलेली सुधारणांची योजना हा संघ मंजूर करून हिंदुस्थानांत पूर्ण स्वराज्याची स्थापना करण्यास पहिली अवश्यक पायरी म्हणून युद्धसमाप्तीनंतर ती सरकारनें अमलांत आणावी म्हणून राष्ट्रीय सभेबरोबर ही योजना सरकारास सादर करतो.

---

## सुधारणांची योजना.

### १.—प्रांतिक कायदेकौन्सिलें.

१. प्रांतिक कायदेकौन्सिलांत चारपंचमांश लोकनियुक्त सभासद व एकपंचमांश सरकारनें नेमून दिलेले सभासद असावेत.

२. मोठमोठ्या प्रांतांत एकंदर सभासदांची संख्या १२५ हून कमी नसावी, व लहानलहान प्रांतांत ती ५० पासून ७५ पर्यंत असावी.

३. कौन्सिलांचे सभासद लोकांनीं प्रत्यक्ष निवडून दिलेले असावेत व मतें देण्याचा अधिकार शक्य तितक्या विस्तृत प्रमाणावर ठेवण्यांत यावा.

४. अल्पसंख्याक लोकांचे प्रतिनिधी निवडून घेण्याकरितां योग्य तरतूद करण्यांत यावी व प्रांतिक कायदेकौन्सिलकरितां मुसलमानांचे प्रतिनिधी स्वतंत्र मतदारसंघांच्या द्वारें निवडून देण्यांत यावे.

अशा रीतीनें निवडून दिलेल्या मुसलमान सभासदांचें प्रमाण पुढें दिल्याप्रमाणें असावें:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पंजाब— | हिंदी | लोकनियुक्त | सभासदांच्या | निमे |
| संयुक्तप्रांत— | ... | ... | ... | शेंकडा ३० |
| बंगाल— | ... | ... | ... | ,, ४० |
| बहार— | ... | ... | ... | ,, २५ |
| मध्यप्रांत— | ... | ... | ... | ,, १५ |
| मद्रास— | ... | ... | ... | ,, १५ |
| मुंबई— | ... | ... | ... | ,, एक तृतीयांश |

मात्र, आपल्या स्वतंत्र मतदार संघामार्फत होणाऱ्या निवडणुकीखेरीज वरिष्ठ किंवा प्रांतिक कायदेकौन्सिलच्या दुसऱ्या कोणत्याहि निवडणुकींत मुसलमानांनी भाग घेऊं नये.

तसेंच कौन्सिलापुढें आणलेल्या कोणत्याहि प्रश्नास, ठरावास अथवा बिलास या दोन जातींपैकीं कोणत्याहि जातीचे दोनतृतीयांश सभासद विरुद्ध असतील तर तो प्रश्न, ठराव अथवा बिल दोन्ही जातींच्या सभासदांनीं कौन्सिलपुढें आणूं नये.

५. प्रांतिक राज्यव्यवस्थेचे मुख्य अधिकारी कौन्सिलचे अध्यक्ष नसावे. तर आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार कौन्सिलला असावा.

६. मूळ प्रश्न विचारणारासच जादा प्रश्न विचारण्याचा जो अधिकार आहे, तो, इतर कोणत्याहि सभासदास असावा.

७. ( अ ) कस्टम्स, पोस्ट, तारखातें, टंकसाळ, मीठ, अफू, रेल्वे, सैन्य आरमार व हिंदी संस्थानिकांकडील खंडण्या यांखेरीज सर्व उत्पन्नाच्या बाबी प्रांतिक असाव्या.

( आ ) कांहीं उत्पन्नाच्या बाबींपासून होणारा वसूल हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें यांच्या दरम्यान विवक्षित प्रमाणांत विभागला जातो, हें यापुढें बंद व्हावें. हिंदुस्थान सरकारास प्रांतिक सरकाराकडून नक्त रकमा मिळाव्या. विशेष कांहीं कारण झाल्यास किंवा अनपेक्षित अडचण आल्यास या नक्त रकमांत फेरफार करण्यांत यावा.

( इ ) प्रांतांच्या अन्तर्गत कारभाराबद्दलच्या सर्व बाबींचा निर्णय ठरविण्याचा पूर्ण अधिकार प्रांतिक कायदेकौन्सिलला असावा. कर्ज काढणें, कर बसविणें किंवा त्यांत फेरफार करणें, अदाजपत्रक मंजूर करणें याही गोष्टींचा या अधिकारांत समावेश व्हावा. खर्चाच्या सर्व बाबी व जरूर पडेल तो पैसा कोणत्या साधनांनीं व कोणत्या मार्गांनीं उभारावयाचा याबद्दलच्या योजना बिलाच्या रूपानें या प्रांतिक कौन्सिलपुढें मंजुरीकरितां आल्या पाहिजेत.

( ई ) प्रांतिक सरकारच्या अधिकारांतील सर्व बाबींवरील ठराव कौन्सिलपुढें आणण्याचा व त्यांवर चर्चा करण्याचा सभासदांस अधिकार असावा. याविषयींचे नियम स्वतः कौन्सिलनेंच करावेत व त्या नियमानुसार चर्चा व्हावी.

( उ ) गव्हर्नर-इन-कौन्सिलमें नामंजूर केलेल्या ठरावांखेरीज [illegible] ठराव कार्यकारी अधिकाऱ्यांनीं अमलांत आणले पाहिजेत; शिवाय नामंजूर झालेला तोच ठराव फिरून एक वर्षानंतर पास झाला तर तोहि अधिकाऱ्यांनीं अमलांत आणिला पाहिजे.

( ऊ ) सार्वजनिक महत्त्वाच्या अशा एखाद्या निकडीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं कौन्सिलमध्यें हजर असलेल्या सभासदांपैकीं एकअष्टमांशाहून कमी नाहींत इतक्या सभासदांच्या पाठबळानें, इतर प्रश्नांविषयींची चर्चा तहकूब करण्याची सूचना कौन्सिलपुढें आल्यास, इतर प्रश्न मागें टेवून त्या विवक्षित प्रश्नाची कौन्सिलमध्यें चर्चा व्हावी.

८. एकंदर सभासदांपैकीं एकअष्टमांश सभासदांनीं मागणी केल्यास कौन्सिलची खास बैठक भरवितां यावी.

९. कौन्सिलनेंच केलेल्या खास नियमानुसार पैशाखेरीज इतर बाबींसंबंधीं कोणतेंहि बिल कौन्सिलमध्यें आणतां यावें. त्यास सरकारच्या संमतीची जरूर राहूं नये.

१०. कायदेकौन्सिलमध्यें पास झालेल्या बिलांना कायद्याचें स्वरूप येण्यास त्यांना गव्हर्नरची संमति मिळाली पाहिजे. गव्हर्नर जनरल यांना मात्र कोणतेंहि बिल नामंजूर करण्याचा अधिकार असावा.

११. कायदेकौन्सिलमधील सभासदांची मुदत पांच वर्षांची असावी.

## २.—प्रांतिक सरकार.

१. प्रांतिक सरकारचा मुख्य अधिकारी गव्हर्नर असावा. तो सामान्यतः इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील किंवा कोणत्याहि कायमच्या सर्व्हिसमधील नसावा.

२. प्रत्येक प्रांतास एक कार्यकारी कौन्सिल असावें. हें कौन्सिल व गव्हर्नर मिळून प्रांताचें सरकार समजण्यांत यावें.

३. सामान्यतः सिव्हिल सर्व्हिसमधील लोकांची कार्यकारी कौन्सिलमध्यें नेमणूक होऊं नये.

४. कार्यकारी कौन्सिलमधील निदान निम्मे सभासद प्रांतिक कायदे कौन्सिलमधील लोकनियुक्त सभासदांनीं निवडलेले असे हिंदी गृहस्थ असावेत.

98860

REFBK-0001447